CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

The league of the barbhais.

G-1
69/5

69/5
LUCKNOW.
पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद
CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
954.03
G-1
69/5

५

बारभाईंचें राजकारण

[किंमत — १ रुपया किंवा १ शिलिंग ८ पेन्स]

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३०

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

THE LEAGUE OF THE BARBHAIS

The two tragic events of transcendental importance in Maratha history that hastened the national fall are rightly considered to be the untimely death (18th November 1772) of the great Peshwa Madhavrao I, and the cruel murder of his brother Narayanrao on the following 30th August 1773, perpetrated by his famous—or rather infamous—uncle Raghoba, whose rulership the nation was determined to reject at any cost. But Raghoba was so brave and powerful and circumspect that few could have imagined at the beginning that he would be successfully resisted. Thereupon a grand plot came to be gradually formed at Poona which is known in history as the "League of the Barbhais." While a few details of this league and the measures it took to oust Raghoba from what he considered his rightful possession, are very well known, a student of history is at present ignorant as to its most pertinent features which could reveal the authorship and the methods of that great undertaking,—perhaps the only one in which so many soldiers and statesmen of all shades of opinion whole-heartedly joined. The following papers, which have been discovered in the Peshwa Daftar, clear most of the outstanding doubts with reference to the organization and working of this league, and supply for the first time valuable circumstantial evidence enabling the student to pass correct judgments on the character and capacity of the various individuals that composed it.

Two characters, Sakharam Bapu and Trimbakrao Pethe, appear in these papers to be the first to launch the scheme, which, it is evident, would not have succeeded if the former had not taken the lead at great personal hazard. He was a very old and experienced statesman, having taken part in the development of the Peshwas' rule right from its very beginning. Trimbakrao Pethe was an equally old and experienced soldier, who had worked under Bajirao and Chimaji Appa, helped Nanasaheb in many a critical situation, and knew his craft thoroughly. Indeed it is this Trimbakrao's letters, nearly all in his own hand, discussing the pros and cons of the step that was being taken, which form the most important part of the correspondence which is being published in this section. Trimbakrao and Raghoba had in December 1773 started from Poona on an expedition into the Carnatic, when suddenly Sakharam Bapu returned to Poona on a pretence of illness and there consulted Nana and Moroba Fadnis, converted them to his views, and persuaded Trimbakrao, by means of secret agents, boldly to support the cause of Gangabai, then a few months advanced in pregnancy, and declare an open fight against Raghoba. Trimbakrao managed to enlist for the scheme the sympathy and services of the Bhonsles of Nagpur and the Nizam of Hyderabad, interviewed them personally, and skilfully managed the military preparations, upon which after all depended the success or otherwise of the risk they had undertaken.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

Nana Fadnis played only a secondary part and Moroba was vacillating and half-hearted, intent rather upon selfish end than the success of the national cause, a trait of his character which entirely ruined his career later on. Sakharam Bapu contrived to send the two ladies Gangabai and Parvatibai to the fort of Purandar for safety, visited Satara to prevent the Chhatrapati falling into Raghoba's hands, sent urgent emissaries to Scindia and Holkar, supplied funds and ammunition to Trimbakrao in the field, and started the normal civil administration, and above all, with his vigilant eye moving in every direction, enthused all workers with a sense of duty and sacrifice, rare indeed in those decadent days of Maratha rule. Trimbakrao Pethe mentions Sakharam Bapu as the Dictator invested with all emergency powers.

The second batch of letters, equally important with those of Trimbakrao, refer to the affairs of the Bhonsles of Nagpur and are from the pen of Baburao Vaidya, who was specially despatched from Poona to the court of Nagpur to enlist their help for the cause of the Barbhais. It was unfortunate that an accident at the very outset put an end to Trimbakrao's life, thereby giving Raghoba an opportunity to escape to the north and eventually to seek the protection of the British at Surat, so that the whole affair which could have been easily concluded in a couple of months lingered on for nine long years, putting the mettle of the nation and its leaders to the severest test. The ultimate success is only a melancholy solace when one knows that Sakharam Bapu, the real author of the grand undertaking, had to end his life in a miserable confinement at the fort of Raigad at the hands of those very persons who owed their rise to his own initiative.

No. 24

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh



Facsimile of the handwriting of Trimbakrao Vishvanath Pethe. *(Died on 2-4-1774.)*

No. 91



Facsimile of the handwriting of Sakharam Bhagvant Bokil. *(Died on 2-8-1781.)*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 1] [*10-6-1773*

पेा छ १८ रावल सन आर्बा.

श्रीसीताकांत.

राजश्री सखारापंत बापू

गोसावी यासि,

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रीो मुधोजी भोसले सेनाधुरंधर दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीयकुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. अ[illegible]णाजवलोन राजश्री महिपतराव दिनकर व व्येंकटराव कासी निघोन आलियानंतर भेट जाली. तेच दिवसीं निघणे होऊन पत्र पाठविलें, त्याजवरून सविस्तर कललेच असल. प्रस्तुत आम्ही आलजपुरास येऊन भाई नवाब इसमायेलखान बाहादर याची भेट घेतली. याउपरी आपणाकडील पत्रांचीं उतरें येतील त्याप्रमाणे पुढें वर्तणूक घडोन येईल. आम्ही सर्व प्रकारें आपले वचनावर भार ठेऊन निघालों. आपणास कोण्ही समजावितील व ध्यानातहि आले असल जे, दिवसगत लागली म्हणोन. त्यास तेथोन समर्पक उतरास आभाव हाहि विचार, आपले पूर्व ममतेवर चितात न ठेवितां निघावे, तरी न पुसतां निघणे स्वरूपास उचित नाही. व निघतांच तेथील जथ विस्कलीत होये असेंहि जाले पाहिजे. या साधनास दिवसगत लागली व घरचा जमाव थोडका जवल होता म्हणोन वराडातील पाचसाहा हजार फौज आपलेकडील आणऊन बऱ्हाणपुराहून आपणाकडील समुदायास इतला[1] करून तेथे निरोप घेऊन निघालों. याउपरी वडीलपणास उचित त्या रीतीने परामर्ष करावा. सविस्तर मजकूर इकडील श्रवण व्हावया यास्तव राजश्री व्येंकटराव कासी यास येका दो रोजा आपणाकडे रवाना करितो. पावलीयानंतर सर्व ध्यानास येईल. आम्ही येथून आपले लिहिल्याप्रमाणें चंद्रपुरास जावें, त्यास कनिष्ठाकडील[2] फौज च्यार पांच हजार चंद्रपुराभोवते कुल परगणे लुटून वराडांतहि दंगा आरंभिला आहे. मुलूक तमाम उद्वस केला. ऐसी वर्तणूक पाहून त्यासहि निशेधाची पत्रें पाठविलीं आहेत. न ऐकिल्यास पारपत्य करावें लागल. हाहि इतला आपणास असावा म्हणोन सूचना लिहिली आहे. वरकड आमचा घरचा विचार सर्व आपणास

---

१ तजवीज, जबाबदारी. २ साबाजी भोसले.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आवगत आहे. आज दोन वर्षे वरकलह लागला, याजमुळें सिबंदीचे पेचात दौलत आली. फौजेचे देणे चढते. ते द्यावयास जागा नाही. तेव्हा लोकांचा उलगडा होऊन त्यापासून सुटका न होये. दिवसेदिवस आधिकच पेच. हातावर कोठपर्यंत चालवावे? अडचण कोठपर्यंत सोसावी? इतकेहि घडोन पूर्व दिवसच दिसोन येत आहे. या संकटापासोन सोडविणार आपणाविना दुसरे कोण आहे? यास्तव लोकाचे हातून दिवस कसे काढावे, वागावे कोणे रीतीने, हे वरचेवर वडीलपणे सूचना करून सांभाल केला पाहिजे. मोठमोठी संकटें निवारण करून हे दिवस आपण दाखविले. तैसेच पुढेहि निर्वाह करणे आपणाकडेच आहे. तेथे आम्ही विस्तर ल्याहावा ऐसे नाही. रा छ १ रविलोवल. मागें मोठे मोठे संकटातून आपण बहुता रीतीनें वागविलें, त्यामुळें हे दिवस पाहिले. सांप्रत तों श्रीनें सर्वाध्यक्षता आपणासच केलें. यामुळें आमचे मनोदये सर्व जे अस्तील ते सिधिस जातील, ही निशा पूर्तीच जाणतों. आपले उतराची प्रतीक्षा करीत असों. कारण मिळून, आपले मागील उपकारांचे स्मरण चिताचे ठाई पुर्ते आहे. वरकड सविस्तर, मारनिले येतील, त्याचे जबानीवरून श्रुत होईल. बहुत काये लिहीणे, लोभ असों दील्हा पाहिजे, हे विनंती.

० श्री ~
शाहुराजप्रसादेन रघुणामयशोधनं तत्सुनोस्तुमुधोनाम्नस्तेषां मुद्रा विराजते

मोर्तब
सुद.

¶*Mudhoji Bhonsle, who disputed with Sabaji the right of guardianship of (Raghuji Bhonsle) the young prince of Nagpur, requests Sakharam Bapu, the Peshwa's Karbhari at Poona, to act as a mediator and settle once for all his differences with his brother Sabaji. He refers to his intention of coming over to Poona to get the affair settled in a personal interview. Mudhoji writes that fortunately for him Sakharam Bapu, his well-wisher, is at the head of affairs at this time.*

No. 2] [*4-9-1773*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी,

आज्ञाधारक सुमेरसिंग सुभेदार साष्टांग नमस्कार विज्ञापना येसीजे. रा बालाजी वामन दामले यांस सरकारातून कैद केले होते. त्यास साहेबाजवल

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सेवकानी अर्ज करून मारनिलेस सोडविले आहे. याउपरी याजपासून कोणे येके गोष्टीचे अंतर पडल्यास व बालाजी वामन आज्ञासिवाय हरयेक जागा गेलियास आपण खुद निसबत जामीन आहे. हे लिहून दिल्हे, सही. छ १६ जमादिलाखर भाद्रपद वद्य त्रितीया सुक्रवार सुा आर्बा सबैन मया व अलफ. हे+ वीनंती.

¶*Sumersing to Raghunathrao, saying that he stands surety for Balaji Vaman Damle who has been released from confinement.*

No. 3] [*12-11-1773*

श्री

राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ
स्वामी गोसावी यांसी,

विनंती. उपरी, राजश्री रावरंभाजी जयेवंत निंबालकर व माहाराव जसवंत निंबालकर याचा माहल पो आवसे येथे गावगना तुम्ही रोखे करून पैका घेतला, पाटील कुलकर्णी ओलीस ठेविले, म्हणून कलले. त्यास पो मजकुरी पैका घेतला असेल तो माघारा देऊन, ओली ठेविल्या असतील त्या सोडून देणे. पुढे यांचे माहाल वरवाल व लातूर वगैरे लागेल; त्यास उपद्रव न करणे. जाणिजे छ २६ साबान सुा आर्बा सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Trimbak Vishvanath Pethe is ordered to pay back whatever money he had exacted from the Mahals belonging to the Nimbalkars and not to harass them any more.*

No. 4] [*November 1773*

श्री

राजश्री त्रिंबकपंत स्वामीस.

नमस्कार विनंती. उपरी, तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. मोगलांकडे आपले फौजेची नेमणूक जाली आहे. चार महिने लागतील. तुमची वाट फार पाहिली परंतु आले नाहींत. आम्ही तर शुक्रवारी श्रीमंताची आज्ञा घेतली. रविवारीं येथून जाऊं. तातडीनें गेले पाहिजे. तुम्हांस खर्चास तीस हजार नक्त व

+ हा मजकूर बालबोधींत आहे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कापड आठ हजार आख, रामचंद्र नाईक परांचपे यांजवळ ठेविले आहे ते घेणें. तजविजीनें खर्च करणें. कदाचित् शनिवारी आलेस तरी गांठ पडेल. आम्ही बरोबर स्वार न्यावयाचे ते तपशीलवार नेमणूक करून पाठवितो. रवाना शुक्रवार दोन प्रहर. + हे विनंती.

¶*Sakharam Bapu to Trimbakrao Pethe that his forces have been ordered to march against the Nizam. The letter must have been written in November when Bapu returned to Poona to confer with other leaders in the matter of taking steps against Raghunathrao who had usurped the Peshwaship.*

No. 5] [*2-12-1773*

पौ छ २२ रमजान सन आर्बा सबैन

सायंकाल.

श्रीशंकर.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

नारोपंत नाना[1] स्वामीचे शेवेसीं,

पोष्य त्र्यंबकराव विश्वनाथ[2] कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष. राजश्री साबाजी भोसले फौजसुधां सरकारच्या मुलकांत सिरोन दंगा करून मन माने तैसा पैका घेत आहेत, त्याचे पारपत्याकरितां श्रीमंतानी फौजसुधां आम्हांस रवाना केलें. आज छ १७ रमजानी आमचा मुकाम सेवगांवनजीक जाला. उदेक सड्या फौजा करून भोसल्यास आडवे होतों. आगोधर साम प्रकारें लिहिणें बोलणें. तोहि आर्थ, त्याचें पत्र आम्हांस आलें होतें, त्यावरून रा मल्हार चिंतामण वाघ यांजबो बहुताप्रकारें समाधानाचें विवेकाचे शब्द लेहून, सेनासाहेब सुभ्याचे साम्यतेचे पद सरंजाम मातबरीप्रमाणें द्यावयाचें जाब सुचविलें; परंतु त्यानी त्याच पदाचा आग्रह धरून मरणपर्यंत संकल्प केला. जेथवर हात पोहोंचेल तेथवर प्रजेस उपसर्ग देऊन पैका घेईन, कोणी आडवे येतील त्यासी युध करून मरोन बरें म्हणवीन, असीं प्रतिज्ञेचीं उतरें वकिलाजवल बोलतात, आणि उपद्रव अधिकच करितात, याजकरितां पारपत्यच करणें प्राप्त. आमचे फौजेपेक्षां त्याची फौज फार आहे. येकायेकीं जुमेस[3] खाणार नाहींत. परंतु आम्हीं आडवे आलों असतां नासिक पुणे इकडे जाणें घडणार नाहीं. तथापि न कले. पुणें तर दूर. नासिक मात्र

+ सर्व पत्र सखाराम बापूचे हातचें. अक्षर कांपरें आहे.

१ तुळसीबागवाले. २ पेठे. ३ भीति, माघार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जवल आहे. ईश्वरी सत्ता प्रमाण. जसा प्रसंग नजरेस येईल तसतसी पूर्व सूचना तुम्हांस लिहून पाठऊं. तुम्हीहि आपलेकडील नवल विशेष लिहून कलवीत जाणे. घरीं मुलें मनुशें आहेत, त्यांस प्रसंगोचित् साहित्य लागल्यास करून देऊन सर्व प्रकारें परामर्श करणे. रवाना छ १७ रमजान. बहुत काय लिहिणें, लोभ असों देणें, हे विनंती. येकदांच तुमचे नांवची दोन पत्रें बेदरचे मुकामाहून श्रीमंतीं आजच पा दिल्ही तीहि पा असेत. हे विनंती.

¶Disappointed when his claims to the dignity of Sena-Saheb Subha of Nagpur were overlooked in favour of his nephew Raghuji, Sabaji Bhonsle collected a strong force and laid waste Nagpur territory. Absence of a strong opposition emboldened Sabaji to extend his raiding activities into the Peshwa's provinces. All attempts to arrive at a compromise having failed, Trimbakrao Pethe was despatched by Raghunathrao to punish the miscreant. Trimbak Rao in this letter informs Raghoba that his small force would not be able to hold against Sabaji.

No. 6] *[16-1-1774*

पौ छ १० जिलकाद

सन आर्बा सबैन.

श्री.

सेवेसी त्र्यंबक हरि वर्तक कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता छ ३ जिलकाद मु॥ दुधनातीर पा परवाणी येथास्थित असे विशेष. कृपा करून पत्रे पाठविली ती पावली. श्रीमंत राजश्री त्रिंबकरावमामास पत्र प्रविष्ट केले. आपल्या लिहिल्यावरून राजश्री जनार्दन राम याजबो पांचसे स्वार देऊन साष्टीकडे परभारी रवानगी केली. इकडील मजकूर साबाजी भोसले फौजसुधां याजबो श्रीमंतांकडे जात आहेत. रघोजी भोसले व दर्याबाई श्रीमंतांची आज्ञा घेऊन निघाली आहेत. मार्गी भेट होईल. हेहि मजल दरमजल जाणार. जासूद आा ६ पाठविले आहेत म्हणून लिा; पैकी दोन आले, ते जाब देऊन माघारे पाठविले आहेत. चौघे आलेच नाहीत. याउपरी नवीन मजकूर आढलल्यास सेवेसी लेहून पाठवीत जाईन. घरी पत्र लिहिले आहे. लाखोटा प्रविष्ट होऊन उतर आले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विनंती. राजश्री जनार्दनपंतदादास सां नमस्कार विनंती. सदैव पत्रीं तोषवीत आसावे, हे विनंती.

¶Letter addressed probably to Sakharam Bapu giving news about the movements of Sabaji, Mudhoji and Daryabai.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 7] *[29-1-1774*

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री

नारो आपाजी गोसावी यासी,

सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार. सुरू अर्बा सबैन मया व अलफ. खासा स्वारीचा मुकाम पेडगावी भीमातीरी होता. तेथे पेशवाइची वस्त्रें घेतली. त्या स्थळावर आषाढमासी महिनाभर राहावयाचें आहे. सबब तेथे वाडा बांधावयाचा असे. त्यास तुम्ही आनंदवलीचे वाड्याचे नकशाप्रों डौल धरून दाहा हजार रुपयांवर व पंधरा हजारांचे खाली, इतक्या यैवजांत छपरबंदीसारिखे काम करणे. बेलकी[1] छपरबंदीहि केली तरी कार्यास येईल. आनंदवलीचे वाड्याची मेरामत[2] अंताजी राम यास लेहून पाचसातशें रुपयांत करवणे. वाडा बांधिल्यास दिवसगत लागेल. तूर्त होणार नाही. छपरबंदी करावी तरी तेहि मर्जीस येणार नाही. यास्तव बहुत [क] डेऱ्यातच महिनाभर राहाणे होईल. यास्तव जमीन मात्र मुरूम घालून निबर असावी व छपरे शेदीढसे चांगली असावी. आइते वेलेस जसे बनेल तसे केले जाईल. वेलूचे कुडीचे साहित्य असावे. डेऱ्याच्या मेखा असाव्या. यास्तव दाहापाच हजार रुपये लागतील ते देणे. स्वारी आलियावरी साहित्य मात्र असावे. लाकूडकडव्याविसी अलाहिदा पत्र पाठविलेच आहे. छ १६ जिलकाद.

लेखना
वधि:

¶Raghunathrao to Naro Appaji, informing him that when he was at Pedgaon on the Bhima he received the robes of the office of the Peshwa. He further communicates to him his wish to build a house there quite similar to the one at Anandvalli.

No. 8] *[5-2-1774*

+ श्रीसांबः सपुत्रो विजयते.

राजश्री सखाराम भगवंत यास,

विनंती. उपरी, बहुत दिवस तुम्हाकडून पत्र न आले. वर्तमान कलले नाही. तरी ऐसे न करणे. आपले शरीराचे व मनसुब्याचे प्रकार आढ[ल]तील

---

१ किंबहुना. २ डागडुजी.

+ सबंध पत्र राघोबादादांच्या हातचें आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सुचतील ते लिहित जावे. सांप्रत बहुत दिवस घरी आहां; औषध उपाय करून आरोग्य जाहालाच आसाल. यास्तव लौकर दिवस चागला पाहून येणे. तुम्ही मातबर शाहाणे जवल आसावे हे आमचे मानस; व तुम्हासहि उ (चित) तरी लौकर यावे. सविस्तर अर्थ येवि(सी) चे रा विष्णु नरहर याचे जबानी कलतील. जाणिजे. छ २४ जिलकाद. बहुत काये लिहिणे, हे विनंती.

¶*Raghunathrao makes enquiries about the health of Sakharam Bapu and expresses a hope that he would soon join him for consultation.*

No. 9] [*6-2-1774*

पौ छ ३० जिलकाद

आर्बा फाल्गुन.

श्री.

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी,

विनंती शेवक धोंडो माहादेव सां नमस्कार विज्ञापना. ता छ २४ जिलकाद-पावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित असे. यानंतर छ १९ जिलकादचे आज्ञापत्र सादर जाहालें. तेथे आज्ञा की, श्रीमंत मातुश्री पार्वतीबाई व गंगाबाई यांस घेऊन आम्ही व राजश्री सखारामपंत माघ वा त्रितीयेस पुणियाहून निघोंन किले पुरंधरास आलों. तुम्ही बहुत खबरदारीने राहावें. राजश्री सुभेदारासहि कलवावें, कान्हुरात[1] राहू नये व माधवराव याणी नगरचा बंदोबस्त करून राहावे, म्हणोन आज्ञा. त्यास, आज्ञेप्रो सर्व बंदोबस्त येथास्थित आहे. स्वामीचे पत्र तीर्थस्वरूप राजश्री सुभेदारानी व चिरंजीव राजश्री माधवराव[2] याणी पाहून आम्हाकडें आलें. चिरंजीव माधवराव किले नगरचा बंदोबस्त करून किल्यातच आहेत. सुभेदार कान्हुरी आहेत. तेहि आज्ञेप्रमाणे किल्यांस जातील. बंदोबस्ताविसी काही चिंता नाही. वर्तमान मात्र वरचेवर तीर्थस्वरूप राजश्री सुभेदाराकडे ल्याहावयाची आज्ञा करावी. ते वरचेवर येथे लिहीत जातील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Dhondo Mahadeo acknowledges the receipt of a letter which stated that Nana Fadnis and Sakharam Bapu, together with Parvatibai and Gangabai, have moved to the fort of Purandar and writes further that proper arrangements will be made for the defence of Ahmednagar fort.*

---

१ ता. पारनेर, जि. नगर. २ नगरकर ?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 10] [*7-2-1774*

पा छ २ जिल्हेज.

श्री

श्रीमंत् राजश्री बापू स्वामीचे शेवेसी.

पोष्य नारो शंकर कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २९ जिलकादपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. कृपा करून पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन दर्शनातुल्य संतोष जाहाला. पत्रीं वर्तमान लेखन केले. त्यास, जो आपण विचार केला तो प्राणसंकष्टाचा प्रकार जाणौन पोख्तच केला. ज्याच्या संग्रही पूर्वापर त्याच्या पायासी निष्ठा धरिलियां सर्व आपले आज्ञेतच आहेत. आमची शरीरआवस्था परस्परे विदितच आहे. आशक्त शरीराचा केवल प्रकार, याजमुळे निरोपाय. आम्हांकडील फौजसुध्धां चिरंजीव लस्करांत राजश्री त्रिंबकराऊ यांजपासी आहे. ते त्यांचे आज्ञेतच आहेत. आपलें पत्र आलियां आम्हीहि त्यांजकडे येथून पत्रे पाठविलीं आहेत. आंम्ही सर्व प्रकारे आपले आज्ञेत असों. विस्तारें काये लिहावे ? बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Naro Shanker to Sakharam Bapu assuring him of his full support in his new undertaking. The writer further informs him that his son accompanied by his contingent has joined Trimbakrao.*

No. 11] [*7-2-1774*

पौ छ ३ जिल्हेज.

श्रीशंकर प्रसंन्न

राजश्रिया[1] विराजित राजमान्य राजश्री सखारामपंत बापू स्वामीचे सेवेसी.

पो आनंदराव भिकाजी[2] कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता छ २९ जिलकाद मुा नजीक नांदेड गंगातीर जाणौन स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण छ १७ जिलकादचे पत्रे राजश्री मामास व आम्हास पाठविली ती पावली. उभयेतानी आक्षरशा वाचून पाहिली. सविस्तर मजकूर कलला. ईस्वरइछा होती त्याप्रो योज्यना होऊन घडोन आलें. मुख्यत्वे मोगल जरूर अनकूल असावा. तो बदोबस्त अगोधरच आपण केला

---

१ याच अर्थाचें नाना फडणविसास पत्र आहे. २ रास्ते.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे म्हणून निरोप पाठविला होता, परंतु राजश्री त्रिंबकराव मामा यासी ये गोष्टीचे दाखले पडोन, त्याजकडून येकवाक्यता नजरेस यावी म्हणजे मग फारसा पेच पडावयाचा नाहीं. येथे तरी आजपर्यंत मामानी मसलत केली ती बरीच जाली. पुढे प्रसंगानरूप करणे प्राप्त. त्यापक्षी या प्रसंगी ज्यासी जसे बोलणे, कबूल करणे, प्राप्त होईल तसे करतील. इकडील कोण्हीयेक सरदारास वगैरे याउपरी लिहिणे ते परभारे न ल्याहावे. जे लिहिणे ते मामासच लिहून पाठवावे. हे समजोन करणे तसे करतील, बोलणे तसे बोलतील. त्यामुळे याचे लगामी सर्व राहून जथ बरा पडेल. इतके दिवस ज्यास जसे लिहिणे तसे लिहून लगाम राखिले ते उतम. परंतु पुढे याप्रो व्हावे. पैका तर जरूर या मसलतीस मबलग लागेल, त्याविसीचा पुस्तपन्हा पुर्ता जाला पाहिजे. हे गोष्ट आपण डोईवर घेतली त्यास येसमई आपणच[1] बाहेर येऊन आम्हास सर्वास बुधिप्रकार मनसबा सांगोन मामा आपण येक होऊन करणे तसे करावे. मग कोणे गोष्टीची फिकीर आपण करावीसी नाहीं. आम्ही सर्व आनकूल आहो. बहूत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Anandrao Bhikaji Raste advises Sakharam Bapu to carry communications with other Sardars through Trimbakrao Mama only. It is this step that will secure unity of command. The writer further requests the addressee to supply money for the undertaking and to come out himself.*

No. 12] [*8-2-1774*

श्रीशंकर

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखारामपंत बापू स्वामीचे शेवेसी.

पोष्ये त्रिबकराव विस्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनती उपरी. येथील कुशल तागाईत छ २६ जिलकाद पावेतो मु॥ गंगातीर नांदेडासंनिध असो विशेष. छ १७ जिलकादची पत्रे तुम्ही पाठविली तीं छ २५ माहे मजकुरी संध्याकाली मु॥ मजकुरी पावली. पत्री लि॥ कीं, वांकडे घडोन पुढें कैलासवासी नानाचे वंशास ठिकाण नाहीसे भावी दिसो लागलें ; त्यामुळे श्रीकृपेने राज्याचाहि बंदोबस्त व्हावा आणि चांगलेहि दिसावे, याकरिता आम्ही व राजश्री नाना फडणीस व राजश्री मोरोबा दादा फडणीस व हरीपंत फडके येकत्र होऊन उभयता मातुश्री

---

१ याठिकाणीं नानाच्या पत्रांत 'बापूनी' हा शब्द आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
थोरले बाईचे अनुमते युक्तीने काढून किले पुरंधरास घेऊन गेलो. पुण्यातील बंदोबस्तास मोरोबा दादा ठेविले. वरकड कितेक साधनाचे प्रकार पूर्वी सागोन पाठविलेच आहेत, त्यांत मुख्यत्वेकरून मातबर साधन यवनाचे, त्याविसीची चिंता न करावी यैसे निरोपात सागून पाठविलेच होते. रा॥ सिंदे होलकर याजविसीहि साधन केलें. राजश्री फतेसिंग गायकवाड आपलाच आहे. तुम्हाजवल सर्व मंडली राजश्री आनदराव रास्ते सुधा आहे ती आपलीच आहे. राजश्री साबाजी भोसल्यासी बोलण्याचा सिलेसिला[1] होताच. त्यांचीहि अनकूलता तुम्ही करून घेतलीच आहे. फौजेचा जथ तुम्हाजवल आहे. पैक्याची कालजी न करणे. जो पैका लागेल त्याची पुरवणी होईल. आम्ही चांगले लौकिकांत दिसावें, चांगलें व्हावें याकरितां समजोन केलें. तुमचा सर्व प्रकारे भरवसा, यास्तव पुढील कर्तव्य ते सुचेल त्या प्रकारे आम्हीहि लिहून पाठऊ आणि तुम्हीहि लिहून पाठऊन करणे तसे करावे. त्यास "श्रीमंताचे जालें ते जाले, परंतु पुढें वंशास उचीत, सर्वांचे संरक्षण होऊन राज्यभार मार्गे करून चालविते, तर इतके करणेहि प्रयोज्यन नवते. परंतु उचीत प्रकारच दिसेनासा जाणोन करणेहि सर्वास प्राप्त. इत्यादिक प्रकारें तुम्ही व राजश्री नाना फडणिसानी लि॥ ते कलले. प्राप्त जाला प्रकार केलाच पाहिजे. आम्हास इतके दिवस साबाजी भोसल्यास आधार कोठेच नाही, ठिकाण बलकट नाही, खर्चास पैसा पदरी नाही, पद होते तेहि नाही पुढे श्रीमताचे कृपेचा भरवसा नाही. दाहा हजार फौजेचा सरदार, फारच सरल, इमान शाबूद, मर्दहि व येशस्वी यांचे संरक्षण होऊन उपयोगी पडावे याकरितां मातुश्री दर्याबाई वराडांत राजश्री राघोजी भोसले सेनासाहेबसुभे यांस घेऊन जात होती, त्यांस युक्तीप्रयुक्तीने लिहून कुडलवाडीपलीकडे गेली असतां मु॥ मजकुरास कालच आली. त्याची आमची भेट जाली, तों तुमची पत्रे आली. आतां तर त्यास व त्यांस येक केले पाहिजे. तूर्त मुलाचा टिकाहि राखावा, सर्व किले जागेचा (लावाला?) बाईचें हातीं, तिजला मायेत सिरोन मायेत घ्यावी म्हणजे साबाजी भोसल्याची चिंता जाऊन उपयोगी पडतील, यामुले या प्रांती गुंतलों. ईश्वरे योगहि तसाच घडविला. पुढे समजोन लि॥ प्रकारे करूं येक दुसरा मु॥ पडेल. मग कूच करून घाट चढोन दर्याबाईसुद्धां येऊं. यवनाकडील आम्हास काही समजण्यात आले नाही. ते येऊन त्याजकडून आमची खातरनिशा व आम्हाकडून त्याची यैसे व्हावे. या गोष्टीचे साधन सत्वर केले असेल तसे निदर्शनास यावे. बातमी श्रीमंताकडील वर्तमान कलल्यावर कसा डौल धरिला ते कलवावी. येका दोघास पुणे व किल्ले यांचे आटोपास

---

१ संबंध.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ठेऊन तुम्ही फौजेत जरूर यावे. शरीर अशक्त असेल तरी श्रीहरी कृपा करील; अथवा आमचे पाठीवर असावे. आम्ही तुम्ही सागाल त्या प्रकारे करू. परतु तुम्ही अनमान न करितां जरूर आले पाहिजे. किले सर्व न गलबलावे याकारितां त्यांचा बदोबस्त नानानी व तेथे आणखी राहातील त्याणी करावा. रा नारोपंत केसकर अद्यापि आम्हाजवल आले नाहीत. तोफखाना जरूर हाती लागावा. वरकड हुजरात पागा निबालकर गावडे वगैरे मडली निघोन यावी. राजश्री वामनराव तर त्रिवर्ग निघालेच आसतील. या प्रकारे सर्व जथ पडिल्यावर श्रीकृपेने योजिले सिधीस जाईल. येक हैदर नाईक राहिला तर त्याची फिकीर नाही. परंतु वरकड लिाप्राा जथोन यावे. पैका तूर्त नालबदीपैकी निमे व पोटास लागेल तो, यावेगले अर्जमारूज[1] प्रसंगाकरिता आईकणे प्राप्त, यास्तव पांचा लक्षाचा भरणा आम्हाकडे यावा. पैका आणावयास फौज काही पाठवावी की काये ते लौकर ल्याहावे. साबाजी भोसल्याचे पोट तूर्त काही चालविले पा. त्यास दिल्हे काय तेहि कलवावे. बहूत काये लिहिणे, लोभ असो देणे, हे विनंती.

¶Trimbakrao Vishvanath to Sakharam Bapu : acknowledges the receipt of the letter informing him of the first conception of the Barbhai Scheme by Nana, Bapu, Tatya and Moroba Dada and the removal of Gangabai to Purandhar. The writer further reports how he has tried to win over Sabaji Bhosle and proposes therefore that Sabaji be given some financial succour and then only he (Sabaji) would be of some use in the campaign.

No. 13]

श्री

विनंती उपरी रामचंद्र नाईक येथे आले. बोलिलो. तुम्हाकडे पाठविले आहेत. परंतु ते म्हणतात स्वारीत खटपट करणे ते क * तथापि थोडी बहूत करितो म्हणतात. त्या आपल्या खेरीज तूर्त काही होत नाहीं. मन घालून करावे. विसाजी नारायणाकडील नारोपंत कांहीं तजवीज करीन म्हणतो. त्यासहि न्यावे. आजचे दिवसांत करावें हे विनंती.

¶The letter is all in Sakharam Bapu's hand. He writes (probably to Nana Fadnis) about Ramchandra Naik Paranjpe, on the question of funds being obtained.

---

१ अर्जमारूज = कोणाची अर्ज विनंती वगैरे असल्यास.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 14] [*8-2-1774*

पौ छ २७ जिलकाद

आर्बा माघ.

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नाना स्वामीचे सेवेसी.

पौष्यें गणपतराव भिकाजी रास्ते कृतानेक नमस्कार विनंती. उपरी: येथील क्षेम तागाईत माघ वद्य द्वादसी भोमवार पावेतों वर्तमान येथाथित असे विशेष श्रीमंत राजश्री दादासाहेबांची आज्ञा घेऊन लस्करांतून निघालों ते माघ वद्य येकादसी सोमवारी वाईस आलो. आपणास कळावें. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ आसो द्यावा, हे विनंती.

¶*Ganpatrao Raste informs Nana Fadnis of his arrival at Wai from the camp of Dadasaheb.*

No. 15] [*9-2-1774*

श्रीशंकर.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखारामपंत बापू स्वामीचे सेवेसी.

पो त्रिबकराव विश्वनाथ कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २७ जिलकाद जाणून स्वकीये लेखन करित जाणे विशेष. श्रीमंताचे लस्करांतून राजश्री बाबूजी नाईक व रो कृष्णराव काले वगैरे ग्रहस्त आले म्हणून वर्तमान ऐकिले. त्यास ते कोणते आशयाने आले हे समजले नाहीं. दुसरें त्यानी आपणासहि येऊन भेटावे आसेहि ऐकिले. त्यास आपणास येऊन भेटतील. तिकडील राजकारण आपणासी काही बोलतील ते आपण ऐकून करणे ते करतील. कदाचित आमृतराव याचे राजकारण आणले आसले तरी कबूल करून त्याजला आपल्यात मेलऊन घ्यावे. पुढे आसल निर्माण जाहालियास नकलेस कोण विचारितो? याजकरिता सूचला मजकूर लिहिला आसे. आपणास चांगले दिसले तसे आपणहि समजोनच करतील. आल्या ग्रहस्तास खटे न करावे. तूर्त सामिलातसि उपयोग पाडून घ्यावा. हे येके प्रकारे प्रसंगानुसार तूर्त उपयोगास पडेसे आसल्यास मेलऊन घ्यावे. मुख्य करण्यास अनायासे उपाये योजून आल्यास तूर्त टाकू नये; परंतु खरे लटके या गोष्टी ताडून समजोन करणे तसे करावे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बहुत काये लिहिणे हे विनंती. बागलकोटी तोफ सरकारच्या गावाबाहेर चांगल्या धड आणि मातबर गाड्यावर तयार आहेत. आम्ही येथें राजश्री आनदराव भिकाजी रास्ते यांस सांगितले आहे. तथापि तुम्ही मुजरद कारकून रा करून तोफास बैल वगैरे सरजाम होऊन लस्करांत आम्हाकडे येत ऐसे जरूर जाले पाहिजे. उपयोगास पडतील. मातबर भारी आहेत. कदाचित साहिल्य बनोन न येत तर किल्यांत तरी न्याव्या. नच बने त्या पक्षी तसे तरी व्हावे, याकरिता लि॥ असे. हे विनंती.

¶*Trimbakrao Vishvanath to Sakharam Bapu inquiring as to why Babuji Naik and Krishnarao Kale had gone to the addressee from Dadasaheb. "If the intention of their visit be the proposal regarding Amritarao," the writer says, "you would readily consent to it. A copy is not valued when the original comes forth" (meaning that if a rightful claimant is born, this spurious one Amritrao will have no value). The writer also requests to make arrangements for removing the Bagalkoti guns.*

No. 16] [*9-2-1774*

पौ छ २ जिल्हेज सुा

आर्बा सबैन फाल्गुन.

श्री.

शेवेसी भास्कर बलाल जोसी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता छ २७ जिलकाद पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री पांडुरंगपंत गडबोले गंगापुरास आले. आनंदवलीचा बंदोबस्त केला. अंताजीपंत सावरकर कारभारी होते, त्यांस समागमे गंगापुरास नेले. आनंदवलीस पैका सिलकेस नाही. याजकरितां लक्षभोजन व अनुष्ठाने सहजच राहिली. मजला सांगितले कीं, आनंदवलीची देखरेख करणे आणि पुण्यास लेहून आज्ञा येईल त्याप्रो करणे. त्याजवरून कुटुंब गंगापुरास ठेऊन त्याणी सांगितल्याप्रो देखरेख पाहातो. राजश्री नारो आपाजी नाना याणी पेसजी माघअखेरपावेतो खर्चाचे भरतीचा ऐवज गोविंदराव कृष्ण परांजपे याजकडून अंताजी राम यांचे तसलमातीस लेहून नासिकास देविला होता. तो ऐवज त्याणी दिल्हा नाहीं. उठोन पुण्यास गेले. याजमुळे ऐवजाची वोढ जाहाली. झाल्या अनुष्ठानाची दक्षणा ब्राम्हणास द्यावयासी पैका नाहीं. यामुळे सारे ब्राम्हण वाड्यांत भोजन करून उगेच बसले आहेत व आश्रित वगैरे यांचा येक महिना रोजमरा देणे आहे व सेव्याचे उचापतीब॥ दोन हजार ऐवज देणे आहे. येकून पाच हजार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ऐवज असल्यास माघअखेरपावेतो ब्राम्हणांचे दक्षणा सुधा फडशा होतो. येविसी आज्ञा होऊन पुढे फाल्गुन मासापासून आनंदवलीचे खर्चाची नेमणूक करून द्यावयाची आज्ञा जाहाली पाहिजे. पांडुरंगपंत याणी सांगितले त्याजवरून मी आनंदवलीचे कामकाज पाहातो. परंतु स्वामींचे आज्ञापत्र येईल त्याजप्रो वर्तणूक करीन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Bhaskar Ballal Joshi asks for money for the expenses at Anandwalli, evidently for the establishment and concerns of Raghunathrao.

No. 17] [*9-2-1774*

श्री

शेवेसी रंगो गोपाळ विज्ञापना ता। छ २७ जिलकाद प्राथःकाळ. रो। मोरोबा दादा काल कूच करून मुकाम मोसीचा[1] केला. नारो आपाजी व आपाजीपंत गेले होते. त्याचे याचे खलबत फार वाडखू (वाढूळ) जाले. तेथून नारो आपाजी घरास गेले. उदास होते. आज वाड्यात आले नाही. आपाजीपंत आतकोस पोहचावीत गेले. तेहि निरोप घेऊन वाड्यात आले. नारो आपाजी परवाचे दिवसी दादाकडे गेले. त्याचे याचे बोलणे जाले. मोराबाची उदासीपण पाहिले. जावयाचा मजकूर काढिला कीं, येथे राहात नाही. सिवनेरीस जातो. सर्वाणी येद्यतार्थ केला तो उतमच केला. त्यात नानाची मर्जी रक्षावी, क्रियेस गुंतलो. सर्वाबरोबर मरणे खरें; यैसे उदासपण दाखविले. येविसी नारो आपाजीनी आपणास लिहिलेच आसेल. गावात लोक बोलतात जे, दादास निराळे टाकले हे वाईट केले. हे उगेच राहाणार नाही. जैसे बापू नाना येक जाले त्याप्रो मसलतीस यास घ्यावे. हे न केले. याप्रो बोलतात कालचा मुकाम मोसीचा, आज खेडास राहाणार, उदईक सिवणेनेरीस जाणार. त्याचे मर्जीचा भाव काही समजत नाही. काये करील हे न कले. दादाची बायको परवाचे दिवसी रात्री आली, त्यासमेत गेले. समागमे राऊत दीढसेपर्येंत होते. साराऔश सर्वाचे मते दादासी विपरोध दाखऊ नये. आपले पत्र बहुधा दादास आले आसेल यास्तव गेले आस्तील. आथवा आपणास लिहिलेच आसेल. आपाजीपंतास निरोप सागितला. ते आज आपले भेटीस येणार. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶The writer Rango Gopal discusses the propriety of the question of keeping Morobadada outside the confederacy of the Barbhais and finally says that he should have been persuaded to stick to the plan. The writer also mentions the indifference of Morobadada and his departure for Shivner.

---

१ पुण्याचे उत्तरेस १२ मैल आळंदीजवळ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 18] [*10-2-1774*

पौ छ ६ जिल्हेज.

श्रीनकल.

राजश्री नागोजी सिंदे गोसांवी यासी.

श्री रघुनाथ बाजीराव प्रधान आसीर्वाद. सुा आर्वा सबैन मया व अलफ. पुण्यातील वगैरे कितेकानी फितूर करून बदराहा वर्तणूक करू लागले, हें जाणोन राजश्री त्याचे हाती न चढावे, या आर्थे तुम्ही सातारियाचे किल्यावरी राजश्रीस नेऊन ठेविले. बंदोबस्त येथील मर्जीस येईसारिखा केलात म्हणून ऐकिल्यांत आले, तेण्हेकरून तुम्हावर मर्जी बहुतच संतोष जाहाली असे. फार उतम केलें. हरामखोर आपले ढंगास प्रवर्तले तशा समयांत दूरंदेसी मनांत आणून खावंद चाकरीवर द्रुष्ट देऊन मनसुब्याची गोष्ट केलीत. शाबास, तुमची तारीफ पत्रीं काये ल्याहावी ? याउपरीहि बहुत सावध राहाणे, तुम्हाकडे ते पेगाम तऱ्हेतऱ्हेने लावितील. ते तुम्ही चितात आणणार नाहीं हे खातरजमाच आहे. तथापि सूचना लिहिली आहे. तरी राजश्रीस किल्यावरच ठेऊन, फितवेखोराचे हाती न लागत ते गोष्ट करणे. खासा स्वारीहि माघारी फिरली. दरमजल येऊन पोहचत आहे, तोपावेतों तुम्ही सावधगिरीने राहून, बहुत बंदोबस्त करणे, येविसींचे बंदोबस्तास हुजुरून रा रामचंद्र नारायेणहि पूर्वीच रवाना केले आहेत. ते पावलेच असतील. ते व तुम्ही येकविचारे बंदोबस्त करणे. जाणिजे छ २८ जिलकाद आज्ञा प्रमाण.

¶*Raghunathrao to Nagoji Shinde of Satara complimenting him for having removed the king to the fort quite away from the machinations of the Barbhais of Poona whom the writer condemns for their treachery.*

No. 19] [*11-2-1774*

श्रीशंकर.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखाराम भगवंत बापू स्वामीचे सेवेसी.

पो त्रिंबकराव विस्वनाथ सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जावे विशेष. प्रथम प्रकार जाला, त्या कालीं विस्तरपूर्वक आपण पत्र पा ते पावले. त्या उपरी पुढील उद्योगाप्रा योज्यना सज कोणेविसी कसकसा केला, श्रीमंताजवळ नामी सरदार व पागा, त्याचे कसे जाले, तोफ-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
खान्याचे कसे जाले, इत्यादिक समजले पा (पाहिजे). स्वतंत्र मोगलाचेहि समजले पा. तोफखानाहि तिकडे, गाडदीहि तिकडे, पागाफौजहि तिकडे, केवळ ब्राम्हण मंडळी इकडे. येसे जाल्यास कसे सोईस पडेल? यास्तव या गोष्टीचा विचार तुम्ही केलाच असेल. आम्हासहि कलावा. आम्हाजवळ फौज हुजरातची ती शेर याची पागा मात्र दोन तीन तेवढा यैवज. त्यास व वरकड आहेत त्यास नालबंदी पैा गोड वाटेसे द्यावे. रोा (रोजमरा?) वरचेवर द्यावा. उमेदीचे बोलणे बोलावे, ते पुढे प्रमाणात यावे, नाहीं तर कर्नाटकात तीन वर्षे जिवाभ्य श्रम लोकानी केले. ज्यास चाकरी घेणे पडते त्यास हुकूम जरब राखोन, त्याची उमेद खुशालीहि राखावी लागते. त्या गोष्टी परिणामास न गेल्या म्हणजे पत खोटी येकदा जाली म्हणजे पुढे फिरोन सचोटी पडणे संकट पडते. असो. इत्यादिक गोष्टी घडल्या. परंतु या प्रसंगी तो प्रकार ल्याहावयाचे कारण या प्रसंगी उपयोगी नव्हे. तथापि पुढे पेच पडतील या करिता उगेच लिहून सुचविले. नवी फौज कांहीं भरवशाची आसामी (आसामी) नजरेस आल्यास तूर्त पडिला प्रसंगाकरिता ठेवावीहि लागेल. मबलग खर्च एसे हे कर्म दिसते. इतकेहि आपणास ठाऊकच आहे. सर्व आगी शेकलेले आहे. असो. तूर्त चौघे मातबर येथे जमा जाले व होणार. त्यापक्षी सर्वांचा उचित प्रकारे जवाहीर, हती, पोशाख, कितेकास लौकिकास आणे वाढविणे, पदारूढ करणे, हेहि प्रसंग पडतील. तेहि प्राप्त जालेपक्षी समर्पक केले तरच चांगले दिसेल. नाहीं तर मिठाचे उणेपणानें लवणशाकच वाईट होईल. असो. सर्व गोष्टी सुचऊन पहिल्याच घ्याव्या. तितके समजोन प्रवृत जालेयास चिंता नाहीं. करावयाचे ते ते त्या प्रसंगी केलेच पा. येथे बा (बंदोबस्त) कांहींच नाहीं. कापड येक सनंग नवते. तेव्हा पैठणचे वगैरे पंधरावींसा हजारांचे खा (खरेदी) केले. आणखीहि करावे लागेल. जवाहीर दागिने बा समयोचित असावे. आणि द्यावयाची कुले बा (बरोबर) आहेत. दुसरी प्रसंगानरूप भेटतील तेव्हा पा. याची योज्यना तरतूद अगोदरच असावी. तर दागिने येणे प्रा व कापड पा. बिता.

दागिने किमतीचे अजमासे सुमार

१३ मोत्याचे चौकडे वगैरे

५ हजारा पा (पासून) तीन हजारा आलिकडे दर किमत या प्रा चौकडे सुमार.

५ मध्यम चौकडे पाचाशा पा हजाराबाराशा पावेतो

३ कंठ्या दोन तीन, दोन हजार पा च्यार हजार पावेतो.

१३

516

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

५ जेगे तीशा पा सातशेपर्यंत सुमार
५ सीरपेच चौशावर हजार बाराशे.
दीड हजारपर्यंत येक दुसरा.
५ पदके हलकी दोन तीन, उंच दोन या
१ मोत्याचा तुरा असला तर येक दुसरा.
२ कडी जडावाची जोड, उंच १ व मा १
—
३१

सनगे अजमासे सुमार.

१० मोगलाचे उपयोगी पोशाख चिरेगोस पेराव पटके मोहमुद्या बुटेदार याप्रमाणें.

५ उंच चांगले
५ मा
—
१० दहा पोशाख.

१५ धुवट मोहमुद्या व पागोटी सनगे सुमार

५ मंदले पैठणी उंच व मा
२ उंच
३ मा
—
५

१० किमखाप जरूर पा
उंच मा मिळोन सुमार

१०० मश्रू सुमार
—
१४०

येणे प्रो सरंजाम असावा तर प्रसंगी पेच पडणार नाहीं. सिलकेस राहील. जरूर लागेल तितकाच खर्चहि होईल. रा छ २९ जिलकाद हे विनंती.

¶*Trimbakrao Vishvanath to Sakharam Bapu offering very prudential considerations on the situation in general created by the Barbhai's opposition to Raghoba. He finally requests the addressee to make the necessary monetary payments and presents to keep the soldiers pleased and make them exert with zest.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 20] [*11-2-1774*

पैा छ १२ जिल्हेज.

श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी.

पो त्रिबकराव विश्वनाथ सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जावे विशेष. आम्हासमागमे फौज आहे. त्यास खर्चास यैवज पाहिजे. त्याविसी राजश्री सखाराम भगवंत बापू यास पत्र रुपये ३००००० तीन लक्ष रुपये राजश्री राघोपंत आईतोले पथकसुधा पाठविले आहेत याजबरोबर पाठऊन द्यावे म्हणोन आलाहिदा पत्र लिहून पाठविले आहे. हे पत्र राजश्री सखारामपंत बापू व राजश्री नाना फडणीस व राजश्री दादा आसतील तेथे त्याजकडे पा. त्याची परवानगी आणून येक दिवस उशीर न लाविता सत्वर रा सोलापुरचे सुमारे आमचे लस्करास येऊन पोहचतसे करणे. आणखी दोन तीन लक्षाची तरतूद जरूर पा. तर लौकर करून ठेविली पा. रा छ २९ जिलकाद बहुत काये लिहीणे, लोभ असो देणे, हे विनती.

¶Trimbakrao Vishvanath to Naropant Nana requesting him to see Nana, Bapu and Dada and to arrange to send three lacs of rupees for the expenses of the army at once.

No. 21] [*13-2-1774*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री हरिपंत तात्या स्वामीचे शेवेसी.

पोष्य भवानी सिवराम कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल फाग शुध त्रितीया रविवार मु॥ नजीक नांदेड जाणून स्वकीये कुशल लिहित जावें विशेष. रा तात्याचे पत्र खर्डे याजपासोन आले. त्याजवरून संतोष जाहला. त्याचा तपसील काय ल्याहावा ? तात्याकडे श्वार पा आहेत. आज अगर उदईक येतील; येथील तपसीलवार वर्तमान राजश्री नाना व बाबुरावजीस आलाहिदा पत्री लि॥ आहे, त्याजवरून निवेदन होईल. पहिले उभयतानी अवगत केलेच आहे. आणि स्थाईभाव आपले लोभाची चटक किती लागली आहे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हे आपले ध्यानांत आहेच. मनोमय साक्ष आसे. तात्या, इश्वर कृत्यास कोणाचा ईलाज नाहीं. ज्या काळी जो योग घडावयाचा तो घडतो; परंतु जगदात्मा सर्वज्ञ आहे. जैसा ज्याचा मनोभाव तैसाच अनुकुल करितो. त्यांत सूक्तअसूक्त आचरण तदनसार फल देतच आहे. आमचा मुरबी मरावा आणि आम्ही वाचावे, उत्तीर्णता न घडावी, तस्मात आत्महत्याहि श्रेयस्कर! आपण संनिध असतां बंदोबस्तास उणे पडलें, हा दुरारोप जनचर्चेस उचित पडावा, आणि आमचा त्राता प्राण जावा, आम्ही दीन व्हावें यातील अर्थदृष्टे वोलखीच जाणतील. हे भाव पत्री कोठवर ल्याहावें? विस्तार आहे. असो श्रीजीसें[1] करणे रा। मामाहि वष्य जाहले, पडदा राहिला नाहीं. येथील समुचय भारी जाहला. मातुश्रीहि यासी गुंतली याउपरी उतम उतम दिसते. देव उतम करील, पत्रामागेंच येऊन पोहोचलों, कळावें, बहुत काय लिहिणें? लोभ कीजे हे विनंती.

¶*Sabaji Bhosle's Diwan Bhavani Shivram to Haripant Tatya expressing his regret for his inability to rise to the occasion. The writer further informs the addressee of the amicable settlement of the internal affairs of the Bhonsles by Trimbakrao Mama.*

No. 22] [*14-2-1774*

श्री

श्रीमंत राजश्री हरीपंत तात्या स्वामीचे शेवेसी.

पोष्य केसो महादेव[2] कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २ जिल्हेज पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. बहुत दिवस स्वामीकडून पत्र येऊन माझा सांभाळ होत नाही तेणे करून चित्त उदास आहे. निरंतर पत्र पाठऊन सांभाळ केला पाहिजे. हलीं परस्परें ऐकितों कीं, पूर्वप्रमाणे सुदिन जाला. आपण श्रीमंत मातुश्री बाई साहेबाबरोबर पुरंधरास गेला म्हणून ऐकिलें. ऐशास ईश्वराजवळ ईच्छा करीत होतों तेच देवानें दिले. त्याजवरून फार संतोष जाहला. तो लिहितां येत नाहीं. वडिलांचे पाठीमागें स्वामी मजला वडील आहेत. कोणे गोष्टीविसीं मी काळजी करावी ऐसे नाहीं. बेफिकीर असे. आमचे रोजगाराविषई अकार नामक यांणीं श्रीमंत राजश्री नाना याचे मनांत कांहीं विकृती येई ऐसें सांगितले असेल; त्यास श्रीमंताचे मनांतील विकृति

---

१ श्रीसत्ता करील तें खरें. २ हा पुढें आनंदीबाईजवळ नानाचे तर्फे कारकून आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

निघोन ममता करीत ऐसे करणार आपले खेरीज कोणी नाहीं. दरबारांत आमचा बग वसिला आपले खेरीज दुसरा कोणी नाहीं. हें सर्व स्वामीस विदितच आहे. येविसी राजश्री आनंदरावजीनी पत्र लिहिलें आहे त्यावरून सविस्तर कळेल. पत्रोत्तर पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. पत्र वाचून फाडून टाकावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Keso Mahadeo to Haripant Tatya, soliciting his patronage and requesting him to remove the misgivings in the mind of Nana about the writer.*

No. 23] [*14-2-1774*

पौा छ १३ जिल्हेज सन आर्बा.

श्री.

श्रीमंत राजश्री बापू स्वामीचे सेवेसी.

पोष्य येशवंतराव गंगाधर विज्ञापना. येथील वर्तमान फाल्गुन शुध चर्तुदशी पर्यंत निंबगावीं असो विशेष. तीर्थरूप तात्यांचे शरीरीं आकस्मात ज्वर होऊन तीन च्यार दिवस समाधान नवते. शुध ११ येकादसीस दिवंगत जाले. आम्हांस दुखार्णवांत सोडून परलोकास गेले! आतां त्यांचे ठिकाणीं सर्व प्रकारें वडील आपण आहेत. तीर्थरूपांमागें त्यांचे स्वरूपाप्रमाणें आमचा प्रतिपाल करणार वडील तुंही आहां. दिवस जालियावर दर्शनास येऊं. बहुत काय लिहिणें. कृपालोभाची वृद्धी करावी. हे विज्ञापना.

¶*Yeshvant Gangadhar to Sakharam Bapu informing him of his father's demise.*

No. 24] [*14-2-1774*

पौा छ १६ जिल्हेज

श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
सखारामपंत बापू स्वामीचे सेवेसी.

पोष्ये त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २ जिल्हेज मु॥ नजीक नांदेड वर्तमान यथास्थित असे विशेष.

---

१ सबंद पत्र मामांच्या हातचें असून पैवस्ती नाना फडणविसांचे हातची आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपण पत्रें पाठविलीं ती प्रथम व दुसरी व तिसरी रा॥ नारो आनंदराव याजबा॥ पाठविलीं तीं पावलीं. प्रथम पत्रें येतांच येथील येकवाक्यता करून, प्रत्योतरे खिजमतगार आले होते त्यांबा॥च पा॥. ती पावलीच आसतील. त्यावरून विस्तरे सर्वहि मजकूर कलेल. दुसरे पत्र सालू सुपेकर बोथाटीबारदार याजबा॥ पा॥ तेहि नवे दिवसी पावले. तों मागाहून नारोपंतहि आले. दोन्ही पत्राचे रा॥गीचा मजकूर कलला. मुख्य गोष्ट थोरले बाईचे अनुमते सौ॥ पार्वतीबाईचे विचारे श्रीमत मातुश्री गंगाबाईचे सरक्षण गर्भसहवर्तमान व्हावे. सर्वतोमुखी अनुचित भावी जाणोन उभयतास किले पुरंधरास आणिली. किले सातारा आदिकरून किल्यांचा बंदोबस्त केला. मोगल निक्षूण आपला करून ठेविला. सर्व मंडली पकेपणे येथे येक जाली. तुम्ही तेथे येक होऊन लौकर कूच करून यावे. खर्चाविसी चिंता करू नये. स्वार आले म्हणजे यैवज पा॥ देतो. आपले हाते लि॥ कीं, 'तुमचे भरवशावर आम्ही केले.' त्यास सर्व जनास असह्य जो प्रकार बायकांस बंद करून ठेवणें, स्त्रियांचे चित अधैर्य त्याणी आक्रोश करणे प्राप्त, तेव्हा त्यांचे पदरचे अन्न भक्षिलेले सर्व असतां उपेक्षा करणे हेहि अनुचित यास्तव प्राप्त जाले करणे तसे केले. दौलतेचा वारसा आम्ही कोणी श्रीमंतासी करीत नाहीं. स्त्रियांचे परिपालन, गर्भसंरक्षण, पोषकज्यनसमुदायेष्वभयदान न दिसोन करणे अगत्य जाले, त्यापक्षी दुसरा विचार आहे यैसे नाहीं. सर्व प्रकारे खातरजमा असो द्यावी. थोरली मसलत आहे. या प्रसंगी आपण फौजेत येऊन फार श्रम न होत तर आपले मसलतीने आम्हीं व आणखी सरदार मेहनतीस अंतर करणार नाहीत. येकास दोन म्हणजे दुपट बल. तोंडावर आपण आम्हीं असतां मागे फारसी चिंता पडणार नाहीं. राजश्री नाना फडणीस व हरिपंत फडके मागे असल्यास चिंता नाहीं. राजश्री मोरोबादादा येक काम स्वतंत्र आटोपतील. चौघानी च्यारी तनवा धरल्यावर सिबीरें[1] उभे राहाते. तुम्हांस सर्व कलत असत आम्ही वारंवार ल्याहावे काये? आम्ही चुकलो तरी फल सर्वास. यासाठीं आवघ्यानीं साहित्य पुरऊन बाजी[2] सेवटास न्यावी. तोफखाना तर तेथील निघणे कठीण. त्यापक्षी पुणे व मुतकवीच्या[3] तोफा सडे स्वारीच्या उपयोगी दाहा बारा बेश त्यात लंबाछडा[4] दोन तीन या प्रकारे गोलंदाज वगैरे साहित्य सुबक चांगले लौकर होऊन तयारी होयेसे करावे. यास्तव नारोपतास निरोप दिल्हा असे. पुढील सुचले प्रकारे निभावणुकेचे मजकूर व प्रस्तुत करण्याचे व पैक्याचे तरतुदेचे व

---

१ राहुटी; तंबू.

२ मसलत.

३ कर्नाटकांत गांव आहे.

४ तोफेचा एक प्रकार.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मोगल लौकर आम्हास अनकूल पकेपणे व्हावयाचे विसीचे बोलणे बोलून जलद पोहचावे म्हणून सांगून पा आसेत. यास लिहिले प्रकारे सांगोन तोफखान्याची तरतूद उत्तम प्रकारे लौकर करवावी. वरकडहि लिहिल्या अन्वये व सागोन पा प्रा पोल्ती तरतूद व्हावी. येथील वर्तमान राजश्री सेनासाहेबसुभे रघोजी भोसले श्रीमंती केले त्यांस मातुश्री दर्याबाईसुधा आपले लगामी क्रिया शपतपूर्वक लाऊन घेऊन फौजसुधा बा घेतले. राजश्री साबाजी भोसले नानाहि खातजमेने बा घेतले. दोन्ही सरदार बागवणे कठीण. तथापि लौकीकें[1] दोघाची समजावीस वारवार भेटी करून गोडी केली. सेनासाहेबसुभ्याविसी साबाजी भोसले याणीहि मसलत सेवटास जाये तो अक्षर बोलू नये. पुढेहि आमचे विचारे होईल तसी सोई करून देऊं. परंतु दाहा हजार फौजेचे सरदारीत उणे न व्हावे. मग कोणेविसी आग्रह नाहीं. मातुश्री दर्याबाईने सर्व दौलतेचा यख्तियार आम्हावरच ठेविला. त्यापक्षी सेनासाहेबसुभाहि घरीच आला. परंतु दोन्ही सरदारीत पैक्याचे नाव नाही. पोटास दिल्हे तर लोक बंदोबस्त उपयोगी पडे यैसे पके करितां येईल. या करिता या मसलतीस पैका फार लागेल यैसे वारंवार लिहिणे लागते. विना साहस उदारता प्रसंगासारखी केल्याखेरीज आपली बाजी सेर होणार नाहीं. वारंवार आपणहि विस्तारे लिहितात म्हणून या पत्री विस्तारे लि॥ असे. हुजरातचे फौजेस पैसा पावला नाहीं. तिची नालबदी दिल्ही पा. हालीमाजीचे[2] दिवसात सर्वाचे मनोधारण करणे प्राप्त, तेव्हा देणेहि सढळ दिल्हाखेरीज येकवाक्यता सर्वाची होणार नाही. आपण अवलंबिले तसे साहित्य पुरऊन सेवटास न्यावे तरच केल्याचे सार्थक. याउपर दरमजल पंढरपूरचे सुमारे येत असो. लिहिल्याप्रकारे रात्रदिवस तरतूद करून साहित्य होय. जडाव पडेसे करावे. कितेक मुखवचने नारो आनदराव सांगतां कळो येईल. बहुत काये लिहिणे. लोभ असो दिल्हा पाहिजे. हे विनंती.

¶*Trimbakrao Vishvanath to Sakharam Bapu acknowledging the receipt of a detailed letter informing him of the progress of events at Purandhar, the removal of Gangabai and Parwatibai with the consent of Gopikabai, and with the intention of protecting her, not of claiming the Peshwaship against Raghoba. The writer further describes the monetary difficulties of the Bhonsles and requests the addressee to secure them in their cause by offering some monetary assistance to them.*

---

१ लौकिकांत. २ क्रान्ति, बखेडा, धामधूम.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 25] [*4-2-1774*

पैा १६ जिल्हेज

श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
मोरोबादादा स्वामीचे सेवेसीं.

पोष्य त्र्यंबकराव विश्वनाथ कृतानेक सा. नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २ जिल्हेज मु॥ नजिक नांदेड गंगादक्षणतीर जाणून स्वकीय कुशल लिहित असावें विशेष. राजश्री सखारामपंतबापूनी व राजश्री नाना फडनीस यानी किले पुरंधरचे मुकामीहून पत्रें पाठविलीं व राजश्री नारो आनंदराव याजबरोबर कितेक प्रकारें मसलतीचा मजकूर सांगोन पाठविला तो सविस्तर ममारलेचे सांगितल्यावरून व पत्रावरून कलला. पहिली उभयतांची व आपली पत्रें आलीं होतीं. त्यांची उत्तरें तेव्हांच पाठविलीं. त्यावरून कललेंच आसेल. ही मसलत विलग कोणेकेविसीं पडल्यास कठीण. पैक्याची अनुकुळता पोख्ती. पैकीं भोसल्याचे फौजेस खर्चास आम्हांसच द्यावें लागतें. दुसरी तोड नाहीं. राजश्री रघुजी भोसले सेनासाहेबसुभे व मातुश्री दर्याबाईहि युक्तीनें आणून राजश्री साबाजी भोसले नाना त्याची याची भेट परस्परें रहस्यें करून करून जाहिरान्यांत गोड केलें. पैक्यामुलें फौज बेदील. तिजला पोटास आम्ही देऊं लागलों म्हणजे ती सर्व आपले लगामी लाऊन घेतां येईल. मग वसवसहि[1] धरावा नलगे. तों पर्यंत दरणीपारणी, कुच्यास खोलंबा ऐसे टंटे[2] पडतात. यास्तव तूर्त मसलत तों पोटास द्यावें. पुढें समजोन घेतां येईल. आम्हां जवळ सर्व संतोषें आमचे विचारें असतां जे या उपर लिहिणे तें आम्हांसच लिहून सुचवावें. देणे ते आमचे हातून पावल्यानें आळा[3] राहिल. नाहींतर निरनिरालीं बंडें होतील. हाहि प्रकार आपले ध्यानांत असेलच; सुचविलाहि असे. कितेक मुखवचनें नारो आनंदराव सांगता कळूं येईल. बहुत काय लिहिणें, लोभ असों दिल्हा पा, हे विनंती.

¶*Trimbakrao Vishvanath to Morobadada informing him that the writer has to advance money to the Bhonsles for the upkeep of their forces because the Bhonsles have been short of money. The writer further says that he has tried to bring together the discordant elements in the Bhonsle household.*

---

१ संशय, भीति. २ तंटे, तट, अडथळे. ३ आळा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 26]

पो छ १६ जिल्हेज. [14-2-1774

श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री हरीपंत

तात्या स्वामीचे सेवेसी.

पोष्य त्र्यंबकराव विश्वनाथ कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २ जिल्हेज मु॥ नजीक नांदेड गंगा दक्षणतीर जाणून स्वकीय कुशल लिहित असिले पाहिजे विशेष. राजश्री बापू व राजश्री नानानी पत्रीं मसलतीचा मजकूर सविस्तर लिहिला, त्यावरून व राजश्री नारो आनंदराव यांच्या सांगितल्यावरून तपसीलवार कलला. पहिली बापूंची व नानांची व मोरोबादादाची पत्रे आली होती. व तुम्ही लिहिले होते त्यावरून आम्ही येथील सर्व मंडळीची येकवाक्यता करून सिध जाले. इतक्यात दर्याबाई फौजसुधा परभारी बराडात दुरून चालली. हे ऐकोन राजश्री साबाजी भोसले विचारात पडले. याजकरितां इकडेच मुकाम करून बाईस आणून खातरजमा करून भेटी करून समागमे घेतली. तुम्ही मनसब्याची शकेल[१] बांधोन सर्वांची येकवाक्यता केली. याची मेहनत तुम्हास फार पडली. खावंदांचे कार्याकरितां येकनिष्ठेस्तव जो कोणी उद्योग केला तर त्याचा साहाय ईश्वर होऊन तो अर्थ सिधीस जातो. श्रीकृपेने सर्वास येश येते. चिंता नाहीं. कितेक प्रकारे लिहिल्याअन्वये राजश्री बापूचे येणे व तुमचे येणे लस्करात व्हावे. राजेश्री मोरोबादादानी येक काम स्वतंत्र आटोपावे. राजश्री नानानी सर्व संभालावे; याप्रकारे जाल्यास फार उतम. रा॥ छ २ जिल्हेज बहुत काये लिहिणे. लोभ असो दिल्हा पा॥. हे विनंती.

सेवेसी त्र्यंबक हरी वर्तक कृतानेक सां नमस्कार विनंती. मी श्रीमत राजश्री मामाजवल आज्ञेप्रो वर्तणूक करून आहे. कृपा करितात. कलावे लोभ असावा. श्रीमंत राजश्री बापूस व श्रीमंत नानास नमस्कार सांगावे, हे विनंती.

¶*Trimbakrao Vishvanath to Haripant explaining how he effected a reconciliation between Daryabai and Sabaji Bhosle and secured their help. The writer compliments the ministers at Poona for the unity which they have shown in their difficult undertaking against Raghunathrao.*

+ पैवस्ती नानाफडणिसाच्या हातची. १ कारस्थान.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 27] [*15-2-1774*

पो छ १० जिल्हेज.

श्री

श्रीमंत राजश्री सखारामपंत बापू स्वामीचे शेवेसी.

पोष्य भवानी सिवराम कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल फाल्गुन शुध पंचमी भोमवासर मुकाम नजीक नांदेड जाणून स्वकीये कुशलले-खनाज्ञा जाहाली पाहिजे विशेष. आपण राजश्री कृष्णरावतात्यासी पाठविले ते काल इंदुवारी रात्रौ येऊन दाखल जाहले. आपली पत्रे येजमानास आहेत त्याजवरून व मारानिलेच्या मुखोद्गत सविस्तर कलो आले. अविलंबे पढंरपूरच्या सुमारें यावें म्हणोन लि॥. त्यास येथील उत्कंठता राजश्री नाना जोसी याणी निवेदन केलीच आहे. पत्र येण्याविसी मात्र प्रतिक्षा होती ते जाहाली. याउपरी किमपि गुंता नाहीं. उदईक कूच करून दरमजलीने येत असों. पहिलेपासोन लक्ष येकच आहे. हे सरदारी आपले हाते घडली आहे; याचा उपयोग दुसरा होणार नाहीं. आणि आपण इकडील उणाव पाहाणार नाहीत. मी सेवक आपला स्थापित आहे. येकनिष्टपणे चाकरी घडेल. वरकड येथील विसंचाचा संच करणे हे अर्थ येथून ल्याहावे यैसे नाही. सर्व चिंता आपणास आहे. बहुत काये लिहिणे, लोभ कीजे हे विनंती.

¶*Bhavani Shivram to Sakharam Bapu, assuring him that his master would proceed to Pandharpur as desired by the addressee.*

No. 28] [*15-2-1774*

पो छ १३ जिल्हेज

फाल्गुन सन आर्बा.

श्री

श्रीमंत राजश्री बापु स्वामीचे शेवेसी.

विनंती शेवक बालाजी गणेश तालुके देवदुर्ग कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ ३ माहे जिल्हेज पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीचे पत्र छ २ जिल्हेजी आले. तेथे आज्ञा की "छ १८ जिल्कांदी श्रीमंत सौ. मातुश्री पार्वतीबाई व मातुश्री गंगाबाई यांसी पुण्याहून राजश्री नाना फडणीस व आम्ही येकत्र होऊन किले पुरंदरे येथे घेऊन आलो. हाली तमाम सरदारांस पत्रे पाठविली आहेत. फौजेनिसीं लौकरच जमा होतील. तुम्ही आपल्या

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तालुक्यांचा बदोबस्त राखोन हुशार राहाणे, आणि वरचेवर लिहित जाणे" म्हणोन आज्ञा, त्यास स्वामीचे आज्ञेप्रमाणे तालुके मजकुरचे किल्याकोटाचा बंदोबस्त करून, चौकीपहारा अलंगनोबत दुरुस्त राखोन हुशार आहो. स्वामीचे आज्ञापत्र या अगोधरच बातमी येथे आली की, खांसास्वांरी बाहीर निघोन दिव्याचे घाटाने सासवंडास दाखल जाहाली. हे वर्तमान येथे येतांच कोटकिल्याचा बंदोबस्त करून विनंतीपत्रे हुजुर व आपणास पाठविली ते प्रविष्ट जाहांलीच असतील. त्यांवरून सर्व निवेदन जाहालेच असेल. कृपा निरंतर असावी हे विज्ञापना.

¶*Balaji Ganesh to Sakharam Bapu, informing him of his having acted up to the orders received from the addressee.*

No. 29] [*15-2-1774*

पोा छ १० जिल्हेज.

श्री

राजश्री सखारामपंत बापू गोसावी यांसी.

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो सावाजी भोसले सेनासाहेब-सुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित असावे विशेष. राजश्री कृष्णराव नारायण आपणापासोन आले ते काल छ ३ जिल्हेज इंदुवारी दाखल जाहाले. आपली पत्रे व मुखोद्गत वर्तमान कललें. संतोष जा(ह)ला. मातुश्री गंगाबाई सगर्भ आहेत, याचें रक्षण जाहालें पाहिजे. मातुश्री पुण्यात होती. चौकीपाहारे याविसी नीट नाही. यैसे जाणोन उभयता मातुश्री सुधां कि(ले) पुरंधरास आलो. तुमचे अनुसंधान (राज)श्री बालाजीपंत नाना याजवल होते. खातरज(मेचीं) पत्रें पाहिली. त्यास पढरपूर(च्या) सुमारे लौकर येऊन पोहोचावे. या घरासी वडिली जोड केली आहे त्याचे सार्थक हेंच आहे म्हणौन विस्तारे लेखन केले. यैसीयांसि कायावाचा-मनसात्रिपुटी संकेत निश्चय याचा हाच की, आपणाकडे सिधांत यैसाच व्हावा, आणि आम्ही आपणाजवळ येऊन उभे राहावे. कुडी येथे आणि प्राण आपणाजवळ आहेत. राजश्री त्रिंबकराव मामा याच्या आमच्या भेटी जाहाल्या, परंतु लक्ष तेथेंच होतें. साप्रत आपणाकडूनहि मामासी हे गोष्ट

श्री
श्रीशाहूराजपदांभोज
भ्रमरायितचेतसः
बिंबात्मजस्य मुद्रैषा
राघवस्य विराजते.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

परिस्फुट जाहाली तेहि हमदेर[1] या कामावर आहेत. मातुश्री दर्याबाईकडील पायबंद होता तोहि * दस्तीच देवाने आणिला. याउपरी गुंता नाही. उदईक कूच करून दर मजल येत आसो. कळावे; साराश, दरमजल पत्रामागेच येत असो. बहूत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Sabaji Bhonsle assures Sakharam Bapu of his full support in the new undertaking.*

No. 30] [*19-2-1774*

[पहिला पाव बंद गहाळ]

धोंडोरामपंत व जिवाजी रघुनाथ यास अगोधर भेटोन त्यासह रुकनुदौला बाहांदर याची भेटी घेऊन सविस्तर अर्थ कलविला. त्याणी सर्व प्रकारे खातरजमा आपली व नवाबसुधा अकृत्रिमपणे केली. कोणेविसी संशय नाही, व निरालीहि भेट घेतली. पूर्व संधानाप्रो पुनरपि आणभाश जाहाली. कृष्णा उतरोन पलीकडे जावे यैसा मनसबा त्याचा होता, तो महकूब[2] करून कूच माघारे आजच मंदवारी करविले. दरमजल तुलजापुरच्या रोखे यावे यैसे करारांत आणिले आहे. इतक्यात मामाचे येण्याचा रोख असेल त्या सुमारे विसा पंचविसा कोसाचे अंतरे असावे यैसे निश्चयांत आणून ठेविले आहे. वरकड यैवजाचा मार आद्याप बोलण्यात आणिला नाही. कार्याचा अर्थ जसा द्रिष्टीस पडेल तसें बोलतां येईल. श्रीमंताकडून पत्रे नवाबास व धोंडोपंतास आली. त्यांतील अर्थ जे तुमचा आमचा घरोबा शपतपूर्वक जाहालाच आहे. प्रस्तुत कारभारी याणी राज्यांत फितूर केला आहे. त्याचे बंदोबस्तास जावयाकरिता माघारे फिरलों. रुन्कंदौला याणी फौजसह आम्हासमागमे जावयास सिध्ध असावे. मागाहून कोणी मातबर माणूसहि पाठवितों, " यैसी पत्रें आली होतीं. त्याची उत्तरें येथून गेली की ' साल मारी आमच्या प्रातांत तुमचे स्वारीमुळे व भोसले वगैरे फौजेचे पाईमलीने प्रांत बुडाला. हाली राजश्री मामा व भोसले याणी आमचे मुलकात बीड प्राते फारच गडबड केली आहे; यास्तव त्याचे बदोबस्तास आम्ही माघारे जातो. ' याप्राा लेहून पाठविले आहे. आबाजी माहादेवहि येक दोहो दिवसात येथे येणार. बातमीस दाहा जोड्या

---

१ हरदम; प्रतिक्षणीं. * ताब्यांत; स्वाधीन. २ तहकूब.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जासूद नेहमी येथे ठेविले आहेत. कळावे. मातुलाकडीलहि ग्रहस्त येथे आला होता. त्याजवल दिवाणजीही याप्रो खातरजमा करून कालच रवानगी केली. सारांश राजश्री कृष्णरावजी या जाबसालात आहेत, त्यापक्षी किमपि दिकत इकडून पडतच नाही. त्याची याची बोलणी खातरजम्याची पूर्वीच जाहाली आहेत. त्याचा प्रकार याच्या बोलण्यात आला. त्यांत खतरा काही राहिला नाही. वरकड सविस्तर नरसिंगराव येक दोहो दिवसी येत आहेत. आल्यानंतर निवेदन होईल. छ ३० जिलकादची पत्रे आली ते आजच पावली. त्याचे जाब घेऊन मागाहून रवाना करितो. फार काय लिहू? श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This appears to be a letter from the Nizam's court. The first portion of it is lost. The writer gives the purport of the letters received from and sent to Dadasaheb by the Nizam. Dadasaheb requested the Nizam to help him against the Barbhais while the Nizam regretted his inability on account of his province being overrun by Dadasaheb, Bhonsle and Trimbakrao Mama.*

No. 31] [*21-2-1774*

पो छ १४ जिल्हेज.

श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

हरीपत तात्या स्वामीचे शेवेसी.

पोष्ये त्रिबकराव विस्वनाथ कृतानेक साष्टाग नमस्कार विनती उपरी. येथील कुशल ता छ ९ जिल्हेज वर्तमान यथास्थित असे विशेष. तुम्ही पत्रे आपले स्वदस्तुरे सर्वांचे नावे वारंवार लिहून पा ती पावोन सर्व अर्थ कळून तुमचे लिहील्याअन्वयेच उद्योगास सादर आहो. रा अताजी रघुनाथ फणसे तुम्हास भेटून आले, त्याणी कितेक विस्तरे सागितले तेहि कलले. त्यास जिवाम्य श्रम करून तुम्ही सर्वांची जोड घालून येकवाक्यतेस आणिले. उतम केले. याचे सार्थक तेच कीं चौघे येकचित. येकाचे केसास ढका लागला तर सर्वास सोसू नये, निर्लोभपणे सर्वांनी वोझे येकादिलीने घेऊन, जो जसा ज्याचा जसी योग्यता त्याप्रा दौलतेतील माणूस जाणोन सर्वास आपले करून गाडा चालविला तर यश कीर्ति सारेच उतम. नाहींतर मागे जाले ते सर्वास अवगतच आहे. पुढे तसेच होऊ लागल्यास कलतच आहे. हे पके चौघाचे मत येक जाले तर केले श्रमाचे सार्थक. न जाले तर श्रम मात्र फल. सर्व विषई सुचले प्रकारे पैक्याविसी वगैरे लिहितो,

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्याची बेगमी तरतूद वरचेवर होऊन योजिले सिधीस गेल्यानेच आबरू; नाहीतर कठीणच आहे. याकरिता मोगलाचे ठीक असावे. सिंदे होलकर यावे. लिहिल्या-अन्वये येकवाक्यता असावी. कोणी कोणाचे उणे कधीहि पडू देऊच नये. यापेक्षा विस्तारे काय ल्याहावे? बहूत काये लिहिणे. लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनती. श्रीमंती आम्हावर यख्तियार देऊन स्वारीस पाठविले. निशाण सिके कटार आम्हावा दिल्ही असतां आम्ही काही येक प्रकार मनसब्याचे प्रकारे समजोन केला असतां त्याचा सेवट खावदानी लावावा, ही मर्यादा परंपरा चालत आहे. श्रीमंताचे केले मोडावे, परंतु सेवक लोकाचे श्रीमंती सेवटास न्यावे, हेच शेवा करण्याचे मुख्य फल. त्यास येविसी आम्हास दुसरे प्रकारे करण्यास सवड असावी आणि आमचे दुसरे प्रकारचे करणे सर्वातहि चागले. आणि ईश्वरासहि मानलें पा. त्यास अलीकडे दो चौ पत्री त्यांजकडून लिहिलेयात येत गेले कीं, तुम्ही करिता ते मर्जीस येणार नाही. साबाजी भोसल्याचे स्वरूपाविषई लिहिता तर मर्जीस येईल ते करू. फार वोढतात. तुम्ही तसेच आईकता, तर त्याचे पार[प]त्य करू, इत्यादिक नाखुसीचे शब्द लिहून पा, त्याच सवडीवर आम्ही श्रीमंतास उतर पा त्याची नकल करून पा आहे त्यावरून कलेल. राजश्री बापूस व नानास दाखवावी. छ मार हे विनती.

¶*The letter shows how sincerely Trimbakrao Vishvanath wishes success for the new undertaking of the Barbhais and how ardently he advocates the unity of purpose in all the workers. The writer further on asks for more money to meet the expenses of his campaign.*

[*February 1774*

No. 32]

श्री

नकल.

सिका.

तहनामा श्रीमंत राजश्री रघुनाथ बाजीराव प्रधान यांचा व नवाब निजामुदौले बाहादर आसफज्याहा यांचा जे. तर्फैनची दोस्ती जफरूदौले बाहादर यांचे मारफतीने ठरली. नवाब आसफज्याहानी, हालीचा बखेडा सखाराम भगवंत व बालाजी जनार्दन याणी मुलाचे नाव करून केला आहे, त्यांचा पक्ष सोडावा. जे सरकारचे दुशमन लाहानमोठे ते नवाबानी आपले मोजून[1] त्यांचे पारपत्यास सर्व

---

१ आपले असें समजून.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रकारे अनकूल असावे. मागील जाहाला प्रकार ते दोहोकडेहि मनात नसावे. आणि आता हा तह दोस्तीचा ठरला तो सेवटपर्यंत निभवावा. या कामसंमंधे नवाब आसफज्याहा यास नफा येणेप्रमाणे :

सखाराम भगवंत व बालाजी जनार्दन याणी मुलाचे

प्रथम कलम लिहिले आहे त्याखेरीज अणी

[अपूर्ण.]

¶*Treaty between Raghunathrao and Nawab Nizam-ud-dowla.*

No. 33]

[*21-2-1774*

पैा छ १४ जिल्हेज.

श्रीशंकर

पु॥ राजश्री नाना फडणीस स्वामीचे शेवेसी.

विनंती उपरी. ता छ ९ जिल्हेज वर्तमान यथास्थित आसे विशेष. आपण व राजश्री बापू व राजश्री मोरोबादादा व हरीपंत फडके येक विचार करून मनसबा केला. त्यास येविसी वारंवार फार ममतेने पत्रेहि आपण आम्हास पाठविली. त्यास पूर्वीच आपणाकडे रा॥ अताजी रघुनाथ आम्ही पाठविले होते ते पावोन सर्व मजकूर आपणास विदित केला. त्यास आजपर्यंत या दौलतेत सर्व मंडळी आप्तविषई सोयरेधायरे आसोन कोणे प्रकारे चाल जाली तो प्रकार सर्वास विदितच आहे. त्यामुळे कोणासच कोणे गोष्टीचा सांवर[1] बसून दौलतीचे वझे घेऊन यश आलेच नाहीं. पुढे तर येक खावंद शास्ता पोख्ता कर्ता असावा तोहि नाही. सर्वहि मानी. कोणाचे कोणी न आयकावे असे न व्हावे. सर्वानी येकावर भार द्यावा. त्याची योग्यता. असत्या पदार्थी, राजश्री बापू सर्वास वडील केलेले पुरुष त्याणीच आवघे डोईवर घेऊन करावे, आम्ही तुंम्ही सर्व त्यास आनकूल व्हावे. दोहीकडील सरदार मंडलीस त्याणी ममता शासन भयपूर्वक उचित उपयोगी जो जसा आसेल त्याचे तसे समाधान रक्षून वागवावे. हाच विचार पका येकमतेचा केला तर परिणाम; नाहीतर जे मागे घडत आले, त्या वेलेस तर खावदाचा दबाव करणार. त्यास आश्रय होता. ऐसे असतां नीट न जाले. आतां तर विचार कलतच आहे इत्यादिक विस्तारे सागोनहि पा॥ होते, आणि सर्वाचे आनुभवासहि आलेच आहेत. यैसे असता पुढे समजोन न

+ पत्र त्र्यंबकराव मामाचें असून ते सर्व त्यांच्या हातचें आहे.

१ जोर, बळकटी.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

घडले तर परिणाम लागणे कलतच आहे. माझा स्वभाव साफ सरल, आत येक बाहेर येक असा इतके दिवसहि नवता, व पुढेहि नाहीच नाहीं. शरीरे करूनहि वृधापकाल, फार मेहनत केली; फार धावले तर फल बरोबरच. इतकी हौसहि करण्याची नाहीं. तर्तू प्रसंग प्राप्त जाला. तुम्ही बापू व दादा व हरिपंत याणी येकवाक्यतेकरून लिा, व अताजी रघुनाथ बा कितेक प्रकारे सागोन पा, त्यास प्रतिकूल होणे, उदासपणे लिहिणे थोरपणास उचित नाहीं. जे होणे ते सर्वाचे दैवेकरून मातुश्रीबाईचे पुण्याने होईल. यासमईहि वेल समय जाणोन होईल तेथवर करण्यात अंतर होणार नाहीं. वोझे थोर. या मनसब्यास चौघे मातबर जिवप्राण येक करून डोई देतील तर च्यार कामे चौघानी निर्लोभपणे आटोपिली तर हलके जाईल. ही मिजास सर्वाची कायम राहून येकाचे उणे ते सर्वाचे उणे हे सर्वदा करण्यात प्रत्ययास परस्परे येऊन घडल्यास आवघड कार्य आहे. श्रीहरी उतमच करील. बहूत काये लिहिणे हे विनती.

¶*The writer, who is evidently Trimbakrao Vishvanath from the handwriting, gives a plain and straight talk and requests all to unite for the common cause of conducting the administration and opposing Raghoba. He further suggests that Sakharam Bapu, who is superior to all both in age and experience, should be placed at the head and should be invested with all authority. He should chastise or favour the Sardars as the case might be and that all should obey him.*

No. 34] [*23-2-1774*

पैा छ २० जिल्हेज.

श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

सखारामपंत बापू स्वामीचे सेवेसी.

पेा त्रिबकराव विस्वनाथ सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जावे. विशेष. फौजेस नालबंदीचा यैवज व कापड दिल्हे पाहिजे, त्याविसी वगैरे सरजामाविसी पूर्वी सूचना लिहिली होती, त्याप्रो सरंजाम व कापड पाठऊन द्यावे म्हणौन दुसरेयाने खिजमतगाराबा छ ११ जिल्हेजी लिहून पाठविले आहे व हाली कापड वगैरे सरजाम आणावयासी येथून रा सुलतानजी व सटवोजी धायभर व मानाजी फिर्गोजी काले पथकसुधा रवाना केले आहेत. तरी पेशजीच्या लिहिल्याप्रो कापड वगैरे सरजाम याजबो लौकर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
पाठवावा. यास रो छ १६ जिल्हेजचा येक आठवडा देविला. ती याद खिजमतगाराचे पत्रावा पूर्वीच पा आहे, त्याप्रो आठवडा देवऊन रा लौकर करावी. रा छ ११ जिल्हेज बहुत काये लिहीणे हे विनंती.

¶*Trimbakrao Vishvanath to Sakharam Bapu, sending him an indent of cloth and presents for distribution to his army.*

No. 35] [*24-2-1774*

पो छ १६ जिल्हेज.

श्रीशंकर

राजश्री सखारामपंत बापू व नाना फडणीस स्वामीचे शेवेसी

पोष्ये त्रिबकराव विस्वनाथ नमस्कार विनती उपरी. आम्ही येथून कारकून रुकनुदौलाकडे काडनूर संगमास शोधाकरितां रा धोंडोराम यांस चिठी लिहून देऊन पा होते. ते जाऊन भेटून आले. रुबुरू या मसलतीस आम्ही तुम्हास अनकूल ऐसे सागोन पा, आणि आपले साडिणस्वारावा सर्व मजकूर तुम्ही त्यांजकडे व कृष्णराव बलाल याणी लिहून पा तो आम्ही कबूल केला. आम्हासच ही गोष्ट करणे जरूर चितापासून होती, तसाच योग घडोन आला. आम्ही सर्व प्रकार तुम्हास अनकूल. दर मजल आवशाचे मैदानात बांजरा नदीवर नवाब बमय फौजसहवर्तमान येतो. तुम्ही त्याच मैदानात रा सावाजी भोसलेसुधा येणे. तुमच्या आमच्या भेटी होऊन दोन्ही लस्करे पधरा विसा कोसाचे अंतरे असोन, योजिले तुम्ही आम्ही मिळून सिधीस न्यावे, याप्रो साफ सरलपकेपणे मोहरेनिसी[1] खेत आम्हास व राजश्री सावाजी भोसले नाना यास भवानी सिवराम यास व देवाजीपंत यांस यैसी च्यार पत्रे पकेपणे पा ती पावोन पकी निशा आमची जाली. याउपर ते दौ चौ दिवसांत या मैदानात येतील. आम्ही तर बाजरा नदीवर येऊन मुा केलाच आहे. मुलाजमत परस्परे होणार. यास्तव मुख्यत्वे या कामात राजश्री कृष्णराव आहेत, त्यास पत्र पावताच आम्हाकडे पाठवावे. आम्ही नवे, आमची त्याची भेट कधी जालीच नाहीं. त्यांस पा द्यावे हे आम्हास प्रशस्त याकरितां लि॥ आसे. जवाहीर त्यास द्यावयाजोगे व आणखी बाचे उमरावास उचित प्रकारे दिल्हे पा, यास्तव व पोशाख दाहा पांच अधीक आगले वगैरे कितेक जिनस उगेच द्यावयाजोग जरूर

+ सबंध पत्र मामांच्या हातचें असून पैवस्ती मात्र हरीपंताच्या हातची. १ पत्र.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जरूर लौकर पाठऊन द्यावे. याउपर आम्ही ते भेटून आपली काबू लौकरच हासील (?) करूं. आपण चिंता काडीमात्र न करावी. पैका लौकर यावा. पांच रुो आम्हाजवल नाहीत. लोकास दिल्हे पा, व भोसले यास व दर्याबाईचे फौजेस दिल्हे पा. नालबंदी सर्वास वाटली पा हे जरूर; यास्तव पैका कापड लौकर पा. तोफा तयार जाल्या असतील तितक्याच लौकर पा. दारू गोले वगैरे सरजाम पूर्वी लिहून पा प्रो सत्वर पा द्यावा. हे पत्र दाहा पत्राचे जागा मानून तरतूद करून लौकर लिा प्रा येऊन पोहचेसे करावे. यावेगले येथील प्रसंगास उपयोगी आठवल्यास तेहि पा. आम्ही वारंवार ल्याहावेसे नाहीं. उतमपक्ष आपण रा नानास तेथे ठेऊन बा हरिपतास घेऊन यावे, हे उतम. राजश्री मोरोबा दा [दा] हि आले आसले तर आणावे. सातारियास कोणी शाहाणा जावा. तेथील शोभा करून तोच तोरा कल्पून तेथून सर्वास पत्रे यावी. याप्रकारे जाल्यास फारच उपयोगी पडेल. रा छ १२ जिल्हेज संध्याकालचा च्यार घटका दिवस गुरुवार बहुत काये लिहिणे हे विनती.

¶*Trimbakrao Vishvanath to Sakharam Bapu and Nana Fadnis, suggesting to them to write letters to the Nizam and Bhonsle and their Ministers to prepare their forces and to arrive in time at Awsa. The writer as usual asks for more money for the expenses of his army.*

No. 36] [*25-2-1774*

पो छ १९ जिल्हेज.

श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री सखारामपंत बापु स्वामीचे सेवेसी.

पोष्य त्रिंबकराव विश्वनाथ कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १३ जिल्हेज मुा वाजरा नदी आवसे पश्चमेस पांचसात कोस येथे येऊन मुा करून राहिलों होतो. कारण कीं जाबितजंगाची दोन चार पत्रें आलीं होतीं, तेव्हां आम्ही घाटाखालीच होतों. ते भेटीस येणार त्या करितां घाटाखाली राहणे नेकें[1] नव्हे. ऐसे जाणोन त्यास घेऊन यावे याकरितां राजश्री दिवाकर पुरुषोत्तम यास त्यांकडे रा केलें, आणि आम्ही घाटावर आलो. मुा मजकुरी भेटीकरितां एक दुसरा मुा करावा ऐसा विचार होता; परंतु रुकनुदौलाची पके-

---

१ योग्य, युक्त.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पणाची पत्रें आलीं. त्याणीं लिा कीं आम्ही काडनूर[1] संगमाहून दरकूच वाजरा-
नदीवर आवशापासीं येत आहों; तुम्हीं तेथें येणे. त्यास या मु॥ आम्ही
आल्याची खबर नव्हती. परंतु मोंगलाचे लस्करांतून आमचे कारकून आले.
रा॥ धोंडोराम व जिवाजी रघुनाथ यांचे पत्री भाव लिहून आला कीं, श्रीमंत ही
बल्हारीचे आसपास होते; त्यास घालमेल जालियाचे वर्तमान कळोन त्याणी रा॥
आबाजी[2] महादेव मोगलाकडे बोलावयास रा॥ केले. ते आज उद्यां दाखल
होतील. तर तुम्हीच लौकर मोंगलाचे लस्करासमीप येऊन परस्परें भेटी व्हाव्या
म्हणजे त्याचे बोलणे कदाचित श्रीमंताचे यांचे आश्रयास येणे सहजेच राहील.
याकरितां आम्हांस लांब लांब मजलीनी कूच करून भीमातीरानजीक मोंगला-
जवळ जाऊन भेटणे जरूर याकरितां आज आम्ही कूच करून दर मजल
यांजकडे गेलों. श्रीकृपेने त्याची आमची गाठ पडोन भेटी होतील. श्रीमंतहि
संनिधच आले असतील. याउपर लढाऊ नूर राहिला नाहीं. पैका आम्हा-
जवळ पांच रुो नाहीत. खर्च तूर्त रा॥ साबाजी भोसल्यास एक महिना चालतो
याचेच एक लक्ष रुो तुम्ही करार करून पा॥ बा॥ दिल्हे पा॥. तसेच राजश्री सेना-
साहेबसुभे मातुश्री दर्याबाईसह पांच सात हजार फौजसुधा याच मोहिमेस
अनुकूल होऊन बा॥ आली आहेत. संदेहाचे पात्र खरे, परंतु आणशफतपूर्वक
बोलून आपले दुख आम्हाजवळ एकांती सांगोन आली असतां त्यांचाहि प्रकार
उत्पन्नभक्षी, तथापि समेटून घेऊन, त्याजविसी संशयहि जाणोन, सावध राहोन
प्राप्त संपादिलें पा॥. त्यास खर्चास पना[स] हजार निदानी पाऊण लक्ष रुो दरमहा
पाच माहन्याचे दिले पाहिजेत. पावणे दोन लक्ष तर याचेच. या वेगळे
आमचे फौजेस पोटास व नालबंदी व कापड वगैरे खर्च व काही सिलक ऐसे
मिळून साता लक्षाचा भरणा, खेरीज कापड पा॥ बा॥ याभावें वारंवार लिहून पाठ-
विलें आहेच. ऐवज लवकर न आल्यास प्रसंग प्राप्त तेव्हां संकट पडेल. समय
राखावा, हे करण्याचे फळ. याकरितां फार जलदीने ऐवज मार्गाचा सावधपणें
पुढें आम्हांस बातमी पोहचाऊन यावा. त्या प्राच तोफा तयार असतील त्या
व दारू गोळा जवाहीर कापड वगैरे लढाईचे उपयोगी चिलखतें पेट्या टोप भाले
काठ्या इत्यादि सरंजाम लौकर येऊन पोहोचल्यास उपयोगीच पडेल. फार
मसलत चिघळली तर लाबणीवर पडोन भारी पडेल. यास्तव जलदी होऊन
निकड बसवावी तरच जरब बसली तर बसेल. ते बर्मये[3] तोफखाना गाडदी फौज

---

१ कडलूरसंगम भीमा कृष्णा ह्यांचा संगम.

२ रघोबाचा मसलतगार.

३ सह, बरोबर.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सुधां असतां आम्हांस आपला तोफखाना जलदीचे उपयोगा जोगा असावा म्हणजे सोईस पडून घडेल ते खरे. याकरितां पूर्वीहि लिहा व हलीहि लिहिलें असे. रा नारोपंत केसकर याची जलद तयारी जाली असेल तितका कारखाना घेऊन येऊन पोहचावे या करितां लिहा असे. हिंदुस्थानांतून सिंदे व होळकर यांच्या फौजाचे सरदार देशी येतात. पांच सात हजार फौज गंगातीरास आल्याची खबर आइकतो, तेहि मागाहून येतात असेंहि कळलें, त्यावरून आम्ही त्यांस लौकर येण्याविसी पत्रे पाठविली आहेत. आपलीहि परभारी जावी. आतां अवकाश काहीं राहिलाच नाहीं. सातारियाकडील मजकूर लिहून सुचविलाच होता. तो प्रकार जाल्यास फार उत्तम. आपण व रा मोरोबादादा व हरीपंत फडके लस्करांत येऊन सामील जाल्यास एकास एकाची सोबत होऊन काम जलदीने उरकण्यांत येईल. याविसी अनमान न करितां येणे उचित असे. बहुत काय लिहिणे लोभ असो दिल्हा पाठविला हे विनंती.

¶Trimbakrao Pethe writes to Sakharam Bapu about his movements and visits with the Bhosles and the Nizam.

No. 37] *[26-2-1774*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी.

विनंती शेवक चिमणाजी निळकंठ कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना ताा छ १४ जिल्हेजपर्यंत शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीचा बेलभंडार व चिठी नवाब व रुकनुदोला बहादर यास देऊन उत्तर स्वदस्तूरचे घेऊन पाठविले आहे. वरकड सर्व अर्थ निवेदन केला. इकडील विचार आपले आज्ञेसिवाय किमपि नाहीं. राजश्री मामा व भोसलेहि वांजिरा तीरी येथून तीस कोसावर आले. जाबीतजंग धौसा निर्मळेहून फौज तोफखाना सुधां निघोन दरमजल आवसे तुळजापूरच्या रोखे जलद येत आहेत. त्याची याची मामा व भोसले याची समीपता सत्वरच होईल. कळावे फार काय लिहू ? श्रुत होय हे विज्ञापना.

¶Chimnaji Nilakanth, Nana Fadnis' clerk, informs him of his having delivered oaths to the Nizam and received back his replies in confirmation.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

[28-2-1774

No. 38]

पो[1] छ १७ जिल्हेज.

श्री

विनती उपरी. आपला निरोप घेऊन स्वार जालों, ते आजी इंदुवारी मोरेश्वरी येऊन मुकाम केला, तों लस्करचें दुसरे पत्र जासूदजोडीबराबर बारामतीस आलें तेथोन सांडणीस्वाराबरोबर रवाना जालें. ते आम्हाजवळ पावले. पाहून आपणाकडे पाहावयासी पाठविलें आहे. जासूद केचनगुड तुंगभद्रा तीरचे मुकामीहून आलो ऐसे सागतात. पत्र पाहून माघारे पाठवावे. त्याचा जाब द्यावयाचा विचार कळलाच आहे, त्याप्रमाणें देऊं. राजश्री त्रिंबकराव व साबाजी भोसले लांब पडले; याजकरतां सांडणीस्वार जलद त्यांजकडे रवाना करून आडवें लौकर येतसे करावे. समीपता पडत चालली. आपणहि तेथोन निघोन सतरुषीस यावयाचे करावे. लस्करची पत्रे या आठा दिवसांत दोन वेळ आलीं आणखी वरचेवर येत जातील. त्यात अर्थ यावें. याजकरितां त्यास उत्तर कसे देत जावें हाहि विचार लिहावा. कदाचित तिकडे जावयाचा विचार जाला तर आपली भेट व्हावी. त्यास सतरुषीस आपले येणे जाले तर तेथें भेट घेऊन आपले विचारे जाण्याचा विचार होणे तो होऊन येईल, छ १६ जिल्हेज हे विनंती.

¶*Sakharam Bapu writes to Haripant, inviting the latter to proceed to Satara at once and meet the writer there.*

[28-2-1774

No. 39]

पो छ १६ जिल्हेज.

श्रीशंकर

पुा राजश्री नाना फडणीस स्वामीचे सेवेसी.

विनंती[+] उपरी राजश्री साबाजी भोसले यांजकडील ग्रहस्त आपलेकडे आला. त्यासी बोलणे होऊन त्यांचे खर्चाची बेगमी परभारीच करून नाना जोसी यांचे पुत्र तात्या[2] याजबो मनसब्यास आनकूल होण्याविसीं खातरजमेचे मजकुराची पत्रें पाठविली ते छ १ जिल्हेजी मारनिलेकडे येऊन पावले. या काळी येकहाती येक-हुकमी येकविचारे सोये गैरसोय जाल्याने आम (आब ?) राहून मजाहि पडते. आपणास सर्व तोडमोडी कळतच आहेत. तथापि लिहून सुचविले असे. रा छ २ जिल्हेज बहूत काये लिहिणे हे विनती.

¶*Trimbakrao Mama informs Nana Fadnis of the writer's correspondence with Sabaji Bhosle of Nagpur.*

---

१ पत्र सखाराम बापूचें. पैवस्ती हरिपंताच्या हातची. + पत्र त्र्यंबकराव मामांचें. २ कृष्णराव.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 40] [*2-2-1774*

श्री

उभयेतांचे सेवेसी. कृष्णराव बल्लाळ सा नमस्कार विनंती उपरी. आमचा जासूद श्रीमंताचे लशकरातून माघ वद्य शष्ठी बुधवार तेरा दिवसानी आला. त्याणें सांगितले की वामनरावनी आपले बुनगे गजेंद्रगडाकडे लाऊन देऊन आपण सडेच होते, त्यास पेशजी भवानराव यांजवर दगा होऊन त्यांची फौज दूर करून पांचसे राऊत ठेवले, आणि दोन लक्ष त्यास दिल्हे, याचें कारण की भवानराव फितुरी आहेत ऐसे चौघानी समजाविले होते त्यावरून हे केले. तत्रापि संशये न जाये, तेव्हा हुजरातची पथके होते त्यांस आज्ञा जाहली होती कीं तुम्ही भवानरायांस नजरेत असो देणे. ऐसे करीता येक दिवस श्रीमंत सायंकाली खासे हला करावयासी चालोन गेले. तेव्हा भवानरायाचे कुसकुस परशराम रामचंद्र मदतीस शामिल जाहले. तेव्हा हेहि नरम पडले. इतक्यांत सेनापति दरमियान पडोन समाधान केले, म्हणोन वर्तमान सागितले. इकडील वर्तमान जासूद निघाले तेव्हा गेले नव्हते. जासूद कृष्णेवर आला तेव्हां वर्तमान कललें. सुजावदौला आणि फिरंगी ऐसे कासीत होते. फिरंगींयानी सुजावदौला सांगितले की कासी दरोबस्त आम्हाकडे द्यावी. सुजावदौल्याने उत्तर केले कीं कासी देत नाहीं. त्याजवरून सुजावदौलाची व फिरंगियाची लढाई जाहली. च्यारसे फिरंगी मारला आणि लुटून पस्त केला हे विनंती.

¶*Krishnarao Ballal Kale informs both Sakharam Bapu and Nana Fadnis of the scuffle that ensued between Raghoba and the Pratinidhi in the Carnatic.*

No. 41] [*9-3-1774*

पो छ २९ जिल्हेज, फाल्गुणमास.

श्री

श्रीमंत राजश्री त्रिंबकराव मामा स्वामीचे सेवेसी.

पो गंगाधर शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता छ १९ जिल्हेज मुा पुणे येथे पागेसह वर्तमान सुखरूप असो. आपल्या बो हुजुर-पागेकडील घोडी आहेत. त्याजसमागमे रा हरिपंत भिडे याचे निाचे कारकून होते ते पुरंधरास पावले. सांप्रत तेथे आमच्या निाचे कोणी नाही. याजकरिता चिरंजीव रा सिदोपंत व रा गोपालपंत ऐसे पाठविले आहेत. याच्याहातून पागेचे निा सेवा द्यावी. चिरंजिवाचा रोजमरियाचा बंदोबस्त करून द्यावा व सर्व

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
प्रकारें आम्हास आपण वडील आहेत व धणी आहेत. दुसरा अर्थ नाही. पुरंधरी तीर्थस्वरूप रा॥ रत्नाकरपंत व चिरंजीव लक्षुमण पागे वा॥ आहे. थोरले लस्करात दोन मुले आहेत. मी पुण्यात आहे. ठाण्यात घोडी होती त्यापैकी सिंगरे पसांत[1] तिनसे घोडे काढून सामान करून लोक ठेऊन पुरंधरची रवानगी केली. वरकड वर्तमान चिरंजीव सविस्तर विनंती करतील, त्यावरून कलेल. वहुत काये लिहणे, विज्ञापना.

¶*Gangadhar Shankar Purandare to Trimbakrao Pethe, communicating supply of horsemen to Purandar.*

No. 42] [*1-4-1774*

श्री

शेवेसी वालकृष्ण महादेव कृतानेक सां॥ नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता॥ छ १९ मोहरम भ्रगुवासर येथास्थित जाणोन स्वकीयें कुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र पाठविलें तें पावले. वो॥ राजश्री गोविंद दीक्षित यांस येवजाविसी सरकारचे पत्र पाठविले आहे हें तुम्हीं त्याजकडे घेऊन जाणे आणि त्यासी बोलोन भावगर्भ लिहून पाठविणे म्हाणोन आज्ञा. त्यावरून बुधवारी दीक्षिताकडे सातारियांस[2] जाऊन त्यांची भेट घेतली. उपरांत ते शहरास[2] जाऊन अस्तमानी माघारे आले. तदोतर भाषण जाले कीं आज-पावेतो कधी श्रीमंतासी आपण देवघेव केला नाहीं. उभयेपक्षींहि कांहीं प्रयोजन पडले नाहीं. तशांत आमचा प्रकार आहे तो पूर्वीपासून विदितच आहे. सांप्रत काली ऐवजाविसी राजश्री सखारामपंत बापू व नाना फडणीस यानीहि या पत्रापूर्वी लिहिले होते. रा॥ भगवंत भैरव थते व बापूजी नाईक मन्हाठे व दीक्षित असे त्रिवर्ग मिलोन तीन लक्षाचा भरणा करावा असें लिहिले. त्याचे उतर थते व मन्हाठे यांनीं लिहून पाठवावयाचे ते पाठविले. त्यावर मागती पत्रे आलीं कीं दोन लक्ष दोन हजार रूपयाच्या चिठ्या सरकारातून पाठविल्या आहेत. तर तुम्ही त्रिवर्ग मिलोन आठ्याणव हजार रूपये देऊन तीन लाखाची भरती करणे. त्यास तेहि प्रकार घडला नाहीं. असे असता हली सरकारचे पत्र आले. आमचां तर कधीं सरकारांत देणे घेण्याचा पंथ नाहीं. तशात आमची नड काय आहे नांहीं हे सर्वत्रास कललीच आहे. येंदाच्या प्रसंगांत दुसरा सावकारहि कोणी रूपया देत नाहीं. त्यांस अशाहि प्रकारांत निदानी वीस पंचवीस हजार

---

१ पसा घोड्यांपैकीं. पसा घोड्या म्हणजे पैदासीसाठीं राखून ठेवलेल्या.

२ औरंगाबादजवळचें सातारा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

रूपयेपर्यंत देऊ. याहून विशेष कांहीं नाहीं याप्रमाणें दीक्षिताचे बोलणें आम्हासी जाले. त्यानी सरकारचे पत्राचे उत्तर मोघम दिल्हे ते जासुदापासी आहे. त्यावरून ध्यानास येईल. आम्ही काल गुरूवारी सातारियाहून माघारे नेवाशास आलो. कलावें सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balkrishna Mahadev informs Sakharam Bapu of the inability of the Dikshits of Satara near Aurangabad to help the Poona Government with a loan of three lacs as requested.*

No. 43] [*3-4-1774*

पौ छ २३ मोहरम मंगलवार

चार घटका आवसीची रात्र.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी.

पोष्य हरि बल्लाल फडके कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. उपरी: येथील कुशल ताा छ २१ मोहरम मुा नजीक मांडे[1] निंबालकराचे जाणून स्वकीय कुशल लिहित आसिल पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले, लडाईचे वर्तमान कलले, परंतु आपले पत्र आले नाहीं; तरी साद्यंत पत्रीं लेहून पो. पुढेहि वरचेवर नवीन होईल तसे कलत असावे म्हणून लिहिले ते सविस्तर कलले. त्यास श्रीमंतांचा रोख कृष्णेचे पाण्याने सातारियाकडे जावयाचा होता. तेव्हां राजश्री त्रिंबकराव मामा मोगल भोसलेसुधा लांब लांब मजली करून वेरलेच्या पाण्यावर जैरामस्वामीचे वडगाव पावेतो पोहोचले. आम्ही सातारियाचे बंदोबस्ताकरितां गेलो होतो. तेथील बंदोबस्त करून येऊन लस्करात दाखल जालो. इकडील जमेत भारी समीप येऊन पोहोचल्याचे वर्तमान ऐकोन श्रीमंतांचा मोहरा माघारा फिरोन श्रीमंत पंढरीचे रोखे चालले, आसी बातमी येतांच मामानी सडी स्वारी करून, पाठिलाग केला. राजश्री साबाजी भोसले व धौशा बमे फौज तोफा मागाहून येत होते. आम्ही लांब मजल करून कासेगावानजीक मेलविले. श्रीमंतांचे कूच होऊन फौजा तयार जाल्या होत्या. इकडील फौज येऊन पोहोचल्याची बातमी कलतांच बुनगे माघारे आणऊन उभे राहिले इकडील फौजा चालोन आल्या होत्या. लढाईचे तोंड लागावे इतक्यात राजश्री

---

१ सोलापूर जिल्ह्यांतील.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कृष्णराव माधव दारोगे तोफखाना यांची चिठी आली. मागाहून राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर याची चिठी आली. त्यांत मजकूर, लढाई करू नये, मागे सरोन मुकाम करावा, इकडील बोलणार यावयाचे आहेत या अन्वये लिहिले होते. त्यावरून फौजेस ताकीद होऊन चिठीचा जाब लिहित मामा बसले होते, तो आकस्मात फौज व तोफखाना गाडदी समी(प) येऊन पोहोचले. गोले मारू लागले. ते समई निघणे प्राप्त जाले. इशारा होतेक्षणी फौजा निघाल्या. खाशा निशाणापासी मामा व आम्ही होतो तेहि फिरलो. मागांहून हुजरातचे लोकानी दाटी केली. सा दाहावीस खाशानसी मामा फिरले. त्याजवर कोणाची दृष्टि राहिली नाही. थोडक होते. जखमी होऊन पाडाव गेले. आम्ही मागे आठ कोसावर साबाजी भोसले होते तेथे येऊन फौज व बुनगे तोफासुधा पोहोचलो. नवाबहि तेच वेळेस मुकामास आले. आम्ही सर्व सरदार येकत्र करून सर्वास उमेदवार करून नवाबाकडे गेलो.

श्री २

पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीस.

विनंती उपरी. नवाबरुकनुतदौले यांजपासी साद्यंत जाला मजकूर सांगितला. पुढल सर्वांचे उमेदीचा भाव दर्शविला. त्यानीहि फारच हिमतीची गोष्ट सांगोन सर्वांस विशेष उमेदवार केले आणि मिसलबंदीकरून दुसरे दिवसी कूच करून सांगोल्यानजीक माणेवर मुकाम केला. श्रीमंतांस आम्हास सात आठ कोसाचे अंतर होते. लढाईचा दिवस खेरीज करून दोन मुकाम श्रीमंती पंढरपुराजवल केले. हावभरी व्हावयाच्या लागात होते, परंतु इकडील नेट ऐकोन कूच करून तुलजापुरचे रोखे चालले. आसी बातमी येताच आम्ही लांब लांब मजली करीत येथपावेतो मोगलसुधा आलो. राजश्री भगवानराव प्रतिनधी वगैरे तिकडून निघोन आले. श्रीमंतांस आम्हास पंधरा कोसांचे आंतर आहे. आम्ही तमाम फौजा सब्या करून मोगल व बुनगे च्यार पांच कोसाचे आंतरे पाठीमागे ठेऊन गाठ घालितो. ईश्वरीकृपेने उतमच होईल. मोगलाचा भारी सरंजाम आहे तो परंड्यास ठेऊन नवाबसुधां सडे होऊन जात असो. आज रविवारी परंड्याजवल मुकाम होईल. तेथून सडे होऊन पुढे जात असों. नवाब चहू कोशाचे अंतरे मागाहून येतील. श्रीमत पुढे जातात. आम्ही मागाहून पायबंद दिला असतां पैका कोठे मेलवितात, खातात काय, लोक कसे राहतात? राजश्री भगवानराव आजच लस्करांत येणार आहेत. हुजरातची पथके राजश्री मलबा व भवानजी वाघ व येसाजी देवकाते व लेले मंडली इतके येथे आले. वरकडाचा सिलसिला

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

चाललाच आहे. आम्ही समीप गेलो असतां येतील. न आल्यास त्यांचे भरोशावर जात नाहीं. नवाब आम्ही भोसले येकदील असतां कोणे गोष्टीची चिंता नाहीं. राजश्री मामा दगाबाजीने पाडाव गेले इतकाच प्रकार जाला. आम्ही व सर्व सरदार मागे राहिलो. आम्हा सर्वांची हिमत चाकरी करून दाखवावयाची आहे. कैलासवासी श्रीमंताचे पुण्यप्रतापेंकडून व आपले आसीर्वादेकरून कार्यसिधि करितो. चिंता न करावी. ते जिकडे जातील त्याचा पिछा सोडीत नाहीं. जे दिवसी अटकलेत येईल ते दिवसी नवाबसुधा गाठ घालितो. पैक्याची मात्र तर्तूद असावी. त्यास आपणासारखे तर्तूद करणारे असतां आमचे उणे पडू कसे देतील? येविसी मात्र आमची कालजी असावी. वरकड मसलतीविसी कालजी करू नये. बहुत काय लिहिणे, कृपा केली पाहिजे हे विनंती.

राजश्री आपाजीपंत स्वामीस नमस्कार. लिा परिसिजे; कृपा करावी हे विनंती.

¶*In these two letters addressed to Naropant Tulsibagwale, Hari Ballal Phadke describes the fight between Raghoba's forces and those of Trimbakrao Mama Pethe. Pethe was assisted by Sabaji Bhonsle and the Nizam. The writer remarks that Trimbakrao acted rather in haste and was treacherously caught. He should have, he says, waited for succour from him (Phadke). The writer however assures the addressee that all precautions have been taken and that everything would go on quite favourably by the grace of god and the blessings of the Peshwa in his undertaking against Raghoba.*

No. 44] [*6-4-1774*

पौ छ २६ मोहरम

सु॥ आर्बा चैत्र.

श्री.

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी विनंती. उपरी : श्रीमंत नागतेल्याकडे[1] जाणार होते ते नगराकडे आले ऐसे आइकिण्यात आहे. त्यास तुम्ही राउतांची व जासुदांची बातमी नगराचे रोखे डाकेची बसवावी. जलदीने बातमी आणवीत जावी. नगराकडून पुण्याचाच रोख धरिल्यास तुम्ही शहराची बंदोबस्ती उतम प्रकारे करून बातमी राखून वीसपंचवीस कोशी आल्यानंतर तुम्ही निघोन जावे. तेथे न राहावें. डाक चांगली बसवावी. घाटोघाटहि राऊत बसवावें. याप्रों करावें. कदाचित श्रीमंत दुसरेकडे गेल्यास उतम. परंतु

---

१ एका घाटाचें नांव.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बातमी राखोन सावध राहावें. सदासिव रामचंद्र याची माणसे पुण्यात आहेत, ती पत्र पावताच त्यास राजगडास रा॥ करावी. पुण्यात न ठेवावी. रौ॥ छ २४ मोहरम. हे विनंती.

¶*Nana Fadnis to Naropant Tulsibagwale, asking precautions being taken at once against any sudden attack from Raghoba.*

[21-4-1774

No. 45]

श्री.

सेवेसी धोंडो माहादेव सां॥ नमस्कार विनंती. ता॥ छ ९ सफर गुरुवार दोन प्रहर पावेतो वर्तमान यथास्थित आसे. यानंतर पुरंधरचे पत्र येचक्षणी आले. श्रीमंत मातुश्री गंगाबाई यास आधिक शु॥ ७ इंदुवारी प्रसूत जाली; पुत्ररत्न जाले, आपणास कलावे. राजश्रीं बाजीपंत आंणा यांनी पत्र लिहिले त्याचे उतर आले तेंच पा॥ आहे, त्यावरून कलेल हे विनंती.

राजश्री बाजीपंत आंणास सां॥ नमस्कार. आपले पत्राचे उतर पुरंधराहून आला ते पा॥ आहे. पावेल हे विनंती.

¶*The birth of Sawai Madhaorao on 18th April 1774 is communicated in this letter.*

[3-5-1774

No. 46]

पौ॥ छ १८ रौवल.

श्री

राजश्री बालाजीपंत नाना

गोसावी यासी,

ऽ अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो॥ तुकोजी होलकर दंडवत विनंती. उपरी: येथील कुशल जाणून स्वकीय लिहित आसावे विशेष. आपण पत्र पा॥ ते पावोन लेखनार्थ आवगत जाला. या पूर्वीहि पाच सात पत्रे पा॥, परंतु उतर येकाचेहि न आले म्हाणौन लि॥. यैसीयासी येविसीचा प्रकार तरी राजश्री माहादजी सिंदे यांचे व आमचे चिताची सफाई नवती. त्याची दुरुस्ताई अलीकडे होऊन स्वामीसेवा येकरूपपणे करावी या आर्थे निखालसता जाली. त्याच प्रसंगी

+ येथून पुढील अक्षर नाना फडणिसाच्या हातचें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

राजश्री माहादाजीपंत गुरुजी आले. त्यानी आपल्याकडील मजकूर सर्व सांगितला. त्याची उत्तरे उभयताकडून येकवाक्यतेने जाली तो अर्थ[1] त्यानी आपल्यास साद्यंत लिा आसेल. मधी राजश्री बहेरजी ताकपीर देसी गेले. आपल्यापासी येऊन भेटावे आसे आसता मार्गी श्रीमंताची गांठ आचानक पडली. निरोपाय जाणून ते त्यास भेटले. तेव्हा त्यांजला स्वारीसमागमे राहाणे प्राप्त जाले. पुढे श्रीमंताची स्वारी इकडे येणार येविसी आपल्या चितांत विपर्यास आला आसेल. त्यास येथील विचार आपल्याखेरीज नाहीं. प्रस्तुत राजश्री हरिपंत समीप आले, आणि श्रीमंतहि नेटी येऊन पोंहचले. तथापि आमचे लक्ष आन्यत्र नाही. जे कर्तव्य ते आपल्या लक्षानेच होईल. रा॥ छ २१ सफर. बहुत काये लिहिणे, लोभ आसो दीजे हे विनंती.[2]

मोर्तब
सुद.

¶*Tukoji Holkar to Sakharam Bapu and Nana Fadnis, assuring them of his full support in the undertaking of the Barbhais.*

No. 47] [*12-5-1774*

पौ छ २२ रोवल
सन आर्बा.

श्री

श्रीमंत मातुश्री बाईसाहेब

साहेबाचे सेवेसी.

विनंती. सेवक माहदजी सिंदे कृतानेक विज्ञापना. ता॥ छ ३० सफर मु॥ इंदुर साहेबाचे कृपावलोकने सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. विशेष. कृपा करून पत्र पाठविले ते पावले. तीर्थरूप दादासाहेब अजंठ्याचा घाट उतरून खांदेशात गेले. कदांचित पलत पलत तुम्हाकडें आल्यास हस्तगत करावें म्हणौन आज्ञा. यैसियासीं श्रीमंत येथे आले. आल्यापासुन बोलण्याचा संदर्भ लाविला आहे. येक गोष्ट तहावर आल्यावर सेवेसी लिहिलें जाईल. वरकड राजश्री माहादाजीपंत गुरूजी लिहितील त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadji Scindia to Gangabai, communicating his negotiations with Raghoba.*

---

१ येथें शिक्का आहे. २ याच अर्थाचें सखाराम बापूच्याहि नांवचें एक पत्र आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 48] [*13-5-1774*

पौ छ १८ रोवल

सन आर्वा.

श्रीसीताकांत.

राजश्री बालाजीपंत नाना गोसावी यासीं.

अखंडितलक्ष्मीआलंकृत[1] राजमान्ये श्रो मुधोजी भोसले सेना धुरंधर दंडवत विनंती. उपरी : येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन करीत जावें विशेष. आम्ही निघालियानंतर चिठी आपणाकडे पाठविलीच आहे. सांप्रतहि सविस्तर आर्थ राजश्री सखारामपंतबापू यांचे पत्रीं लिहिले आहेत त्याजवरून ध्यानास येईल. मागाहून येका दों रोजात राजश्री व्येंकटराव कांसी यांचीहि रवानगी करितो. आतां सर्व भरवसा आपला आहे. रा छ १ रबिलोवल. बहुत काये लिहिणें, लोभ असों दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Mudhoji Bhosle to Nana Fadnis, informing him of his intention of dispatching Vyankatrao Kasi for a personal interview.*

No. 49] [*14-5-1774*

श्री.

वेदशास्त्रसंपन्न राजश्री शास्त्रीबावा स्वामीचे शेवेसी, विद्यार्थी सखाराम भगवंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता वैशाख शु॥ चतुर्थी-पर्यंत यथास्थित असे विशेष. आम्ही पुरंदरीहून निघोन सातारियास आलो. श्रीमंत माहाराज राजश्रीची भेटी जाहाली. उदईक पंचमीस रविवारी पेशवाईची वस्त्रे श्रीमंतास होतील. त्याउपरी येथून पुरंदरी जाऊ. त्यास आपण निघोन पुरंदरी यावे. येथून आपणाकडे माहादाजी रामचंद्र पाठविले आहेत हे सांगतील ते ध्यानांत आणून आपण पुरंदरास यावें.

अगत्य[2] यावे. बहुत काय लिहिणे. लोभ आसो दीजे हे विनंति.

¶*Sakharam Bapu informs Ramshastri that the young Peshwa would receive the robes of his office on the Panchmi.*

---

१ पत्राच्या मागील बाजूस मुधोजीचा शिक्का आहे. २ येथून अक्षर लेखकाचे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 50] [*19-5-1774*

पोा छ १७ रावल आर्बा

श्री

श्रीमंत मातुश्री बाई

साहेबांचे शेवेसी.

विनंती सेवक तुकोजी होलकर कृतानेक विज्ञापना. येथील कुशल वैशाख शुध्ध आष्टमी मु॥ इंदूर साहेबाचे कृपादिष्टीकरून येथास्थित आसो विशेष. छ २ सफरचे पत्र पाठविले ते छ २९ माहे मिनहूस पावले. तेथ आज्ञा कीं तीर्थरूप राजश्री दादासाहेब गंगातीरास गेले. त्यांजकडून राजश्री भवानराऊ प्रतिनिधी उठोन आले व नरसिंगराव धायेगुडे व राणोजी नाईक निंबाळकर व दोन च्यार पागा आल्या. आणखी लोक नित्य उठोन येतच आहेत. आपल्या फौजा नवाब भोसले आदिकरून त्यांचे पाठीमागे आहेत. तुम्हांस लौकर येण्याविशी पत्रें पाठविली आहेत. सर्व कामे ठेऊन तुम्ही पत्रदर्शणी स्वार होऊन येणे, म्हणूंन पत्री आज्ञां. यैसियास येथील कामेकाजे सर्व येकीकडे ठेऊन साहेबाचे लिहिल्याप्रमाणें लक्ष राखून डेरे दाखल जालो. कूच करावें तो श्रीमंताची स्वारी बऱ्हाणपुरीहून निघोन येकायेकीच इंदुरासमीप आली. तेव्हां भेटीस जावयाचा विचार प्राप्त जाला. भेटी घेतली. इंदुरी येऊन मुकाम केले. त्यांजकडील विचार आपणास विदितच आहे. त्यास प्रस्तुत राजश्री हरिपंत याजकडून रो नागो राम व मोरो गिरमाजी व निळो गोपाळ यसै येथ येऊन पोहचले. त्यांचे बोलण्याचे भाव कलल्याउपरी, जे ठरल्यात येईल ते सेवेसी लेहून पाठऊं. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञाप्ति.

¶*Tukoji Holkar to Gangabai, promising his adhesion to the cause of the Barbhais and informing her of the negotiations going on with Raghoba.*

No. 51] [*19-5-1774*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

हरिपंत तात्या स्वामीचे शेवेसी.

पों कृष्णराव बलाल सां नमस्कार विनंती उपरी : येथील कुशल ता॥ छ ७ सफर सोमवार प्राथकाल मु॥ नगर जाणून स्वकीये कुशल लिहित जावे. विशेष. आम्ही छ २ सफर भ्रगुवारी पुरंधराहून लस्करास यावयाकरिता निघालों ते काल मंगलवारी नगरास आलो. आजी येथून कूच करून दरमजल तुम्हाकडें शहरच्या

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
सुमारें येत असों. त्यास तुमच्या मुकामाची बातमी शहरानजीक आहे म्हणोन यैकतों. राजश्री नारो बाबाजी याजकडे दौलताबादेची पत्रे आली; त्यानी सांगितलें याजवरोन तुम्हांस पत्र लिहा आहे. श्रीमंताची फौज जगजीवन पवार वगैरे दोन हजार पावेतों नासिक प्रांती फुटून गेली आहे. त्याणी कटोरियांस तसदी करून लाख दीड लाख पावेतो यैवज घेऊन वणीवर आहेत यैसी वार्ता यैकतों. यास्तव आम्ही गुंजाल्याचा घाट उतरोन गलनिंबावर गंगातीरास येतो, तेथे तुमच्या लस्करचा शोध लागेल तसें पुढें येऊ. परंतु तुमचे लस्कर लांबले आहे याजमुळें मार्गाची धामधूम. त्याजकडील फौज फुटून थोडी बहुत चोरीने फिरत असलें तरी तुम्ही हजार स्वार आम्हाकडें सामोरें जरूर पाठऊन देणे. त्याची गांठ पडून समागमी घेऊन लौकर येऊन पोहचूं. हिवऱ्यावरून वालनेचे रोखे येत असों. बहुत काये लिहिणे; लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Krishnarao Kale informs Haripant Tatya of his having started from Purandar to meet him.*

No. 52] [*15-6-1774*

पौ छ १० जावल सु॥ खमस

आशाढ.

श्री

श्रीमंत सौभाग्यवती वज्रचूडेमंडित मातुश्री

पार्वतीबाई साहेबाचे शेवेसी.

विनंती सेवक रघुनाथ हरि साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ जेष्ट शुध्ध शष्टी पावेतों आपले कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. कृपा करून पत्र पाठविलें ते पावलें. श्रीमंत मातुश्री गंगाबाई यांसी आधीक वैशाख शुध्ध सप्तमी इंदुवारी पुत्र जाहाला. संतोषाचे वृत कलावे म्हणोन लि॥ त्यावरून बहुत संतोष जाहाला. ईश्वरें परिक्षितीसारिखे केले. येणेकरून सर्वांचा भाग्योदय जाहाला. आज्ञेप्रो खुशाली केली. सेवेसी श्रृत व्हावे या आर्थे लिहले आहें. सेवेसी श्रृत होय, हे विज्ञाप्ति

¶*Raghunath Hari (Subhedar of Zansi) to Parvatibai expressing his delight at the news of Gangabai giving birth to a son.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 53] [*21-6-1774*

पौ छ २२ राखर सु॥

खमस सबैन.

श्री

श्रीमत् राजश्री पंतप्रधान

साहेबाचें सेवेसी.

अज्ञाधारक उदाजी नाा माडे व कारकून नामजाद जंजिरे विजयदुर्ग चरणावरी मस्तक ठेऊन सिर साष्टांग दंडवत व नमस्कार विनंती विज्ञापना. ताा छ ११ राखर पावेतों सेवकांचे व जंजिरे मजकुरचें वर्तमान यथास्तित असे विशेष. छ २१ रोवलचे आज्ञापत्र सादर जाहालें, तेथें आज्ञा कीं श्रीमत माहाराज राजश्री छत्रपती स्वामी याणी पेशव्याईचीं वस्त्रें दिलीं ती छ १६ रोवल वैशाख वद्य चतुर्थीस वीस घटका रात्रीस सुमुहूर्तें करून घेतली, म्हणोन हर्षाचे वर्तमान सेवकांस आज्ञापिले, कलोन सेवकास आनंद बहुत जाहाला. यानंतर जंजिरे मजकुरीं अलंगनौबत चौकीपाहारा करून हुशार असों. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञाप्ति.

¶*Udaji Naik Made, Killedar of Vijaydurg, congratulates the new baby Peshwa on his having received robes of his office.*

No. 54] [*4-7-1774*

जाावल सु॥ खमस सब्बैन.

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामीगोसावी यास.

विनंती उपरी. वेदशास्त्रसंपन्न राजश्री राम शास्त्री पुण्यांत आले आहेत. त्याजकडे न्यायाधिशीचा अधिकार पहिल्यापासून चालत होता, त्याप्रमाणें चालता करून, त्याजकडे माणसे वगैरे पूर्ववतप्रमाणें नेमून देऊन, तुम्हापासीं मनसुबीचे कामकाज पडेल ते दरोबस्त यांचे हाते घेत जाणे. पहिल्याप्रमाणें घेणे. जाणिजे छ २४ सु॥ सन खमस सबैन मया व अलफ बहुत काय लिहिणे, हे विनंती.

¶*The Barbhais ask Naro Appaji to reinstate Ramshastri in the office of Nyayadhisha and to supply him his full establishment as before.*

---

१ येथून 'अलफ' पर्यंतचा मजकूर नाना फडणविसाचे हातचा.

२ येथून कोणाच्या हातचा हें नीट लक्षांत येत नाहीं. मोरोबादादाचे हातचा असेल.

३ 'हे विनंती' हे शब्द सखाराम बापूच्या हातचे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 55] [*20-7-1774*

श्री

राजश्री सखारामपंत बापू गोसावियांसी.

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो माहादजी सिंदे दंडवत विनंती उपरी : येथील कुशल जाणौन स्वकीयें कुशल लिहित असिले पाहिजे विशेष. श्रीमंतास येथे पुस्तकाचें अगत्य आहे, याजकरितां खंडो व्यंकटेश व सदासिव राम शागीर्द पाठविले असेत. तरी पुस्तकाची यादी पाठविली आहे, त्याप्रो पुस्तके व दयारामभट वैद्य याजकरवीं औषधें केली आहेत ती, व हरणे पुण्यातील व टोक्याहून नेली तीं, उभयेताबार सत्वर पाठऊन द्यावी. पुस्तकाचे व औषधाचे अगत्य जरूर आहे. पत्र पावताच सदरहु प्रो पाठवावी. रा छ १० जावल. बहुत काये लिहिणे. लोभ कीजे हे विनंती.

श्री
ज्योतिस्वरूपचरणी
तत्पर राणोजीसुत
महादजीशिंदेनिरंतर

¶*Mahadji Scindia orders books for Raghoba.*

No. 56] [*30-8-1774*

पौा छ २० जावल आषाढ
मास.

श्री

राजश्री सखारामपंत बापू गोसावी यासी,

ऽ सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो तुकोजी होलकर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहित असावे विशेष. तूर्त आपल्याकडून काही पत्र येत नाही, तरी सर्वदा लिहित जावे. इकडील मजकूर तरी श्रीमंत इंगरेजासह मही उतरून भडोचचे सुमारे गेले. आम्ही त्यांचे मागे रेवातीरास आलो. आठ च्यार मुकाम केले. त्याचा छावणीचा इरादा दिसोन आला. मग आम्ही व राजश्री हरिपंत बावापिऱ्याच्या घाटे नर्मदातीरी भडोच बारा कोस इत्क्या तफावताने आलो पुढे रेवा उतरून पार

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

छावणी वगैरे मसलत करावी हे ठरले तेव्हा सरकारच्या फौजाचा उतारा लाविला. बुनगे व फौज फार करून उतरून पार जाली. दाहा बारा हजार फौज व तोफखाना सरदार लोक राहिले, इक्यात नर्मदेस पाणीहि आले. आशा संधीत श्रीमंतानी घाटाचे सुमारे कूच करून आचानक घाटावर आले. आम्ही प्रहर दीड प्रहर तेथे दम खाऊन तो तल सोडोन पलीकडे च्यांडोस करनालीच्या घाटास गेलो. तेथेहि पाणी फार. इकडे छ्यावणीस राहावे तरी काही फौज पार; काही वर. याजकरिता वर्ते आकबरपूर महेस्वर बढवे या घाटे उतरून पार जाऊन त्या फौजेस मिलावे हे मसलत करून राजश्री हरिपंत आम्ही दरमजल आलीमोहनचे मार्गे आकबरपूरचे घाटे उतरून पारच्या फौजेस सामील होतील. सविस्तरें राजश्री हरीपंतानी आपणास लिहिले आसेल त्यावरून कलेल. आम्ही महेस्वरास राहू. तेथे लोकाचे वगैरे कामकाज आहे; याजमुळे राजश्री नारो गणेश यासी बोलाविले आहे. तरी आपणहि त्यास निरोप देऊन त्याची रवानगी करावी. रा छ २१ राखर. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे हे विनंती.

श्री
म्हाळसाकांतचरणीं
तत्पर मल्हारजिसुत
तुकोजी होळकर.

मोर्तब
सुद.

¶*Tukoji Holkar to Sakharam Bapu, giving details of Raghoba's movements and affairs.*

No. 57] [*26-9-1774*

श्रीमंत बापू स्वामीच्या पत्राची नकल.

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री शास्त्रीबावा
स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी : सांप्रत मनसुब्या होतात ; यांत आपणास चौघाचा उपरोध पडतो याजमुळे शेवटास जात नाहीं. ऐशास आम्ही आपले तर्फेने शफतपूर्वक हे पत्र आपणास लिहिले आहे. येविसी संशय न धरितां आपणहि शफतपूर्वक

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ईश्वर स्मरोन आमची अगर दरबारात च्यार मातबर आहेत त्याची भीड न धरितां न्याय करून विल्हेस लावित जावे. याउपर आलस करू नये. रा छ १९ रजब लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*An important undertaking given on solemn oath to Ramshastri by Sakharam Bapu that he would never interfere with the course of justice.*

No. 58] [*26-9-1774*

श्रीमंत नाना स्वामीचे पत्राची नकल.

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री शास्त्रीबाबा स्वामीचे सेवेसी.

विनंती. सांप्रत मनसुब्या होतात ; यात आपणास चौघाचा उपरोध पडतो याजमुळे शेवटास जात नाही. ऐशास आम्ही आपले तर्फेने शफतपूर्वक हे पत्र आपणास लिहिले आहे व राजश्री बापुचे पत्रहि आपणास असेच आहे. यावेसी संशय न धरितां आपणहि शफतपूर्वक ईश्वर स्मरोन आमची अगर दरबारात च्यार मातबर आहेत याची भीड न धरितां, न्याय करून विल्हेस लावीत जावें. रा छ १९ रजब. लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*An important undertaking given on solemn oath to Ramshastri by Nana Fadnis that he would never interfere with the course of justice.*

No. 59] [*9-11-1774*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
बाबूरावजी स्वामीचे सेवेसीं.

सेवक बाबूराव विस्वनाथ वैद्य कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरि; येथील कुशल तागायत छ २७ रमजान मुकाम नागपूर जाणौन स्वकीय कुशल-लेखन केलें पाहिजे विशेष. आपण येक दोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान कललें. संतोष जाहाला. पत्राचीं उत्तरे पाठविलीं आहेत. त्यावरून सविस्तर कललेच आसेल. राजश्री सेनाधुरंधर व महमंद इसफ गारदी फौजेचा जथ धरून नागपुरावर चालोन आले. राजश्री सेनासाहेबसुभाहि बाहेर निघाले.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विसा कोशाचा तफावत राहिला. लढाई रुबेकार[1] आहे. येशदाता जगदात्मा आहे. सविस्तर वर्तमान येजमानाच्या पत्रावरून कलेल. पत्राचीं उत्तरें जलदीनें द्यावीं. सविस्तर वृत्त ल्याहावें. या समई आम्हीं तेथें आसावें ते गोस्ट नाहीं. आपण आहेत तेथें मीच आहें. तेथील कालजी मी कांहींच करीत नाहीं. कारण कीं आपण आहेत तेव्हां मी कशास करावी ? आपण फार सावध असावें. बहुत काय लिहिणें, कृपा लोभ करावा हे विनंती.

¶*Baburao Vishvanath Vaidya gives news from Nagpur about the impending struggle of the Bhosle brothers. The addressee may be Baburao Keshav Thakur.*

No. 60] [*5-12-1774*

पैवस्ती छ २० सवाल मार्गसीर्ष

खमस.

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसीं.

सेवक बाबूराव विस्वनाथ वैद्य कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ शवाल मुकाम नागपूर स्वामीचे कृपेकडून वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र छ १३ रमजानचें सांडणीस्वाराबरोबर पाठविलें तें छ २६ मिनहूस पावलें. तेथें आज्ञा कीं "श्रीमंत कासारबारीच्या सुमारे आले. उभयेता सरदाराच्या विद्यमानें ठराव जाहाला आहे; परंतु त्यांतील जाबसालास दिकती पडतील. त्या येथून उगवावयास लांबण पडत्ये. दिसगतीवर पडतें. याजकरितां आम्ही उभयेतां कार्तिक वद्य पंचमीस येथून निघोन टोकेयाच्या सुमारे येतों. राजश्री सेनासाहेबसुभा यास घेऊन आपले फौजेंत येणें" म्हणोन लिहिलें तें कळलें. इकडील वर्तमान तरी राजश्री विठल बलाल सुभेदार वगैरे सरदार बालापूरचे सुमारें राजश्री हरिपंत तात्या याचे आज्ञेप्रमाणें होते; त्यांत त्याणी येऊन येकत्र होऊन मलकापुरच्या सुमारें असावें. जैसी मसलत पडेल तैसें करावयास येईल. ह्ये योजनेत होतें. येथील फौजेची समजावीस नाहीं. पैकेयास जागा नाहीं. काम सुस्तीखालें पडलें या अर्थी येजमान व कारभारी याचा विक्षेप. त्यांतहि कारस्थानी करणे ते करून उपयोगी पडावें यैसे विच्यारणेत असतां, राजश्री सेनाधुरंधर व इस्माईलखान व महंमद इसफ व झामसिंग यानी फौजेची समजोती करून श्रीमंताकडे जावें यैसें योजिलें. दरम्यान फौजा

---

१ सन्मुख, निश्चित.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

निभाव न होई किंवा उभयेतां सरदाराच्या करारांत गोष्ट नाहीं ते जाहालियानें उघड पडेल, याअर्थी तिकडील रोख टाकून नागपुरची चाल धरिली. येथील विसंच. फौजेचा गलाटा. पैका टका कारभार ठीक नाहीं हे बातमी त्यास दिनचर्येची होतीच. या समई गांठावें या मनसबेयावर राजश्री सेनाधुरंधर व गारदी मजलदरमजल किले आमनेरास आले. तेथील किलेदार भेटले. तेथें बुनगें टाकून येतात हे बातमी आली. तेव्हां छ १० रमजानी राजश्री सेनासाहेब-सुभा डेरेदाखल जाहाले. राजश्री विठलपंत यास निकडीचीं पत्रें व हातचिठ्या गेल्या कीं रात्रीचा दिवस करून समयास येऊन पोहचावें. त्यावरून ते आडवे आले. यानी येथून कूच करून पुढें जावें, तरी विनापैका कैसें घडतें ? पेकयास तर ठिकाण नाहीं. संकटांत पडले. आपण व कारभारी यानी सावकाराच्या घरास जावें, परंतु ताल न पटे. दिक जाहाले. मोठ्या संकटें यजमानानी व दिवाकरपंत व उभयेतां भवानीपंत व सर्व मुतसदी मिलोन दाहा लक्षाचा यैवज ठराविला. आम्ही व राजश्री नाना नित्य जात होतों. पुढें हिसेब पाहोन लोकांस पैका द्यावा आणि निघोन विठलपंत व आपण येक होऊन गाठ घालावी, त्यास दोन वर्षाचे हिसेब व लोकाचे देणे महबालग. यैवज थोडका. वरचेवर कैसे उरकतें ? परंतु चालीवर घेऊन करीत आहेत. तो विठलपंत व सटवोजी भोसले काटबलावर आले. दोन तीन हजार थोडकेच आहेत यैसी बातमी त्यास कळली. त्यानी कूच करून छ २२ रमजानी गाठ घातली. लडाई जाहाली. सुभेदारास भालेयाची जखम लागली व रात्रहि जाहाली. हे थोडके, ते फार. हे उधलले, त्यानी तेथेंच मुकाम केला. दुसरे दिवशीं सुभेदार वगैरे सरदार कलंबेस्वरचे मुकामी येकत्र होऊन जमाव केला. येथें बातमी आली, तेव्हां काम विलग पडेल यैसें जाणोन सर्व सरदार व लोक मुछदी येकत्र होऊन आला. लोक पुढें जावें तरी समजाविस नाहीं. पैका दिल्ह्याखेरीज कूच कैसें होतें ? याजकरितां सुभेदार वगैरे सरदार यांस आलीकडे बोलाविले. राजश्री मानसिंगराव मोहिते व आपलाजी नारायण मागें होते तेहि आले. च्यार पांच हजार जथले. तेलंग खेडीवर याजपासून तीन कोशावर पुढें आहेत. हे येथेंच आहेत. फौजेची समजोती करीत आहेत. सेनाधुरंधर यानी विच्यार केला जे, नागपुरास जाऊन फलादेश नाहीं. लोक नामी आहेत. तोफा व गारद सरंजाम आहे. आपण हार येणार नाहीं. याचे फौजेची समजावीस नाहीं तोंपर्यंत याच्यानें आपणांवर येवत नाहीं. तावत्काल मुलकांत पैका घ्यावा. फौजेचा जथ पाडावा. चंद्र-पुरीहून कांहीं तोफा आणाव्या. ये मसलतीवर आजीवर गेले. मुलकांत पैका घेतात. नागपूर चंद्रपूर आलजपूर तिनी रोख धरून वीस पंचवीस कोशाचे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तफावतीनें आहेत. पुढें कोणीकडे जातील पाहावें. हे तर आद्यापि समजाविसीच्याच घोरांत आहेत. किमानपक्षीं आणखी आठ दाहा दिवस लागतील. हा शह वारेल तेव्हां याचें येणें मलकापुराकडे होईल. प्रस्तुत यास हे मसलतच भारी आहे. ईश्वरकृपेनें व श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे प्रतापें, व आपले ममतेच्या योगें, सेनाधुरंधर याचें पारपत्य करून, भेटीस यावें हें इच्छितात. याची चित्तवृत्ति सर्व आपणांकडे आहे. परंतु आवघडोन कुपेचीं पडले आहेत. याचा पेंच वारणें आगत्य स्वामीस आहे. आम्ही यावत बुध चालते तेथपरियंत श्रम करीत आहों. मेहनत करावयास आलस करीत नाहीं. कलावें बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंती.

¶*Baburao Vaidya to Nana Fadnis, communicates details of the fierce antagonism of the two brothers Mudhoji and Sabaji.*

No. 61] [*2-12-1774*

पो १४ सवाल
मार्गशीर्ष खमस

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना साहेब
स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक बाबुराव विस्वनाथ वैद्य कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत कार्तिक वद्य १४ शुक्रवार पावेतों मुकाम नागपूर येथें स्वामीचे कृपेंकरून वर्तमान येथास्थित असे. विशेष:—स्वामीकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाल होत नवता. त्यास हलीं स्वदस्तुरचें पत्र छ ३० साबानचें पाठविलें तें छ २४ रमजानी पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कलला. आणि फार आनंद जाहाला. यैसेच निरंतर पत्रीं सांभाल व्हावा. पत्रीं आज्ञा जे, "राजश्री साबाजी भोसले सेनासाहेबसुभा यास घेऊन लौकर राजश्री हरीपंताजवळ पोहचावें. श्रीमंत दादासाहेबास उभयतां सरदार * * आणीत आहेत. परंतु श्रीमंताची बुद्धि (शास्त्र) त नाहीं. मुलकांत दंगा करितात व राजकारणेहि धड (?) करीत आहेत. त्यास उभयतां सरदाराचें लक्ष पुर्तें आपणांकडे आहे. चिंता नाहीं. परंतु आपण सावध असावें. तरतूद पोक्त असावी. जैसा प्रसंग बनेल तैसें करावयास येईल. याकरितां सेनासाहेबसुभे यास घेऊन जलद हरीपंतापासी यावें." असी आज्ञा. त्यास येथील प्रकार तर सविस्तर वरचेवरी च्यार पांच

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पत्रीं लिहित गेलों. स्वामीस पत्रें पावलीं न पावली याचा अंदेशा आहे. असो. येथील प्रकार तर येथें येऊन दोन मास होत आले व माझे पूर्वी सेनासाहेबसुभे यांस महिना जाहाला. येकून तीन मास होत आले. अद्याप कामकाजाचा प्रथम दिवस आहे! फौजेचें देणें मबलग. यैवजास ठिकाण नाहीं. वराड प्रांतांत दोन वर्षे दंगा, याकरितां तिकडील रुपया येक जमा नाहीं. देवगड प्रांतीचा मजकूर तर इकडेहि सिबंदी होती त्यामुलें इकडील यैवजास तपसील लागला. रुपयास ठिकाण नाहीं. नित्य धरणेयासी समध. राजश्री सेना-धुरंधर व इस्मालखान व झामसिंग याणी यैवजाची तोड लाऊन फौजेची समजावीष केली. कांहीं नवी फौज ठेविली. महमद इस(ब) त्यास मिलाला. याप्रमाणें जथ करून श्रीमंताकडे जावें, त्यास मध्यंतरी राजश्री तात्या होते व सेनासाहेब-सुभे याचीही फौज होती. याकरितां तिकडे जावयाची सोय न बनली. तेव्हां सेनासाहेबसुभा याचा गळाटा पाहून इकडे चाल धरली. मजल दरमजल आमनेरास दाखल जाहाले. आमनेरचे ठाणें हस्तगत केलें. नागपुरास आमनेरास तिसा कोशाचा तफावत तेव्हां येथें गलबल फार जाहली. सेनासाहेबसुभे यास संकट पडलें. तेव्हां डेरे दाखल जाहले. वराडांत फौज होती ती बलाविली. त्यास पत्रें निकडीने गेलीं. तेही मजल दरमजल त्याचे पिछावर आले. येथील कामाचा बंदोबस्त करून कूच करून पुढें त्याचे तोंडावर जावें, त्यास अद्याप फौजेची समजावीष जाहाली नाहीं. कबजे आकारीत आहेत. त्याचे निकडीचें वर्तमान आलें कीं, आमनेरास दाखल जाहाले. तेव्हां सर्व मुछदी व सावकार मिलोन मोठ्या आग्रहें करून दाहा लक्ष रुपये * * केला. त्यास याउपर फौजेचे कबजे होऊन रुपये वाटावयास आठ रोज लागतील. काम चालतें जाहालें. आठा दिवसांत समजोती पडेल यैसें दिसतें. लवकरच पडेल. राजश्री विठलपंत सुभेदार वगैरे फौज व सरदार त्याचे पिछावर आले होते. त्यास त्याकडील लुटारे मुलकांत दंगा करितात याकरितां विठलपंत सुभेदार व सटवाजी भोसले यैसे सडे दोन हजार फौजेनिशीं त्याचे तोंडावर आले. त्यास त्याणी बातमी ठेऊन खासा गारदीसुधा याजवर चालोन आले. याची बातमी होती. परंतु बातमी व ते बराबरच आले! तेव्हां गाठ पडली लडाई जाहाली. हे थोडे ते फार. व संध्याकाल जाहला. याकरितां हे निघाले. लडाई चांगली जाहाली. विठलपंत सुभेदार यास जखम भाल्याची आहे. याप्रमाणे जाहालें. मागती फौजेचा आला पडला. त्याचे तोंडावर जमून आहेत. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विज्ञापना.

¶Baburao Vaidya from Nagpur, communicates to Nana Fadnis details of the antagonism between the two Bhosle brothers.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 62] [*4-12-1774*

श्री

राजश्री सखारामपंत बापू गोसावी यासी

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो साबाजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत आसावें विशेष, आपण छ १४ रामजानीचे पत्र पाठविले ते छ २५ मिनहूस प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय कलला. उभयता सरदार मध्यस्त यानी राजश्री रघुनाथरावदादा यासी कासारबारीने घेऊन आले. दाहा लक्ष रुा जाहागीर व दोन किले द्यावे यैसा निश्चय जाला. ते घ्यावे. मग जर श्वस्त कराराप्रा न राहातील, तरी दाबून सांगो, यैसी पत्रें त्याची आली. मातबर सरदार त्याजवर विश्वास ठेविला. तेव्हा त्याणी वचन केले ते पार पाडिले पा. त्याजवरून कराराप्रा द्यावयाचे त्यांस लेहून पा. आपणाकडील गुंता उरकिला. परंतु इतक्यानेच आईकतील यैसा तो भरवसा नाहीं. नाना प्रकारे हिस्के देतील. लाबण पडते. मनसबा लौकर सेवटास जात नाहीं, असे जाणून, आपण व राजश्री बालाजीपंत नाना कार्तीक वद्य पंचमीस पुर (धरा) हून निघोन टोक्याचे सुमारे पुढें येत आसों. नवाब छ १५ रमजानी डेरे दाखल होणार तेहि जवल पडतील. सरदार जाबस्वालास म्हणून निरोप घेऊन येतील. सदरहू जथ पाहून नरमहि पडतील. सर्वांच्या विचारे सागो तसे आईकतील. न आईकिल्यास जसे पाहू तसे करू, राजश्री हरिपंत व धौसे त्याजवल राहातील. सरदारांचे लक्ष इकडे आहे. दादाचे करणे अनान्वित, आपण जाणतात. त्यास नागपुराहून कूच केलेच आसेल. लौकर आपले फौजेत मिलोन मलकापूरच्या सुमारे यावे. येथून लेहून पाठऊ तसे करावें. रा हरिपंत जवल आहेत ते लिहितील तसें करावे म्हणून लिहिले. अन्वय अक्षरशा कललें. यैसियासी फार उचित आहे. हे मसलतीस संवत्छर पुरले, आद्याप कडेस लागावीच आहे. सरदारी खर्चाखाले आली. मुलूक पायमालीत आला. बंदोबस्त विस्कलीत. या आर्थी कडेस लौकर लागावी हेच नीट आहे. त्याच मसलतीच्या पोटांतील आम्हांकडील मसलत दोन वर्षे लांबली. पैशाची आडचण, लोकाचे मनोधारण ठेविले पाहिजे. ज्याणे जैस म्हटले तसेच आईकणे लागेल. घरातील कल (मे) *(कि) तेक प्रकारची, वेध (?) फंद, वराड प्रांत इस्माईलखान त्यास मिलाला याजमुळे येक रु॥ आम्हाकडे येऊ नये. प्रांत खवारीत आला. देवगड प्रांतांत दोन च्यार ठाणी माहाल तिकडील फितुरांत पडले. (वर)

श्री
श्रीशाहूराजपदांभोज
भ्रमरायितचेतसः विंबा-
त्मजस्य मुद्रैषा राघवस्य
विराजते.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
कड पैसा येथील सिबंदीखाले गेला. मातुश्री दर्याबाई याचा ठहराव राजश्री हरिपंतानी करून दिल्हा. त्यापैकी आणुमात्र करार उतरला नाहीं आकोलियाचे मुकामी केवल गोष्ट विथर पैक्यामुले जाहाली. त्यांत फंदरंद दिसले. त्या प्रकरणी समय गांठावा वेल टालावी याजकरितां नागपुरास मसलत सेवटास गेली नाही. जाऊ नयें हे तरी पारिछिन्न गोष्ट आसतां चुकी समजोन आलों. लोकाचे देण्याचे तोदे, येथे पैक्यास ठिकाण नाहीं. आनेक प्रकारें तोडजोड करून सात आठ लक्ष रुा जागा करून कोण्याप्रकारे येथून निघोन, तात्याजवळ जावें हा सिधांत. त्यांत येथील आडचण विसंच पाहोन, सेनाधुरंधर व इस्माईलखान व झ्यामसिंग याणी आठ दाहा लक्ष रुा रोकड लोकास वाटून आमनेरास आले, लगट करून येथे यावे दगा करावा. त्यास नाईक, पाटणकर घाटगे, माने, यादव, घोरफडे, उमदे कुलीण लोक व पठाण मंडली प्रसंगांस घालणार नाहीत. लोकाचा जथ सजला पाहोन आमनेरी थबकले. राजश्री विठल बलाल सुभेदार, वगैरे यास हे वर्तमान कलतांच चिरंजीव (सटवो) जी भोसले व ते आडवे दोन हजारासी काटवलावर आठ कोशाच्या तफावतीने उभे राहिले. याजवर चालोन आले. छ २१ रमजानी जुज जाहाले. दुतर्फा कायम राहिले. विठलपंतास भाल्याची जखम लागली. दोहीकडील से पनास माणूस जखमी व दाहा पंचवीस कामासहि आले, तेथेहि अजमास कलला. त्यानंतर मुलकाची खराबी स(त्यना)स करीत येथून वसि कोसी फिरतात. त्याचे पारपत्य करावें. त्यास लोकाची समजावीस जाहालियाविना कूच होत नाहीं. येथें प्रसंगास लोक अंतर देत नाहीं. याप्रकारे आवघडोन प्रस्थानी आसों, आमचे व या दौलतीचे आभिमानी आपण. आमचे लक्ष येकरूप आहे. बारीक मोठे कचे वर्तमान आपणास कलावे हाच मनोभाव जाणून येथंभूत लिा आहे. लोकाची समजावीस करून यावे. आम्ही येथें परंतु प्राण मसलतीच्याच प्रकर्णी आहे. रा छ २९ माहे रमजान बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Sabaji Bhosle to Sakharam Bapu, writes frankly of his domestic troubles.*

No. 63] [*5-12-1774*

श्री

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक सदासिव रघुनाथ सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता छ १ सवाल मुकाम मौजे भोंडगांव येथें सुखरूप आसो. विशेषः—आपण आज्ञा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

केली कीं बोरघाटचा बंदोबस्त करणे त्यावरून आम्ही मौजे मजकुरी येऊन बोरघाटचा शोध केला. परंतु बोरघाट दहिवली कसब्याखाली नाहीं. येविसीं पत्र राजश्री भिकाजीपंत याचे कारकून राजश्री नारोपंत यांणीं लिहिलें ते सेवेसी पेशजी जासुदासमागमे पाठविले व बोरघाटचा शोध येथे केला परंतु ठिकाण लागत नाहीं. खारशापासी एक घाट सादडवी बारीचा मात्र आहे. तेथें जावे तर आपली आज्ञा नाहीं, व तेथील कमाविसदार यास आपले पत्र नाहीं याजकरितां तेथें गेलो नाहीं. जासूद पाठऊन तेथील वर्तमान आणविले त्यास खरसेगांव येथील कमाविसदार उखाजी गडदे, चिमणाजी देशमुख याचे दहशतीमुळे पळोन गेले. गावहि उज्याड जाला आहे. घाट चालत नाहीं. याप्रमाणें तेथलि वर्तमान. आम्ही येथे मौजे मजकुरीं बसलों आहोत. तरी आपण जी आज्ञा करितील त्याप्रमाणें वर्तणूक करूं. खारशास जावयाची आज्ञा जाहल्यास जाऊं. परंतु आणखी जासूद व गाडदी मिळोन पन्नास पाऊणसें पाठविल्यास तेथलि बंदोबस्त होईल. नाहीतर आपल्यापासीं यावयास आज्ञा जाली तर येऊं. श्रीमंत राजश्री दादासाहेब लाडोद्यावर आहेत. समागमे इंग्रज दोन तीन हजार आहेत. वरकड इंग्रेज सुरतेस लग्नास गेले आहेत. श्रीमंताचे मुकाम लाडोद्यावर तीन चार आहेत. इंग्रज आल्यावर सोनगडास येणार असे वर्तमान आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Raghunath to Haripant, proposing to him the arrangement for the defence of Borghat. The halt of Dadasaheb accompanied by 2000—3000 English troops is communicated in the letter.*

No. 64] [*5-12-1774*

पौ छ २० सवाल मार्गसीर्ष

खमस.

श्री.

श्रीमंत राजश्री सखारामपंत बापू

स्वामीचे शेवेसी.

पोष्य भवानी सिवराम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथलि कुशल मार्गसीर्ष शुध द्वितीया इंदुवासर मुकाम नागपूर जाणून स्वकीये कुशल लिहित असिले पाहिजे विशेष. छ १४ रमजानीचे पत्र आपणाकडून आले ते छ २६ मिनहूस प्रविष्ट जाहले. टोक्याचे सुमारे येत असों. राजश्री सेनासाहेब सुभे यांणी * * सुधां मलकापूरच्या रोखे यावे. पुढे येथून लेंहू

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
तसे करावे, या अन्वई सविस्तर अन्वय कळला. त्यास येथील लक्ष दुसरे नाही. दोन वर्ष घरकलह पुरवला. मुलुक खराबीत आला. पैशावाचून फौज कशी राहाते? मातबर सरदारी, लोकहि कुलीण, तत्रापि सिबंदीचे काम, तलबा चढल्या देण्याचे तोंदे भारी जाहले. त्यांत मुदयेगिरी घरांतील अनेक प्रकारे. कितेक फंद फितूर. कल राखतां कोठवर सांभाळावे, हे अर्थ वारंवार आपणास लिहित आहो. राजश्री हरिपंत तात्या यासहि इतला आहे तेहि लिहित असतील. श्रीमंत राजश्री सेना साहेबसुभा यांचा भावार्थ एकरूपच आहे की, आपले व या दौलती-सुधां वालीपणा आपणाकडे लाविला. तेव्हां तिकडील बंदोबस्तात आणि कल्याणातच आपले कल्याण. सेवक तरी स्थापित आपला. प्राप्त प्रकार एकच, त्यांत लोकांनी अवघडविले. एका पैक्यामुळें परश्वाधीनता जाहली. कितेक संच्यार गृहछिद्रें. त्यांचे कल खालीं हातावर तोडजोडी राखाव्या आणि उप * * पाडावा हेच लक्ष आहे. सविस्तर कचे वर्तमान यजमानसाहेबी व राजश्री नानाजी कृष्ण व बाबुरावजी याच्या पत्रावरून कळो येईल. काही समजाता लोकांचा जाहला; राहिला तो करून बाहीर निघावे. छ ११ रमजानी प्रस्थाने डेरे-दाखल येजमान आहेत. सेना-धुरंधर व महंमदइसफ यांणी वेसंद पाहिली आणि रुबकार[1] जाहले. याचा बंदोबस्त जाहाला पा. तो करून येत आहेत. जीवप्राण दौलतीचे ठाई आपणाजवळ आहे. कळावें बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Bhavani Shivram writes to Sakharam Bapu details of Mudhoji Bhosle's plans and movements.*

No. 65] [*7-12-1774*

श्रीशंकर

पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामाचे सेवेसी.

साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ३ शवाल पावेतों मुकाम नागपूर येथें स्वामीचे कृपेकरून सुखरूप असो विशेष. स्वामीकडून पत्रें वरचेवरी येतात जे "सेनासाहेब सुभेयास घेऊन लौकर फौजेस (ह) मलकापुरावर यावें. येथून पत्रें पाठऊं, त्या प्रमाणें वर्तणूक करावी." यैसी पत्रांत आज्ञा. याप्रमाणेंच राजश्री हरिपंत तात्याचीं पत्रें येतात. परंतु उपाय नाहीं. येथील सविस्तर मजकूर पेशजी स्वामीस लिहिला आहे, त्यावरून ध्यानास येईल. राजश्री सेनासाहेबसुभे आपलीं पत्रें येतात तेव्हां विव्हळ होतात कीं, या समई आम्ही त्याजपासी असावें; त्यास आम्ही दैवहीन, पत्राप्रमाणे वर्तणूक आम्हापासून होऊ नये! आम्ही आपलेंच

---

१ युद्धाला सन्मुख; एकत्र. नमूद.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

रडगाणे नित्य आपणांस ल्याहावें! दैवास उपाय नाहीं! यैसे कितेक प्रकारें भाषण उदासीनतेने करितात. परंतु उपाय नाहीं. अवघडोन आहेत. आतील पेच; उपाय नाहीं. काम सुस्तीवर. यैसे कित्येक प्रकार विलग आहेत. आम्ही यावत बुध चालत्ये तितकी मेहनत करीत आहों. परंतु मोहरा विलग पडला. यास उपाय नाहीं. कोणे समई काय घडेल हा भरवसा येत नाहीं. याच संकटांत आहों. स्वामीचें पुण्य समर्थ आहे तरी इतकेंही पार पडेल. आंतून यजमानसह संधानास चुकत नाहीं. सारांश क्षेत्र शुध आहे. याविशईंची खातर-जमा जाहली व स्वामीची असावी. कोणेविसी संदेश नाहीं. सेनाधुरंधर याचे सख्याचा मजकूर स्वामीनी पेशजींचे पत्रीं लिहिला होता, त्यास येथें त्यांतील अर्थ कांहीच नाहीं. याचे प्राणावर ते आहेत तेव्हां कसें घडेल? आणि आपल्या खेरीज कसें घडेल? कदापि घडणार नाहीं. स्वामीचे आज्ञेसिवाय येथें दुसरें कांहीच नाहीं. कलावें. कांहीं तोफा[1] जिनस मिळवावा व बंगाली सणगें उंच मिलवावीं यैसी आज्ञा. त्यास बंगाली सणगें उंच कांहीं मेलविलीं आहेत. तोफा जिनसाचे शोधांत आहों. कोठें शोध लागल्यास आंतर होणार नाहीं. रामटेकी पानें पेशजीं पाठविलीं आहेत; पावलीं असतील. आणखीहि रवाना करीत आसों. मार्गाचा सुभता[2] नाहीं. याकरितां विलग आहे. नाहींतर हमेशा पाठवितों. कलावें स्वामीचे चरणाचा वियोग साहावत नाहीं. याउपर लवकर आज्ञा होईल तर स्वामीचरणाजवल येऊन, भेटीनंतर सर्व निवेदन करीन. सर्व प्रकारें सांभाल करणार स्वाम समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा लोभास पात्र असे हे विज्ञापना.

¶*Baburao Vaidya (as it appears from the handwriting) writes to Nana Fadnis from Nagpur movements and plans of the Bhosle brothers.*

No. 66] [*21-12-1774*

पौ छ २४ सवाल.

खमस सबैन मार्गेश्वर.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

नारोपंत[3] नाना स्वामीचे सेवेसी.

पो सिवाजी विठल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १७ शवाल पावेतो मु॥ बेटावद प्रांत खानदेशे येथे येथास्थित आसो विशेष आपण

---

१ उत्कृष्ट, फर्मास. २ मार्ग चालत नाहीं, सुपथ नाहीं. ३ नारो अनंदराव केसकर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तिकडे गेलिया ताा काही पत्र येऊन वर्तमान कलत नाही. तरी आपण कोठ-पर्यंत गेला पुढे मनसबा काये निश्चये केला? हे ल्याहावे. दुसरे जातेसमई पाा उरपाडेविसीई समक्ष सांगितलें होते, त्यांसी श्रीमंत राजश्री दादासाहेबी नरोतमदास सुरतकर यांसी लिहून पाो मजकूरचे ठाणे उठऊन आमल त्यानें बसविला. आपणच जबरदस्तीने उठऊन दिल्हे, यैसे परिछिन्न, माहाली राजश्री बाळाजी लक्षुमण यांचे लिहिले आले. येथून उपराला करावा तरी येंदाचा प्रकार बहुत विलक्षण जाला. आधीच वोढगस्त. त्याजमधे सरंजामी माहाल. दरोबस्त धुले, सोनगीर दोन्ही माहाल, येक महिनाभर दादासाहेबी मुा करून लुटून पस्त केले. गाव खेडी घरे राहिली होती, सांप्रत्य उभयेता कारभारी व नबाब याणी मोकले केले! रसदा मामलेदाराच्या घेतले, त्याजपौ पांच रुपये वसूल जाले नाहींत. मालव्यांतील माहाल पेढारी घालून उभयेता सरदारानी लुटले. उरपाड भारी सरंजामाची बेरीज, येथील अवस्ता आपणच पाहावी. उरपाडचा उपराला येथून व्होणेच शक्य नाहीं. येक आपला मात्र भरवसा आहे. प्रसंगास आपण सुरतेस गेलेत म्हणून ऐकिले. त्याजवरून अजूरदार जासूद करून पाठविला आहे. तरी उरपाडचा मामलेदार येऊन आपल्यास माहीत करील, त्याप्रो बंदोबस्त करून द्यावा. नाना! सालमजकुरी आमची बहूत खराबी झाली. तो विस्तार पत्री लिहिता येत साहीं. सारांश चितावरी घेऊन उरपाडचा बंदोबस्त करून द्यावा. आमचे ठिकाणी आपण तेथे आहेत. नरोतमदासापासी काहीं सरंजाम मातबर नाही. आणि श्रीमंत राजश्री दादासाहेब उभयेता सरदारास सोडून धुल्यापासोन वीस कोस मजल करून, दरकूच मालव्यांत गेले. सरदार माघे येका मजलीने आहेत. त्याजमाघे राजश्री हरिपंत धऊसासुधा आहेत. त्याजमाघे तीन मजलीचे तफाव-ताने कारभारी व मोगलसुधा आहेत. रास्ते, वामनराऊ हरिपंतास सामील जाले. दादा पुढे दीढ दोन हजारानसी निघून मालव्यांत गेले. वदंता सुज्यायेतदौल्याकडे जाणार. यैसे वर्तमान आहे. रेवातीरास कारभारी नवाब जाऊन, दम धरून काही उभयता सरदारांचे विचारे जाले तरी काही तहात आले तरी येईल. सिंदे होलकरानी आशेस गोऊन किल्यावरून उभयेतास काढून, दादासी बिघाड मसलत लांबऊन, खर्चाखाली आणले. दादास काढून दिल्हे. पुढे काये होईल ते पाहावे. उरपाडचे कामाचा बंदोबस्त करून द्यावा. येथील प्रसंग यैसा जाला आहे. येणेकडून नरोतमदासहि दबेल. गायेकवाडहि दबल. तिकडील वर्तमान ल्याहावे. उरपाडचे काम करून पुढे जावे. येथून किरकोल सामान पाठवावे तर येथून तूर्त धाडता न ये. तैसा प्रकार तेथील. आपणच तेथील बंदोबस्त करून पुढे जावे. येवसी पूर्वी सरकारचे पत्र पाठविले होते. पत्रावर मजकूर काये?

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आपणच बंदोबस्त करतील. परंतु आज्ञा आसावी म्हणोन माघेच पाठविले. आधी उरपाडचा आमल बसऊन द्यावा आणि किरकोल कामे तेथील मामलेदार सागतील ती करून द्यावी. येथील मजकूर येथास्थित आहे. चिंता नाही. परभार रो भिवराव आवा लिहीत आसतीलच. आपण पत्र लिहीत जावे. तेणे करून संतोष आहे. विशेष काय लिहीणे लोभ कीजे हे विनती.

¶Shivaji Vithal Vinchurkar to Naro Anand Keskar, the Peshwa's officer in Khandesh : details of the movements of the Scindia and Holkar and their forces.

No. 67] [*12-12-1774*

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गोसावी यासी विनंती उपरी. तीर्थस्वरूपाचा पलोन जावयाचा मनसुबा आहे. त्याजब(राबर) * * * (रा)मचंद्र याचा वगैरे जावयाचा मजकूर आहे. सदासिव रामचंद्र याची व हरिपंत भिडे वगैरे याची मुले माणसे पुण्यात आहेत; ती हे पलाल्यावर दुसरे जागा पाठवावी लागतील. त्यास मुला माणसाची बंदोबस्ती चांगली राखणे. मागाहून आज्ञा होईल त्याजप्राा रवानगी करणे. जाणिजे. छ ८ सवाल सुा खमस सबैन मया व अलफ * हे विनंती.

¶Sakharam Bapu to Naro Appaji, warning him against Sadashiv Ramchandra's family running away from Poona.

No. 68] [*15-12-1774*

पौ छ २० सवाल

मु॥ काातळेसाबळे (?)

श्री

तीर्थस्वरूप राजश्री मामा वडिलाचे सेवेसी.

आपत्ये जैवंतरायाने सास्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षम ताा छ ११ सवाल मुकाम जावी प्राा सोनगीर खानदेश येथास्थित असे. विशेष. वडिला-कडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाही; सविस्तर ल्याहावे. इकडील वर्तमान तर, श्रीमंतास उभयता सरदार घेऊन आले होते; परंतु फिरोन श्रीमंताचे बुधीस काये विपर्यास काये जाला हे न कले. श्रीमंत पलोन गेले. नरमदेपली-कडे गेले. आम्हास साठी कोसाचे अंतर आहे. दरमजल बारा कोसाची मजल

---

* Last two words in Sakharam Bapu's hand.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

करीतच आहोंत. सिंदे होलकर आम्हापासून तिसा कोसाचे अंतऱ्याने पुढे आहेत. सडी फौजहि दाहापंधरा हजार भरणा आहे. श्रीमंत बापू नाना आवरंगाबादेनजीक आहेत. नवाबाच्या त्याच्या भेटी होणार. आम्हाबराबर धोस्या आहे. आम्हास हरिपंततात्याजवल येऊन चार पांच रोज जाले. तीर्थ-स्वरूप आबा व चिरंजीव रावजी आपा राज्याबाबा आन्याबा ऐसे बापूसमागमे आहेत. सात तोफा आम्ही बराबर आणिल्या आहेत. वरकड मागे आहेत. घरची सर्व सुखरूप आहेत. सदैव पत्र पा आज्ञा करावी. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Jaivantrao informs some Mama that Raghunathrao has crossed the Nurbudda and that he is separated from the writer by a distance of 60 kosas. News about Bapu and Nana, who were near Aurangabad, and also about Haripant is given by the writer.*

No. 69] [*16-12-1774*

पो छ १३ सवाल

सुा खमस

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी.

पोष्य रामराव नारायण देशमुख कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ १२ सवालपर्यंत यथास्थित असे विशेष. ठाणे साष्टी येथील बेटांत इंग्रेज व फिरंगी दोन हजार फौजेनिसी दारुगोल्याचे सरजामसुधां येऊन दाखल जाला आहे म्हणोन वर्तमान कलले. त्यावरून शेवेसी लिहिले आहे. पकी बातमी आणावयास माणसे रवाना केली आहेत. तथ्य वर्तमान कलल्यावर शेवेसी लेहून पाठऊं. दोहो तिहीकडील बातम्या आल्यावरून तो किले राजमाची येथील किल्याचा बंदोबस्त राखून कुमकेस लोक रवाना केले. इंग्रजाचे लोक टापूत फार उतरल्याची बातमी आहे. यास्तव मातबर कुमक असावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramrao Narayan Deshmukh informs the Peshwa of the arrival of British forces against the fort of Thana.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 70] [*16-12-1774*

पौ छ १९ सवाल सन खमस

सबैन मार्गसीरष सा घटका रात्र.

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामीचे (सेवेसी).

विनंती उपरी. पत्र पाठविले प्रविष्ट जाले. तामस माष्टिन यास सुरतेचे जनराली सांगावयाबदल मुंबईचे जनरालानी बोलाऊन नेले. स्वारीतून जाबसाल आणवितो मग जाणे असें यास म्हणत असतां लौकर गेले पाहिजे म्हणून म्हणाले आणि गेले. येविसीचा मजकूर विस्तारे लिहि * * त्याणी आपला माचालेन (?) (भाचा लेन ?) पुणियात ठेविला. तो येक दोन मजला त्यास पोहचवावयास गेला होता. तों फिरून माघारें आला की काये ते लिहिणें. सुरतेस सरकारचा अंमल आहे. त्यास नरोतम किशोरदास याणी तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब याजकडून पत्रे आणून दिकत केली आहे; येविसी तामस माष्टिन यास व राजश्री नारो आनंदराव केसकर यास पत्रें पाठविलीं आहेत. ती नारो आनंदराव याजकडे रवाना करणें. ते तामस माष्टिन (सुर) तेस आल्यावरी त्याचें पत्र त्याजकडे पाठवितील. जाणिजे छ १२ सवाल सु॥ खमस सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे. नरोतमदास सुरतेस गेला असिलियास, तामस माष्टिन यास तेथून लेहून पाठ (वणे). (नरो) तम किशोरदासास धरून सरकारात पाठ * त ते करणें. जाणिजे * विनंती.

¶*Sakharam Bapu asks Naro Appaji to forward letters to Naro Anandrao Keskar for Thomas Mostyn.*

No. 71] [*1774-75*

श्री

यादी तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब याचे समागमे मंडली गेली आहे. त्यांची मुलेमाणसे किलेहाय येथे अटकेत ठेवावयासी पाठविली. सुरु खमस सबैन मया व अलफ

१ सदाशिव रामचंद्र याची स्त्री व पुत्र किले तोरण्यांवर राजश्री पंतसचीव याजकडे.

१ हरी रघुनाथ भिडे यांची स्त्री व सासू व कन्या व मेहुणा आबाजी आपाजी किले पाल उर्फ सरसगड येथे.

१ किले सिहीगडावर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१ रामचंद्र विठल नि॥ चिटणीस याची माणसे.
१ सखाराम हरी याची आई बायका मारानिलेच्या पूर्वीच पलोन मुंबईस गेल्या. आई आहे ती किले मारी ठेविली.
१ मल्हार येसवंतराव याची बाइको व मुले.
१ लक्ष्मण आपाजी नातू याचा पुत्र.

४

१ बच्याजी बलाल काणे यास किले चंदन नि॥ शामराव जगजीवन येथे.
१ प्रताप चोपदार याची बाइको व बाप व आई मिलोन तीन आसामी किले घनगडावर:

५

४ तालुकदारास सनदा, मुले माणसे अटकेत ठेवावयाविसी लिहिल्या.
१ तालुके रत्नागिरी नि॥ महिपतराव कृष्ण.
१ गणेश विठल त्रिवर्ग बंधु याची माणसे.
१ आपा व गोपाल व भास्कर लिमया यांच्या बाइका.
१ बालकृष्ण व माहादेव व कृष्णा करमरकर याच्या बाइका.
१ बाबू भागवत.
१ भिकू गोडबाला.
१ अंताजी नारायण पराजपे.
१ राघोबा बेहरा.

७

१ माहादेव केशव गोगाटा यांची * * * * * (पुढें फाटलें)

[बंदाची दुसरी बाजू]

किले मिरगडावर

१ बाबूराव बलाल काणे याची माणसे चिमाजी माणकर प्रांत राजपूर याजकडे.
१ तालुके त्रिंबक नि॥ नारो माहादेव
१ रामचंद्र नरसी तुलपुला
१ जगजीवन पवार

२

४

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

० पेसजी किल्यांवर ठेविली त्याप्रोच अटकेत आहेत ते.

१ खरगासिंग याची बाइको सिवनेरीवरी.
१ तुलाजी पवार याची माणसे कोरीगडावर.
१ रामकृष्ण कासीद याची बाइको चाकणेस
१ छट्टू फरास याची बाइको चाकणेस
१ आबाजी माहादेव याची धाकटी बाइको दौलताबादेवर
१ राजाराम गोविंद याची माणसे नगरास आहेत.
१ सिंदोजी नरसिंगराव याची बाइको व राख लोहगडावर
१ मल्हारी गांत (?) याची रायगडाव(र)

८

सदरहू आसामीची किल्यावर माणसे आहेत सा दखलबद

१ सिदोजी नरसिंगराव याचा लेक व बाइको येथे आहेत तेहि किल्यावर पाठवितो.

१०

¶*The paper mentions some of the accomplices of Raghoba and the punishment which they met. The forts on which they were kept in confinement are also mentioned.*

No. 72] [*5-1-1775*

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गो

विनंती उपरी. इकडील वर्तमान तर राजश्री हरी बलाल व उभयता सरदाराची भेटी उजनीपलीकडे दोन मजलीवर जाहली. तीर्थरूप उजनी पलिकडे जाऊन गुजराथ प्रांत बडोद्याकडे जावयाचा रोख धरला आहे. त्याचे पाठीवर हरी बलाल सरदारसुधा आहेत. पाठलाग करावयास चुकत नाही. मागाहून होईल वर्तमान लेहून पाठविले जाईल. आम्ही व नवाब येका दो दिवसी बराणपुरानजीक जाऊ. तेथे गेल्यावर नवाब आपले कार्यास जातील. आम्हीहि देसी लौकरच येऊ. आल्यानंतर आम्हाबराबरची फौज साष्टीचे मसलतीस रवाना होईल. जाणिजे छ २ जिलकाद सु॥ (खमस) सबैन मया व अलफ. फौज लौकरच रवाना होईल. बहुत काये लिहिणें हे विनंती.

¶*Sakharam Bapu to Naro Appaji, giving news of Dadasaheb's movements and himself offering to return soon from Burhanpur.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 73] [*7-1-1775*

श्री

राजश्री रामचंद्रराव नारायेण व आपाजी रामचद्र गो.

सुा खमस सबैन मया व अलफ तुम्हास जाऊन च्यार पाच रोज जाले. तेथे पोहोचून बोलण्याचा प्रकार जालाच असेल. त्यास सविस्तर अर्थ समक्ष तुम्हास आज्ञापिले आहेत. तरी कोणे गोष्टीचा लडा पडो न देतां तयारींच करऊन सरंजाम बाहेर काढवणे. मसलतीस आवधी राहिलीच नाही. फितुरियाची फौज या रोखे येत आहे यैसी बातमी आली. राजश्री गोविंदराव गायेकवाड याची फौज भारी आहे व सरकारची (अशा) दोन फौजा येकत्र जाल्या. आथःपर फितुरियाचा मुजाका नाही. लढावयाचीच मसलत. दुसरा अर्थ नाही. यास्तव वख्तसीर इंग्रजाकडी [ल] सरंजाम पोहोचावा हे उचित आहे. अथःपर येक घडीचा विलंब नसावा. बोलण्याचे प्रकार काही बाकी ठेविले नाहीत. जाबसाल न्यावयाचा अर्थ राहिला नाही. ऐवजाचे संकट, तो अर्थ तुम्हास समजोन सांगितलाच आहे. त्याप्रो करोन जमेत घेऊनच येणे. जाणिजे छ ४ जिलकाद आज्ञाप्रमाण. शंभर खंडी दारू व दाहा खंडी सिसे याचे प्रयोजन आहे. त्यास भडोचेस मिळेसें असिल्यास सुरतकर इंग्रजास सांगोन, त्याचे पत्र भडोचकरासी सदरहूप्रो दारू सिसे विकत देणे म्हणोन घेऊन पाठवणे. भडोचेस सोय नसलियास सुरतेसच ठीक करोन लेहून पाठवणे, म्हणजे खरेदी करून आणविलें जाईल. छ मजकुरी ऐवजाची वोढ घेणार नाहीत. कदाचित ओढ घेतली तरी ऐवजाची तरतूद सुरतचे अमलाचे ऐवजी आथवा हरयेक ऐवजी रुो लाऊन देणे. त्याप्रो वराता पाठऊ. तूर्त दारू व सिसे पोहचे ऐसे करणे छ. मजकूर

लेखना
वधि

¶**From here is the hand of Raghoba, who writes this letter to his agents at Surat to procure gunpowder through the British.*

No. 74] [*13-1-1775*

पो छ १३ जिलकाद.

खमस.

श्री

सेवेसी साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. पेसजी खुसकीचे मार्गी कल्याणास च्यार पत्रे पाठविली व दादोपत यांचे सोबतीचे माणसाबराबर एक पत्र रवाना

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

केले. ती पावली न पावली हे कळले नाही. हली तीन लेखांटे त्रिंबक नाईक व खुशाल उदमी नि॥ पांडु लकडे याचे स्वाधीन केले. मारनिले गुंत्यामुळें न गेले म्हणोन आज हे चौथे पत्र त्याचेच समागमे सादर केले असे की, इंग्रेज काल साष्टीस जातेसमइ बोलले ऐसीजे "श्रीमंत राजश्री दादासाहेब धनी नव्हत; तरी आज एकवर्ष पावेतो कारभारी याही दरब्यांचा व मुलकांचा नाश करून फौज बाळगून पाठीमाघारे लागले. केले काय? धरून बंदीस का न ठेविले? सारंष तेथे ईश्वरी तेज आहे म्हणूनच काहीच ह * * * नाही. ऐशास ते धनी व हे चाकर तेव्हा याचा हात त्याजवर कसा चालतो? सांप्रत सावकारी बातमी आहे की, श्रीमंत तीनसे स्वारानसी वाडोद्रास दाखल जाले. मागाहून सा हजार फौजानसी राजश्री गोपाळराव बरवे त्यास सामील येतात. हे वर्तमान खंबाईताहून सुरतेस आले. तेथून मुंबईस प्रविष्ट जाले. वसई मागेपुढे आमचीच आहे. निमित्य कीं, घोडबंदर व धारावी मजबूत केल्याने वसईचा किला कसा दुसरेयाचे हाती राहतो? वसईहून एक दोन तोफाचे गोळे धारावीवर मारले ते लागू जाले नाहीं. धारावीहून एकच गोळा मारला तो जाऊन किल्यात पडला" याप्रमाणे बोलत होते. इतुके लस्कर आले आहे व येत जाते म्हणोन लोक अफवा, तरी "सारी पेशव्याई उलटून पडेना का साष्टी व उरण आमचे हातातून जाणार नाही. साष्टी व उरण सोडून दुसरे जागांचा सलुक करितील त्यास आम्ही सिध आहो," ऐसेहि बोलले. त्यांस आम्ही जाबसाल घटे तसा करावा, तरी समई नाही. पेचात आहो. सर्वास आश्चिर्य वाटले आहे की, संपदा काहीच नसता इतुका दाब धरितात व मगरुबीच्या गोष्टी सांगतात हे काय? ऐशांत च्यार पांचा हजार माणूस साष्टीस उतरून पडल्यास धारावी घोडबंदर वानरें कुरले चेदणीचे बंदर बंद केल्यास अगदी सापडून जातील. वारंवार किती लिहावे! राजश्री अनंद राव सुभेदार व हवालदार यांची काडीमात्र चिंता न करावी. जरी हला केला तरी चिंता नाही. जनराल व टेलर व एक दोन साबतीचे इग्रेज काल साष्टीस गेले आहेत. सा सात रोजी फिरुन येणार. इतक्यांत जाले त जाले. मागां च्यारसे माणूस टोपीकर साष्टी * * * * होते. पैकी शंभर माणूस आरमारावर चढविले व दोनसे माणूस फिरून साष्टीस गेले. कळावे आम्हाविसी काय आज्ञा ती करावी. निधानी मुबईहून हर कोठे निघोन जाईन. रवाना छ १० माहे जिलकाद, सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter from Bombay, giving an account of the movements of the British.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 75] [*22-1-1775*

पौ छ २४ जिलकाद सन

खमस सबैन पौष मास.

श्री

शेवेसी त्रिबक विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता छ १९ जिलकाद येक प्रहर दिवस प्रातःकालचा मुा अंतुरली पा येदलाबाद तापी दक्षणतीर यथास्थित आसे विशेष. काल बराणपुराहून कूच होऊन सात कोश या मुकामी आले. आज येथून कूच होऊन येदलाबादे पुढे दोन कोश मुा आहे. कासारबारीचे रोखे चालले. शुक्रवार छ १७ जिलकादी नवाब निजाअली-खान सरकारचे डेरियास आले, भोजने जाहाली. प्रहर सा घटकापर्यंत बोलणे बहुत समारभे जाहाले. दुसरे दिवसी धवशे खासे डेरियास आले. नवाब, धवशे अलजपूरचे सुमारे जाणार. श्रीमत बडोद्यास आहेत. राजश्री हरिपत तात्या फौज-सुधा व सिदे होलकर ऐसे चांपानेरावर बडोद्याहून सतरा आठरा कोशाचे अंतरे आहे. या उपरी पाहावे. डांकेचे कागद पुण्यास येथून जातात त्यास फार दिवस लागतात म्हणोन तीर्थस्वरूप राजश्री बाळाजीपंत तात्याही लिो. यैशास लस्कराचा रोख येकच नाही. थालनेरपर्यंत नीट आले. तेथून तोरखेडे-याकडे चालीस कोश पश्चमेकडे गेले; तिकडून बराणपुराकडे आले. तेव्हा डाकेस बहुत हेलपडे पडत चालले. ज्या रोखे चालिले त्या रोखे डाक बसवीत आणावी तो दुसरा रोख होतो. तेव्हा फिरऊन दुसरे रोखे बसवावी असी घालमेल कासार-बारीचे घाटापासून होऊ लागली यामुळे कागदास दिवसगत लागते. ये विसी श्रीमंतासहि येथे विनंती केली. परंतु स्वारीचे डोला पो चालावे लागले. येणे करून पत्रास हेलपटे फार पडले. आलीकडे अजंठ्याकडून डाक बसविल्यापासून पुण्याची पत्रे साडे च्यार दिवसी येत होती. त्याजवर आता कूच जाहाले या-मुले डाकेस फेर पडत जाईल. आतां कासारबारीनेच डाक पहिली आहे तीच चालती करावी लागते आसे आहे. याजमुळे दीसगत लागते. कळावे बहुत काये लिहिणे लोभ करीत असावे हे विनती.

¶Trimbak Vishvanath, a clerk, sends news to Poona about the movements of the Karbharis and those of Raghoba.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 76]

[*26-4-1775*

मेस्तर शाहाबाफियेत बाशद रफअत पन्हा खसूसियेत व मवालात (?) दस्तगाहा मजकुर आंकी सरकारचे मुल्छदी फौज बुनगेसुधा व गोविंदराव गायेकवाड सेनाखासखेल समसेरबाहादर पालणपुरचे तालुकियात होते. त्यास हुजुर यावयास राहाचा खतरा फितुरीयाचे फौजेमुले होता. परंतु सरकारचे मुल्छदियानी निकडीने साठ कोसाची दौड करून फौज व बुणगेसुधा छ १७ सफरी हुजूर येऊन पोहचले. सेनाखासखेलहि येक दोन रोजानी मागाहून आले. त्याउपरी खंबाइता-हून दोन कुचे करोन साबरमतीचे पाण्यावरी आलो. फितुरियांस तीन कोसाची तफावत राहिली होती, त्यास फितुरी सात आठ कोस माघारे सरोन गेले. या उपरी त्याचे पिछावरी जात आसो. पुढे अमलात येईल ते लिहून पाठविले जाईल. रा छ २५ सफर. ज्यादा काय लिहिणे.

¶*News-letter from Surat about the movements of Govindrao Gaikwad.*

No. 77]

[*30-4-1775*

श्री

श्रीमंत राजश्री बापू
स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक नारो गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. येथील कुशल तागायत छ २९ माहे सफर मुकाम ठाणें आंकलेस्वर येथास्थित असो विशेष. स्वामीकडून मी आलियातागायत कांहीं सेवकाचा सांभाल न जाहला. यैसें नसावें. सदैव पत्रीं परामर्ष सेवकाचा करीत जावा. यानंतर इकडील वर्तमान तर, राजश्री हरिपंत तात्याकडील छ मजकुरीं बातमी आली जे, राजश्री गोविंदराव गायकवाड व मानाजी फाकडा व खंडेराव गायकवाड हे श्रीमंत दादा साहेब यांस जाऊन मिळाले व तात्यानीहि आपली फौज सडी करून बुनगें सारें आमदाबादेकडे लाऊन दिल्हे. याप्रमाणें बातमी आली आहे, ती सेवेसीं लिहिली आहे, त्याजवरून कलेल. दुसरें आपण राजश्री नारो अनंदराव याजकडे वरात परगणे अंकलेस्वर व परगणे हेसोट येथील पाठविली कीं, इंग्रजाचा यैवज न देणें. नारोपंताकडे देणें. म्हणून पत्री आज्ञा व सनद यैसी पाठविली. त्यास इंग्रजानी साल मजकूरचा वसूल जमाबंदीचे वेलेसच वसूल करून घेतला. बाकी पो मारकडे कांहीं राहिली नाहीं. इग्रजांची बाकी दिल्ही म्हणून दोन्ही परगणेचा बचाव जाहाला. नाहींतर उरफड व आमाद व जंबुसर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येथें जैसे इंग्रजानें बेचिराख तिन्ही परगणे जाहाले तैसेहि ह्या परगण्याची गत होती. आजपर्यंत तात्याचे उपद्रव न जाहला. पुढें काये होईल तें पहावें. आज पावेतो सरकारांत व राजश्री आनंदराव गोपाल व राजश्री नारो अनंदराव यास रुपये हजार येकून पावणे दोन लाख रुपये दिल्हे. इग्रजाचे मोंगलाचे भडोज-कराचे अठावीस हजार तीस हजार महाल मजकूर वगैरे सनदी धामधुमीमुळें खर्च माजी आमलदारसुधां जाहाला साहजार.....इजाफांचे पडेल. परगणेयांत बाकी राहूं दिली नाहीं, लस्करचा उपद्रव लिहितां पुरवत नाहीं. इंग्रज समीप. इतके असून सारेयासी सल्लूख राखून परगणे याचे लावणीचें काम चालविलें. जर करितां लस्करानें लुटलें तर लावणी कलतच आहे. त्यास राजश्री नारो आनंदराव व राजश्री गंगाधरराव रास्ते यास पत्र पाठवावें कीं, दोनी परगणेयास उपद्रव लागों न देणें. इंग्रज उपद्रव करील तर पारपत्य करणें म्हणोन पत्रें पाठवणार स्वामी समर्थ आहेत. दोनी परगणे रस्त्यावर पडिले आहे. सेवेसीं विनंती पत्रें पाठवितो, परंतु कृपापत्राची आज्ञा होत नाहीं. शेवेसीं श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh to Sakharam Bapu, giving news from Ankleswar of the movements of Tukoji Holkar.*

[*7-5-1775*

No. 78]

श्री

राजश्रा जनार्दन आपाजी गोसावी यांसी.

सुरु खमस सबैन मया व अलफ, जिवाजी रघुनाथ याचीं पत्रें आलीं. त्यांत रा मुधोजी भोंसले यांचा संदर्भ लागला होता याकरता जाबीतजंग पुढें भोसल्या-कडे गेले. रुकनुतदौला यांस छ २६ सफरी दगा होऊन मारले गेले; या प्रो लिहिले आहे, व नबाबाचीहि पत्रें आलीं. त्यांत रुकनुतदौला मारले गेले, परंतु परस्परे इमान प्रमाण करार आहेत तेच काईम आहेत. दुसरा अर्थ नाहीं. हें वर्तमान तुम्हास कलावें म्हणोन लिहिलें आहे. जाणिजे छ ६ राावल.

लेखनसीमा.

¶*Nana Fadnis—all in his hand—to Janardan Appaji, communicating news of Rukn-ud-dowla having been killed.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 79] [*28-5-1775*

श्रीगजानन

पुा श्रीमंत राजश्री तात्या
स्वामीचे सेवेसी.

विज्ञापना. श्रीमंताचे लस्करातील वर्तमान काल च्यार घटका रात्रीस माणूस आले त्याणे सागितले की मुकाम प्रो कोइली बडोदियानजिक च्यार कोस इंग्रजाने हरिपंत भिडां यांजवर लटकेच निमित्य ठेऊन ठार केला. दोहा कुसीत बरचीची फले बदुकीचे तोंडावर (बा) दली असता ते दोहीकडे च्यार फली क(रू)न मारिले. श्रीमंतानी इंग्रेजास मना करून लागले तो इंग्रज बहुतच बेकैदी बोलो लागला. दक्षेणी फौज गायेकवाड व फाडके (फाडके?) याची खर्चाची बहुतच आबल. राजश्री गोविंदराव गायेकवाड सांप्रत आठ पांच दिवसांत बहुतच दिलगीर आहेत. आपल्याकडे यावयाचा मार आपसमधे म्हणतात. श्रीमंत इंग्रेजाचे वर्तणुकीचा विचार दिवसे दिवस पाहून बहुतच पस्तायांत आहेत. इंग्रजाने दक्षणी लोकास सांगितले की तुम्ही आम्ही भडोजस जाहून तुम्हास राहावयाची सोंय न पडे, तरी रेवा पार करून देईन किंवा राहिल्यास आहा यांप्रो आसावे. सारोश टोपीकराचा मतलब श्रीमंतास घेऊन भडोज नजीक करावी. याप्रो सविस्तर वर्तमान त्याचे लस्करातील त्याजकडील बारगीर रुसकत होऊन आला त्याणे सविस्तर सांगितले. सारोश गुजराथी सिबंदी व दक्षणी लोक आठ पाच दिवसात तारातीर आपले आपण होतात; आणि परवाचे लढाईने बहुत धासियेत त्याणे खादली असे. काल खंबायेतेस तोफा जाल्या. येक इंग्रेजे नामी माणुस खड्याचे लढाईने जखमी जाहाला होता, तो कांल मृत्यं पावला. त्याजकडे दस्तुर का लौकिकाचा माणु(स) त्याचे जातीचा मृत्य पावल्यास पाच सात तोफाची सरबती करावी याप्रो वर्तमान आल आसे. स्वामीस कलावे म्हणोन आइकिले वर्तमान लिहिले असे; हे विज्ञाप्ति.

¶*The writer (Vamanrao Patwardhan ?) to Haripant, giving details of the movements and plans of the British.*

No. 80] [*13-6-1775*

श्रीमल्हार

राजश्री गणेशपंत नाना व रामचंद्र दाजीस सा नमस्कार पावणे.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री त्रिंबकपंत आबा स्वामीचे सेवेसी. सेवक सिवराम गोपाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरि. येथील कुशल

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ताा जेष्ट शु १९ मंगलवार मुकाम भडोच जाणून स्वकीये कुशल लेखन करावें विशेष. सांप्रत आपल्याकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं तर तपसीलवार ल्याहावे. यानंतर आम्हाकडील वर्तमान तर श्रीमंतांचा मुकाम येथेच होता व कारभारी याजकडील फौज बावाप्यारीयाचे घाटे उतरावयास गेली. त्यास श्रीमंतांनी येथून कूच करून बावाप्यारियास गेले. तेव्हां कारभारी याजकडील फौज रेवेस पार नाहीं सबब तापे करून उतरत होती. दाहापाच हजार फौज व बुणगे येसी उतरत होती तो श्रीमंताचा मुकाम गेला. पाणियांत उतरत होती तिजवर तोफा डागल्यां. त्या दशतीनें घोडी व माणसे दोन तीनसे वाहून गेलीं. राजश्री हरीपंत वगैरे फौज जमावनसी उभी होती. चार घटिका वाट पाहून डभईकडे गेली. श्रीमंतानी शु १४ कूच करून त्याजवर गेले येसे वर्तमान असे. चिरंजीव भाऊ लग्नाकरितां नंदुरेबारेस गेला आहे. त्यास येथपरियेत सुरक्षित आला पाहिजे. सबब राजश्री गोविंदपंत आनासहि पत्रे लिहिले आहे व आपणहि त्यांस सागून सुरक्षित पावेतो आर्थ करावा. आम्हीं श्नानसंध्या करून श्रीमंत आपले येजमानाचे अभिष्टचिंतन करून आसों. कलले पाहिजे. रिकामे दिवस काढितो. संकटात कर्जाच्या व पोटाच्या आहो. ईश्वर इच्छाप्रमाण. लोभ न टाकणे. हे विनंती.

सो त्रिबक जगन्नाथ व खंडो महिपत साा नमस्कार विनंती. लिहिले परिसोन लोभ कीजे हे विनंती.

¶*News-letter from Gujarat giving details of the movements of the forces of Haripant returning for cantonment.*

[*8-7-1775*

No. 81]

पो छ १२ जौवल.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत स्वामीचे शेवेसी पो मल्हार जगजीवन सां नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल ताा छ ९ जौवल मुा मौजे ठाणगाव नजीक पाटोदे वर्तमान यथास्थित जाणून स्वकीयें लिहीत असावें विशेष. राजश्री हरिपंततात्या नर्मदा उतरोन आलीकडे आले. तेथून खजिना न्यावयाकरिता दोन हजार स्वार रवाना केले ते तापी उतरून आलीकडे आले आहेत. ते खजिना घेऊन जाणार म्हणौन वर्तमान यैकिलें. त्यास आम्ही गंगा उतरून प्रवरेवर गेलों. तेथें पुरंधराहून पत्र आले कीं हरिपंत नर्मदेवर आले आहेत, तुम्ही माघारे फिरोन खजिना घेऊन हरिपंताकडे जाणे म्हणौन पत्र आले.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्यावरून आम्ही माघारे फिरोन, गंगा उतरून आलीकडे आलों. उदईक कूच करून गिर्नारबारीनजीक मुकाम करू. दरमजल टोगोडे डावे टाकून तुमचे सुमारें येतों. तुम्ही खजिना पुढे लाऊन घाल तरी न लावणे. आम्ही नजीक आल्यावर तुम्हास लिहून पाठऊ त्याप्रो खजिना आम्हाकडे पाठवणे. आम्ही तात्याकडे घेऊन जाऊ. कदाचित त्यास खजिन्याची निकड आहे याजकरिता रवाना कराल, तरी त्यापैकीं पंनास साठ हजार रूा आम्हाबरोबरील लोकास खर्चास घेणे म्हणौन पुरंधरची आज्ञा आली आहे. याजकरितां तितका ऐवज ठेऊन बाकी ऐवज रवाना करावा. इतक्यांत आम्ही तेथें येऊन पोहचतों. तात्या कोणत्या सुमारे तापी उतरणार हे लेहून पाठवावे. बहुत काये लिहिणें हे विनंती.

हेा पत्री सदासिव अनंत करमरकर सांा नमस्कार विनंति. राजश्री मलबा बापूनी लिा आहे त्याप्रो तिकडील बातमी आणून लौकर लेहून पो हे विनंति.

¶*Malharrao Panse to Naropant, giving news of the Peshwa's forces and their movements.*

No. 82] *[25-11-1775*

पो छ ८ सवाल.

श्री

श्रीमंत राजश्री तात्या स्वामीचे सेवेसी.

विनंती. सेवक नारो बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तो छ १ माहे सवाल पावेतो स्वामीचे कृपावलोकने करून मुा खांडवे वर्तमान येथास्तित असे. यानंतर मी शहरीहून निघालो ते खांडवियास आलो. येथे पाहता येंदा पाणीयाणे कमी केली ती स्वामीस विदित आहे. आणि मी तो सरकारांत यैवज बहुत दिल्हा आहे. परंतु मजला तो स्वामीसेवा करावी लागते. यास्तव जैसे पाहतो त्याप्रमाणे गावाची जमाबंदी करितो. येंदा सख्ती करून रयेतीपासून यैवज घेतलाच पाहिजे. यैसियास जेथवर सेवकाच्याने यैवज साधता साधेल तेथवर साधितो. विशेष इकडील वर्तमान तो राजश्री आबाजी माहादेव धारेस येऊन सिंदे यासी भेटलें व होलकर इंदुरास गेले आहेत यासहि भेटीस आले आहेत. परंतु सरदार याण्हीं काही आश्रा दिल्हा नाही. मग अंतस्त शकेटभेट[१] असेल तर न कळे. बाह्यात्कार तो दिसत नाही, यैसे

---

१ ऐक्याचा भेद.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे. राजाराम गोविंदहि घोडेयावरून पडिला. पायास जरब बहुत आली आहे. तेहि फिरोन धारेस गेले. याप्रमाणे इकडील वर्तमान असे. महमद इसब यास राजश्री केशोपंत घेऊन स्वामीपासी आले आहेत. त्यास त्याचे मुखअवलोकन करू नये आणि त्याजविसी कोण्ही विनंती करील तरी स्वामीनी मान्य न करावी. हा केवळ परिछिन स्वर्प आहे. जातीचा मुसलमान; याचा विश्वास अथःपर किमपि न करावा. स्वामीने यास येथेच विल्हेस लावावे. हा स्वामद्रोही आहे. यासी जीवाचे शाशन द्यावे. पुणेयास न पाठवावे. हा परम दुष्ट आहे. कदांचित पुणेयास पाठवावयाचा मनसबा जाला तर येक हात येक पाय येथे दूर करून मग पुढे पाठवावयाचे जाले तरी पाठवावा. स्वाम सूज्ञ आहेत. सेवकानी ल्याहावे यैसे नाही. स्वामी म्हणतील कीं, तुम्हास या गोष्टीचे काये म्हणोन आपण बोलतील. तरी, हा परम हरामखोर. याण्हे येक येक वचन सेवकाचे कारकुनाजवळ बोलला आहे ते कोठवर ल्याहावें. बोलीस कारकून नेले होते त्याजपासी नानाप्रकारें उणे शब्द बोलला ते पत्री लिहिता येत नाही. परंतु हा केवळ काळरूपी जाणोन सेवेसी विनंती लिहिली आहे. पुढे स्वामीचे मर्जीस येईल ते खरे. उतम विचार असेल तो सेवकानी खावंदास विनंती ल्याहावी. यास्तव सेवेसी विनंती लिहिली असे. वरकड श्रीमंत दादा-साहेब याजकडील काही वर्तमान आले असेल ते सेवकास ल्याहावयाची आज्ञा केली पाहिजे. मी सेवक स्वामीचे पदरीचा असे. + बहुत काये लिहिणे, हे विज्ञापना.

¶*Naro Ballal Bhuskute to Haripant Tatya, asking him to deal severely with Mahmad Isaf and not to spare him in any way. The arrival of Abaji Mahadeo at Dhar and the fall of Rajaram Govind from his horse are also communicated.*

[3-1-1776

No. 83]

पो छ २१ जिल्काद

श्रीविठलप्रा.

श्रीमंत राजश्री **तात्यासाहेब साहेबाचे सेवेसी.**

अज्ञाधारक गंगाजी अव्हाड हुजरे कृतानेक सा दंडवत. विज्ञापना येथील कुशल ता पौश शु॥ १३ जाणोन स्वकीये कुशळलेखन आज्ञा केली पो. विशेष.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपणाकडून छ २६ सवालची पत्रे आली ती पावली. श्रीमंत पाटालबावास व राजश्री नारो सिवदेव वगैरे यासी होती ती ज्याची त्यासी पावती केली. सरकारच्या पत्राचे उतर घेऊन पाठवितो. राजश्री गोपालपंत याणी ईकडील कचे वर्तमान लि॥ आहे त्यावरून कळो येईल. पाटील बावास देशी यावया-करिता बहुत प्रकारे ताकीद करीत अहो. होलकर व हे उभयेता येके मोहर्ते समागमे येणार. पौश वद्य १३ त्रयोदसीचे मोहर्त पाहिले आहे, कलावे. राजश्री गोपाल विस्वनाथ हे कोठे राहातात, पूर्वी कोणते कामावर होते, कोणाचे निसबतीचे यैसे पतेवार लिहिणे म्हणोन आज्ञा; त्यासी राजश्री माहदाजी सिवजी गजरे, बाजीपंत परवतीवाले याचे मावस भाऊ, राजश्री विष्णु माहादेव, बाबा गजरे याचे चुलत भाऊ, याणी बाबाकडोन मामलती या प्रांती केल्या त्या बरोबर यासी रोजगार होता. उदेपूर मेवाडचे येथे पाटीलबावानी मोर्चे लाविले त्या समयी बाबानी माहादाजी सिवजीपासी राणाजीच्या मामलत फडेच्याकरिता[1] पाठविलें त्याच्या तोडजोडीस समागमे हे होते. आलिकडे माहादाजी सिवजीचा काल जाल्यावर त्याचे पुतणे आपाजी कृष्ण या जवल होते. हली गुदस्ता ते देसी गेले. श्रीमंत राजश्री गुरुजीबावा देसीहून पाटीलबावाकडे आले त्या समयी त्याचा यांचा पूर्वस्नेह व हली त्याजपासी आलिकडे कामकाजात व बातमी कितेक प्रकारची त्याचे खातरेदास्ती प्रमाणे कसोटीस उतरल्या उपरी प्रगणे नवलाई येथे पूर्वीची असामी गुरुजी बावाची आहे त्या कामाचा बंदोबस्त याजकडे सांगोन देसी गेले. हली साली ते आसामी पाटीलबावानी बंद केली. सबब हे येथे आले. रिकामेच आहेत. बारीक मोठी यासी बातमी लागती. हे केवल आपले दरबारलक्षाचेंच आहेत. यात तिलमात्र अंतर नाहीं. आमची पुर्ती खातरजमा आहे. कोणे गोष्टीविशी चिंता नाहीं. आपल्या कार्याचे आहेत. या नंतर राजश्री गोविंदराम यांचा पता लि॥ म्हणोन लि॥ त्यासी हे कदीम औरंगाबादकर अलीकडे पाच सात वर्षे सिद्याचे दरबारी चाकरी केलेली आहे : हली बेकार आहेत. कुटुंबसुधां येथे राहातात. पत्र लि॥ ते विचारून त्यासी लिहावी. सूचना मात्र लि॥ आहे. या उपरी आपली मर्जी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

हेच राजश्री दिनकरराऊजी दादासाहेबाचे सेवेसी साा दंडवत हमेशा पत्री सभाल करावा.

¶*Gangaji Avad (Nana Fadnis' hujrya with Mahadji) to Haripant Tatya, informing him of the intention of Scinde and Holkar to come to the Deccan.*

---

१ मामलतीचा फडशा करण्यासाठीं.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

[31-7-1776

No. 84]

पौ छ २३ जाखर श्रावण मास.

श्री

राजश्री सखारामपंत बापू गोसावी यासी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीो माहादजी सिंदे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. रा खंडेराव त्रिंबक पैठणकर यासी आवंतीहून बहिरजी ताकपीर याजकडे मेवाडांत रा केले होते. त्यास बहिरजी ताकपीर यानी बदनजर धरल्यावर मारनिलेनी उठोन यावे ते न आले. इकडून फौज व राजश्री सदासिव मल्हार मेवाडात पाठविल्यावर येऊन त्यास भेटून त्याजसमागमेच आले ते हाली समागमे आले आहेत. यास मारनिलेच्या घरावर चौक्या बसविल्या आसतील त्यास उठऊन मुलामनुष्यास कोणेविसी उपसर्ग न लागे ते करावे. रा छ १४ जाखर. + बहूत काये लिहिणे ? लोभ कीजे हे विनती.

मोर्तब
सुद.

जोतिस्वरूप चरणीतत्पर
राणोजीसुत माहादजी
शिंदे निरतर.

¶*Mahadji Scinde to Sakharam Bapu, requesting release of Khanderao Trimbak.*

[2-1-1777

श्री

यादी राजश्री बालाजी जनार्दन फडनीस सु॥ सबासबैन मया व अलफ फौजेस सरंजाम फौज बोली स्वार १५०० दर राऊती ३०९ रु. प्रो बेरीज ४५०००० रु. साडे चार लक्षाचे माहाल पेस्तर सालापासून लाऊन घ्यावे. माहालच्या बेरजा राजश्री सखाराम भगवंत याचे माहालाप्रो व माहालत्याप्रो लाऊन द्याव्या. सनदा माहालाच्या सालमजकुरी देवाव्या.

छ २१ जिलकाद सन सवा सबैन मार्गसीर्ष.

¶*The troops in the service of Balaji Janardan, their remuneration and the saranjam for their maintenance are given in this paper.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 85] [*1-2-1777*

पा छ २८ जिल्हेज.

श्री

विज्ञापना छ २२ जिल्हेजी पाटीलबावा प्रा बीड येथे गुरूचे तकियापासी बसले होते. रात्रीं येक प्रहर रात्र जाली तेव्हां याचे वकिलांची किवा कोणाचीं पत्रें आली. मनुशें बीडचे वगैरे तमासबीन हजार दोन हजार मिळालें होतें. नाच सुरू जाला ते समयी पत्रें आली, ते आबा चिटणीस यानी व बाळारायानी वाचून दाखविली. तेच समयी रागा बहूत भरले. पत्रांत लिहिलें होतें की पसतीस लक्षे व्होळकराकडे वाजबी निघाले; तात्यानी नवा लक्षावर फैसला केला. दुसरें, विसाजी कृष्ण हिंदुस्थानांत विदा करावे हें मानस बहुत करून तात्याचें व श्रीमंत बापूसाहेबाचे. हे यैकून बहूत रागें भरले की चिंता काये आहे? विसाजीपंताचे व्होळकरसुधां डोकें कापून गडास पाठवीन तरच राणोजी सिंद्याचा बीजाकार. रेवापार जाऊ देईन तर सेत गुरुची. नाना प्रकारच्या सिव्या देऊ लागले. मग राणेखानाने मनुशे मजकडे पाठविले की तुम्ही राहुटीस जावें. आम्ही विन्हाडास आलों. प्राथःकालीं बाळारायाकडे गेलो. बाळाराव म्हणाले की धोंडोपंत तात्यानी कंबर पुरती आम्हावर बांधली. पांच सात पत्रें आमची आलीं. आम्ही सत्ये मानले नाही. रात्रीं तिघा चवघाची त्याजपासीं खलबतांत बसनार त्यांची वगैरे आलीं, तेव्हां सत्ये भासलें. हे उमेद आम्हास तात्याची नवती. व्होळकरानी केले काये? पळोन आले म्हणुन नक्षे केला की काये? धोंडोपंत! राज्ये बुडालें हें सत्य जणावें. माहादजीसारका सरदार हतचा गमावला. यानी मसलत केली. उभैतास येकत्र करून म्हणावें होतें की जैसा तोतयाचें पारपत्य केले तैसें हैदर नाईकाचें पारपत्ये करून मग जावें, हे कबूल करतेच. हिंदुस्थानचें मुतालकीचे सिके श्रीमंत मोठे रावसाहेबापासून आमचे. मधें श्रीमंत रावसाहेबीं च्यार महिने दिल्हे नवते तर आमची समाधानी व समाधानीची पत्रें पाठविलीं की तुमची तुम्हासच देऊ. विनंती केली की तात्याचा तुम्हांसी दुसरा विचार नाही. विसाजी कृष्णनी आपल्या कह्यांत असावें. मतलब प्रिथवीमधें आपण असावें नक्षे आपला. अर्जव सर्वत्रानी करावें. विशेष काये लिहूं? बखाडा जाला यांची सला जे करणें ते करावी. स्वामीपासीं फौज आहे तिकडें यांचें सूत्र खिजमतगार कारकून कोणास न कळतां गेले. तेथील बंदोबस्त पका आसों द्यावा. हे म्हणतात की श्रीमंत नानासाहेब म्हणाले की पाटीलबावा तो मी आहें. त्यांचे फ * स्त * * * ये बरें ज्यांचे कुडे त्या * * * वर म्हणतात ह कितेक विस्तार काये लिहूं? निळकंठ नाईक भावे छ २९ जिल्हेजी पुढे बिदा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
केले. पांचवे दिवसीं पोहचावें. बाळाराव छ २६ रोजीं बिदा जाले. आबा चिटणीस उभैता परंतु आघाडीस पाव कोस राहतात. नागतळ्यापासुन बाळाराव गडास येतील. पाटीलबावा जांबगावाकडें जातील. जांबगावीहून बाहीरबुनगें वगैरे झाडून बिदा करावे सडी फौज मात्र असावी. पुढें बनेल तें करावें. छ २७ रोजीं खोंकरमोह गुरुचा गांव तेथे आले. प्राा बीड पूर्वेस नव कोस राहिलें. येथें गढीमधें तोफा आणिक ठेविल्या. तीनसें माणसें नेहेमीं असावीं हा बंदोबस्त केला. गढी बहुत चांगली मजबूत आहे. गढीमधें कांही वस्तभाव होती व आपणाजवळ त्यांतील * * स्त * (भा) व उजेनीस छ २८ जिल्हेजी (आपणा) समागमें पागा सिगजी नामे म्हणून पागेवाले तो समागमें दिल्हा. समागमे सावकार मंडळी त्यास ताकीद जाली की वस्तभाव उजेनीस पाठवावी. कार्याकारण जांबगावपावेतों आसों द्यावी. तेथून जें सांगणें ते सांगू. छ २७ जिल्हेजी कारकून सौवती मातुश्री बाईसाहेबाकडे गेला की मुलास घेऊन यावें. आम्ही चाकर आहों. बाजीरायाचा वौंश त्याजला घेऊन जें करणें तें करावें हा हि मनसुबा! त्रनकारनामकास नच द्यावा. यांचें त्यांचें येकचित्त हें खरें. कार्याकारण जे बोलणें ते बोलावें. हें वर्तमान आसत्यें नाही. इतकियावर मर्जी. हे बहुता कार्याच्या डौलांत आहेत. श्रीमंत नानासाहेब येकवचेनी. हे बटेबाज! श्रीमंत बापूसाहेबाकडें गोस्टी मात्र बोलतात, परंतु भये ठेवितात, कोणे समयीं काये करतील. यैकीलें वर्तमान सेवेसी ल्याहवें. विसाजीपंताची आवई हिंदुस्थानात पाठवावयाची यैकतो उतमच आहे. व्होळकर पुरते मायेंत घ्यावें. याजकडून ग्रहस्त येका दों दिवसां व्होळकराकडे बिदा होणार. यैकिलें वर्तमान ल्याहवें हे सला उतम आहे. परंतु विसाजीपंताचा परिनाम हे शुध्ध होऊ देणार नाहीत. चिंता काये. होळकर ते येके विचारे असले मग काये करतील ? तो मजकूर ठरलाच तर त्याचा तपसील पुढें लेहूं. सेवेसी श्रृत होये हे विज्ञप्ति.

¶*Naro Shivdeo to Haripant Phadke from the camp of Mahadji Scindia, who is described as having been extremely irritated on account of the alleged favours shewn to Tukoji Holkar. The letter is important as it illustrates the character of Mahadji.*

No. 86] [*5-2-1777*

श्री.

विज्ञापना छ २६ जिल्हेजी पाटीलबावा बिडीहुन कूच करून दोन कोस आले. खोंकरमोहो यांचे गुरूचा गांव आहे, तेथे एक दिवस राहून दुसरे दिवसीं जांब-

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

गांवास जावे. बाळाराव छ मजकुरी बिदा[1] जाले. हळु हळु सेवेसी येऊन पोहचतील. पाटीलबावा जोतलिंगाकडें जावयाचा मजकूर प्रस्तुत राहिला. सबब की वामनरायाची फौज बुडविली बाजीपंत आणा माघारें फिरले. आपण त्या प्रांती जांवे. येसाजी सिंदे वगैरे कोणाची गांठ पडली; मग मागें कैसें यावें; या करितां तिकडे जावयाचा मजकूर राहिला. नवाब बंदगान अलीकडें कारकून बिदा जाला. धौंसा वगैरे बखाडा करावा हे सला ठरली. खूळ मातबर दिसतें. इतकियावर पाहावे. धौंसाकडें कारकून एकनाथपंत वस्त्रें गेलीं की तुम्ही आम्ही एकत्र होऊन यांचें पारपत्ये करूं. भोसल्याकडें पत्रें गेलीं की मुसदी केवळ लबाडी करूं लागले. तुम्ही आम्ही यांचें पारपत्य करूं. राज्ये तुमचें आहेच. देवाजीपंत स्वामीकडे येणार. तिकडें निराळा कारकून गेला. जांबगावीहून बुनगे वगैरे उज्जेनीस बिदा करून आपण सडे व्हावे, फौज जमा करावी हे ठरलें इतकियावर पाहवें. ग्वालेरचे मोरचे उठले. गोहदवाला आपले स्थळास गेला. मतलब हिंदुस्थानात नजफखाना-सिवाये मातबर आहे कोण ? पातशाहचे नजेफखानाचें चित शुद्ध नाहीं. श्रीमंताकडील वर्तमान कसकसें आहे हें कळत नाहीं. येथे नानाप्रकारच्या गोस्टी बोलतात. प्रस्तुत यांजला मोठे दुख झालें की मुतालकीचे सिके घ्यावे. असेरचा किला घ्यावा. बऱ्हाणपुर घ्यावे हे मानस दुसरे व्होळकर आपल्या बरोबरीनें असावे. मुसदिया [पुढील बंद गहाळ]

¶*Naro Shivdeo from Mahadji's camp to Nana Fadnis, communicates the irritation of Mahadji with the Barbhais. The letter is incomplete.*

No. 87] [*12-5-1777*

श्री.

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी विनंती, उपरी. आपली निक्षूण अज्ञा व राजश्री बापूनी बहुत सांगितले व सरकारी काम यैसे जाणून फरासिसाकडील काम कबूल केले. छ ४ रोज सोमवारी फरासिसाचे डेरियास गेलो. काहीसे बोलणे जाले. दोन रोज पाऊस फार पडला. चिखल फार जाला. जाग्याची सोय नाही. माणसे दोनच्यार दुखण्या पडली. याजमुळे त्याची मर्जी बहुतच दिक. यापुढे त्यास बोलणे देखील सुचत नाही. आरबुज जात. किमपिहि इकडील जास्त समजत नाही. डेऱ्यात सर्व पाणी. मोठी फजिती जाली. आशाने आम्ही मरू, यैसे बोलू लागला. पुण्यास येण्याची जलदी केली. मग आम्ही

---

१ रवाना झाले.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्याची खातरजमा केली की, हे दिवस केवल पाऊस नित्य लागावा यैसे नव्हत. पंधरा दिवस येथे राहावे. जाबसाल होऊन तुमचे बातशाहाचे पत्राची उतरे गेली म्हणजे तुम्हास पुण्यास नेऊ, यैसे सांगून खातरजमा केली. याप्रमाणे राजश्री बापूसहि सांगितले. उतम म्हणोन बोलिले. त्यास सुमेरसिंग आंगर महमद इसफ दोहीतून येक हावेली यांस राहावयास नेमून असावी. सूचनार्थ विनंती असे. येथे किरकोली साहित्य लागले ते देविले. हाली आणखी जरूर पाहिजे. त्याची कलमबंदी अलाहिदा लिहिली त्याप्राा दो (चौ रोजात) साहित्य जरूर यावे, हे विनंती.

¶*The writer describes to Nana Fadnis the great hardships which the French envoy had to suffer on account of sudden downpour of rain. He was however prevailed upon by the writer to stay on for a fortnight. The residence of Mohmmad Isaf or Sumersing is suggested to be given for his stay. This Frenchman must be St. Lubin.*

[*19-7-1777*

पौ छ २७ जाखर.

श्री.

राजश्री हरी बलाल स्वामी गोसावी यासीं विनंती उपरी. तुम्हाकडे फौज सालमाकरीं चाकरीस आहे. त्यास कोणाचे राऊत किती आहेत हें समजले पाहिजे, याकरितां पेसजी तुम्ही गणती घेतली असेल; त्यापैकी हालीं तुम्हाजवल किती आहेत व देसीं किती आले व सरंजामी इतलाखी सिलेदार व पागेचे बारगीर तुम्हाजवल आसोंन त्यांचे सरदार तेथें नाहीत कोण, व लोकांसुधा सरदार उठोन आले असतील व सरदार मात्र तेथे राहून लोक देसी आले, त्याची तपसीलवार याद हुजुर आणविली असे. तरी पत्र पावतांच सदरहु लिहिल्या प्रो नावनिसीवार याद लेहून सत्वर पाठवून देणे. जाणिजे छ १३ जमादिलाखर सुा समान सबैन मयां व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Sakharam Bapu to Haripant, asking detailed information about the army serving under him.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 88] [*11-1-1778*

श्री.

राजश्री हरीपंत स्वामीचे शेवेसी.

विनंती उपर. नरसिंगराव धायगुडे सदासिव रामचंद्र यांचे घरी गेले होते, ते तुम्ही पाठविले होते की तेच होऊन गेले हे लिहून पाठवावे ; व तुम्ही करणार होतां त्याचें काये जालें व विंबाजी भोसल्याकडील मजकूर विस्तारें लिहिलात त्याप्रमाणें मुधोजी भोसल्यास पत्रें पाठऊ. परंतु येसवंतराव नाईक निंबाळकर हे वणगोजी नाइकांचे बंधु, तेव्हा यास वर्तमान त्यांणी कलविलेंच असेल. तुम्ही वणगोजी नाईकास पुसावे व ह्या गोष्टी उगेच फौज ठेऊन जावें हे ठीक नाहीं असेहि भाव समजेसे बोलावें. मोरोबा बहुलाहून पुण्यास येणार. सावध असावे. येशवंतराव नाईकास नवाबानी चाकर ठेविले नाहीं ; व इनामतनामा आला नाहीं. हे असते तर जिवाजीपंत लिहिते यांत गुंता नाहीं रा छ ११ (२१ ?) जिल्हेज हे विनंती.

¶*Nana Fadnis to Haripant (wholly autograph), asking the latter to be very cautious as Moroba was returning from Bahul to Poona.*

No. 89] [*February 1778?*

श्री

विज्ञापना होलकर काल येणार होते, त्यास विष्णुपंत आले नाही, या मुले न आले. मी काल सायंकाली होलकराचे डेऱ्यास गेलो होतो. चार घटका बसलो. भाषण इकडील तिकडील फार जाले. त्यात हासील बोलणे की आमचे हिसेबचा फडशा लौकर करावा. आम्ही बोलिलो की फडशा होईल, परंतु किल्यावर बलाविले आहे, जावें. कितेक मसलतीच्या गोष्टी होणार. तेव्हा बोलिले कीं आम्हांस मसलत कशास पाहिजे ! जी मसलत कराल त्यांत आम्ही आहो. तेव्हां मीं म्हटले कीं सरदार मसलतगार तुम्ही आणि अशा गोष्टी का सांगतां ? त्याजवर उगेच राहिले. विष्णुपंत आज येणार आहेत. आले म्हणजे होलकरसह किल्यावर येतील. होलकरांचे मनातील भाव कीं दोन महिने जाहले. येक दिवस आम्हास सलामसलत पुसली नाही. बापू अगर नाना आमचे डेऱ्यास आले नाहीं. आमचा मान रक्षावा असे प्रकार मनांत आहेत. स्वामीची गांठ पडल्यावर बोलण्यांत साऱ्या गोष्टी येतील. येक चिठी होलकरास पाठवावी कीं

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विष्णुपंत आलेच असतील आज तिसरे प्रहरी येणें. असी चिठी पाठवावी. जिवाजीपंतासी पत्रें पाठविली ती पाहून पाठविली आहेत. भोजनोतर मी सेवेस येतो मग उतराची आज्ञा करावी हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke (wholly autograph letter) to Nana Fadnis, explaining the attitude of Holkar who is said to have taken offence.*

No. 90] [*February 1778*

श्री

राजश्री हरीपंत स्वामीचे सेवेसी.

विनंती उपर पुण्यांत राजकारणे घाटत होतीं त्याचेच बूट अलीकडे अधीक ऐकण्यांत येतात. राजकारणें होत आहेत यांत संदेह धरू नयें. नाइकासहि चिठ्ठी आली आहे कीं तुम्ही बहुळास येणें; ती मला त्याणी दाखविली. तेव्हां जवळहि आले आहेत. तुम्ही सावध फार राहावें. ग्रहणाचे दिवशीं सावधता फार असावी. फांकड्याचे गोटांत बातमी राखावी. होळकराचे गोटास जातां वाटेनें फार सावध असावें, फांकड्यास जपावें. रवाना मंदवार अवशीची सा (हा) घटका रात्र हें विनंती.

¶*Nana to Haripant (all in the writer's hand), asking him to be very cautious as some political affairs are developing at Poona. This must be the development of intrigues started by Morobadada against Nana Fadnis.*

No. 91] [*13-2-1778?*

श्री

राजश्री हरीपंत स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. होळकराकडील ऐवजाविसीं बहुत प्रकारे लिहिले. ऐशास हे माझे मनांत येऊन अगोधरच होळकराकडे लिहिलें आहे. त्याचे घरचा कारभार सुस्त यास काय करावें. काम संधीचे. याच दिवसात नानाचे जाणे तिकडे जाले. बाळाराव आले; मार्गप्रतिक्षा करीत बसले आहेत. तुमच्या तर कंठीस प्राण आला; ईलाज नाही. होळकरास व नारोपंतास चिठ्या पाठविल्या आहेत. जलद रवाना कराव्या, दादोपंत मैसाळकर आणवावे म्हणून लिा. ते जेजूरीस आहेत. आज येथे आले. मुले माणसे घेऊन जेजुरीस आले. सध्या देव ब्राह्मण करून

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

परवाचे दिवसी पुरंधरास येतो, म्हणोन गेले ते निश्चयरूप येतात. माणूस बरोबर दिल्हे आहे. तूर्त पुण्याहून निघाले या उपरी येथें येतील. फौजेत गलबल रुपयासाठीं फार जाली आहे. ईलाज नाहीं. रा छ १४ मोहरम हे विनंती.

¶*Sakharam Bapu (wholly autograph) to Haripant Phadke, explaining the critical position of affairs owing to Holkar's dilatoriness and Nana's absence from Poona.*

No. 92] [*15-2-1778*

श्री

राजश्री हरिपंत स्वामीचे सेवेसी विनंती. उपर, तुम्ही पत्रें छ १४ मोहरमची सांडणी स्वाराबराबर पाठविली ती पावली. होलकराकडील पैका न देणे असी सूचना वृधांची जाली म्हणोन तुम्हाजवल शफतपूर्वक सांगितलेयाचा विस्तारे मजकूर लिहिला तो कलला. त्यास, चिंचवडाहून कूच करून इकडे येऊ लागलो तेव्हा बापूस पत्र पाठविले की, होलकरांचे डेऱ्यास गेलो, पैक्याची लौकर तरतूद करून देऊन हरिपंतांचे कूच करवावें वगैरे थोरपणाच्या गोष्टी बोलिलों. आपणहि होलकरांस लिहून ऐवजाचा फडशा करवावा म्हणजे हरिपंत जातील. त्याचें उतर त्याणी बंदभर पाठपोठ लिहिले आहे. त्यांत येके ठिकाणी लिहिलें आहे की, हरिपंताची चव काही राहिली नाहीं. याउपर विचार करणे प्राप्त आहे. केवल नासलें आहे. आपण लौकर यावें, असें लिहिलें. तेव्हा, तुम्ही लिहिलेंत हे प्रमाण दिसते. दुसरे, बापूनी बालारायाचे बोलणे चालणें लिहिलें. त्यांत शेवटी सारांश बालारायानी उतर केले की, नाना आलियावर काय बोलणें ते बोलू. बालारायाचेहि पत्र माहुलीस आलें की, काही दिवस लागत असेल तर मी येईन. त्याचे उत्तर पाठविले कीं, मीच लौकर येतो. दुसरे पत्र बापूंचें फारच लांब आले. त्यांतील सारांश : होलकर जेजूरीस आले. कारभारी पुण्यात आहेत. ऐवजाची निशा व्हावी तें दिसत नाहीं. दादोपंत वाघोलकर मोरोबाचे घरी नाईकाचे मारफत गेले होते, असें हरिपंतानी लिहिले. चौहूकडून गलबल आहे. आपण परभारे पुरंधरास येतील किंवा पुण्यास जाल ? कोल्हापूरचे बलावले. कृष्णराव पुण्यात आहेत, तेथेच आपणास भेटतील म्हणोन विस्तारें लिहिले. यांतहि पाहाता तुमचेच लिहिण्यास मिलते. असों. मी पुण्याचवल आल्यावर पत्रेंच पाहावयांस पाहिजे तर पाठवीन. लिहितां लांब पडतें. शनवारी रात्रौ पुण्यांत ग्रहप्रवेशास मुहूर्तानें येणार. मग पुरंधरास जावयाचे. तुमची चव गेली. विचार करणें प्राप्त. तो काय विचार ते तेथे गेलियावर समजेल. तुम्ही

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

लिहिलें की, होलकरास व नारो गणेशास ऐवजाविसी चिठ्या पुढे पाठवाव्या. आपण लौकर यावें म्हणजे दबावाने पैका देतील. त्यास, तुमचें लिहिल्यावरून चिठ्या पाठविल्या आहेत. परंतु आंतून येवढा मातबर आश्रा न देण्याविसी सांपडला; तेव्हा जरूर देतील! असों. खटपट करावी मीहि लौकरच येतो. वृधाचे मनात स्थाईभाव काय घोलतात ते मी पुरते जाणतो! असों. ईश्वरी इच्छा प्रमाण. कोल्हापुरकर भारी जाले. प्रतिनिधि कोठे नमुदांत येत नाही म्हणोन लिहिलें. त्यास, तुमचे विसाजीपंतांची पत्रें तर यावी; तीं कां नाहींत? विसाजीपंत, प्रतिनिधि रामचंद्र गणेश, बाजीपंत येक जालियावर त्यांस संभालतीलसें दिसतें. परंतु तुमचें जाणे होते तर सहजांत काम होते. लिहून फल काय? पैक्यामुले दौलतच गारत होते असें दिसतें. ईश्वरी इच्छा प्रमाण. कार्यसिध्धि जालियाचें पत्र तुम्हास मुजरत पाठविलें आहे ते पावलेंच असेल. र॥ छ १६ मोहरम हे विनंती. तुमचें करणेंहि विचित्र आहे. कांही कोठे बोलता येत नाहीं. मूकत्व धरावें. होईल ते पाहावें. प्राप्त होईल ते भोगावे हा निश्चय आहे, हे विनंती. तुमचे पत्र बापूंचे पाहून माघारें पाठविलें आहे, हे विनंती. होलकरास व नारोपंतास चिठ्या पाठविल्या आहेत. पाहून बऱ्या असल्या तर परभारे लाखोटे करून पाठवाव्या अथवा खुल्या देणे तर द्याव्या, हे विनंती.

¶*The whole letter is in Nana Fadnis' hand and is addressed to Haripant Phadke, containing important reflections on the attitude of Sakharam Bapu and Mahadji and others. How the amity between Nana and Bapu was spoiled can be inferred from this account.*

No. 93] [*16-2-1778?*

श्री

राजश्री हरिपंत स्वामीचे सेवेसी विनंती. उपर, तुम्ही छ १७ मोहरमचे पत्र पाठविले ते पावलें. होलकराचे ऐवजाकरता राजश्री बापूस चिठ्या पाठविल्या व होलकरास पाठविल्या त्याचा उतरें आली ती पाठविली ती पाहिली. सा लक्ष घ्यावे, कूच करून जावें, तों हिसका पडला. यामुलें पत गेली, इलाज नाही. आपलें येणे लौकर व्हावें, त्याखेरीज परिणाम लागत नाही म्हणोन विस्तारें लिहिलें ते कलले. त्यास, चिठ्याची उतरें प्रतिउतरें पाहिली. यांत तर बरेंच लिहिलें आहें. परंतु होलकरांचे माध्यस्त तुम्ही. त्याचा विश्वासहि तुम्हावर. असें असता यात्रेस गेले. याचा इतला तुम्हास दिल्हा की नाही? नारोपंतास बोलाऊन निकाल पाडवावा. माझे येण्याचा गुंता या कामास काही दिसत नाही. उगेच

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

थोरपणाकरतां लिहितां; बरेंच आहे. तुमचें गोत्रघटित होलकरासी नारोपंतासी नसतें तर हे लिहिणें उचित होतें. असो. राजश्री सिवाजीपंत मिरजकर बापूकडे गेले होते. तेथील खुलासा त्यांस काय आढला याचें बारकाईने पुसोन लिहून पाठवावें. पत्रें सारी मावारी पाठविली आहेत. रा॥ छ १८ मोहरम मु॥ कुसुर घाटावर येक पत्र जासूदजोडीबराबर पूर्वी मी तुम्हास पाठविलें ते पावलें कीं नाही? उतर आले नाही. त्यावर तुमचा सांडणीस्वार आला त्याचेंहि उतर गेले. बापूचे चिठ्यांत, याच समयांत नानाचे जाणें जालें त्यामुले हिसका, असें भाव आहेत. ते थोरच आहेत. आम्ही कार्यास आल्यानें पाठीमागें अधिक कामें होत असावी, तटऊ नये असें असावें. याची परीक्षा बापूनी महिना पंधरा दिवस कोठे जाणें तर जावें. मागें काही तर पडू देतों कीं काये? परंतु यांच्या कवाइतीच येक प्रकारच्या आहेत! बरेंच आहे. केले कर्म [भो]गावें! हे विनंती.

¶*Nana Fadnis to Haripant (wholly autograph), saying that he (the addressee) should himself have settled the affairs with Holker. The writer asks him to find out secretly as to what had come out of the interview between Bapu and Shiwajipant Mirajker. "Bapu should not have said that it was due to Nana's absence that you were put to great trouble," says the writer. Nana blames Bapu for such quibbling of words.*

No. 94] [*17-2-1778*

पौ॥ छ १८ मोहरम

समान सबैन माघ.

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीनीं पत्र पा॥ तेथें आज्ञा कीं लस्करांत फितुऱ्याचे पारपत्य केलें. तेथील जड मोडली. करवीरचा आश्रा धरला होता; त्यास करवीरचे बंदोबस्तास सिंदे गेले आहेत. फौज भारी जमा जाली वडगांव वगैरे ठाणी घेतली. कोलापुरास लागले आहेत. येसाजी सिद्यास दहशत मोठी बसली. बंदोबस्त लौकरच होईल. मालवणाकडील संधान फिके पडेल. कोणी या संधानांत आहेत ते ठिकाणीच राहतील. याउपरी लौकर उलटावयाचें व्हावें म्हणजे लोकांच्या गपा मोडतील, म्हणून आज्ञा केली. त्यास कोलापूरकरांचे पारपत्य जाले म्हणजे फार करून राजकारणे मोडतील हे खरे आहे, परंतु श्रीमंत दादासाहेब राजकारणे करितात ती हैदरखानाचे बळावर. दुसरे नाहीं. त्यास हैदरखानाचें पारपत्य जाल्याखेरीज कोणताही राजकारणाचा बंदोबस्त होत नाहीं. पैकेकरी आहे. लाख होन एकदांच एकाध्याकडे पाठवितो, त्यानें खुले

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

माजतात. यास्तव हैदरखानाचे पारपत्याची तरतूद करावी. सिंदे मोकळे जाल्यावर इकडे पाठवावे. लवकर उलटावयाची आज्ञा त्यास असेच घडावे म्हणून जाबीतजंगास निकड करीत गेलों ते कृष्णातीराहून कनकगिरीस यावयास एक महिना लागला असा प्रकार आहे. त्यांत होईल तें करीतच आहों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant to Nana Fadnis (wholly autograph), admitting that everything will be quiet when Kolhapurker is subjugated, but further suggests that it is with the support of Hyder that Dadasaheb was playing mischief. Haider has a big purse and advances huge amounts and creates trouble.*

No. 95] [*21-3-1778*

पौ छ २१ सफर
समान सबैन फालगून

श्री

सेवेसी जनार्दन आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना श्रीमंत मातुश्री काकूबाईस तुम्ही जाऊन विनंती करावी कीं पुरंधरास चलावे म्हणोन पत्री आज्ञा. आज्ञेप्रा विनंती केली. श्रीमंत मातुश्री काकूबाईनी पुरंधरास यावयाविषी साहित्याची आज्ञा केली.

किता

२५ उंट नफर,
२५ घोडी,
२५ कामाठी,

पांचसे स्वार विसाजी कृष्ण समागमे आसावे.

सदरहूप्रा साहित्य व स्वार पाहिजेत. येविषीचे साहित्य उदईक पुण्यास यावेसी आज्ञा जाली पाहिजे. म्हणजे श्रीमंत मातुश्री काकूबाईचे यणे होते. उट व स्वार घोडी कामाठी पाठवावयासी आज्ञा करावी सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Janardan Apaji asks for camels, horses, labourers and 500 horsemen to accompany Parvatibai to Purandhar.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 96] [*24-6-1778*

श्री

राजश्री कृष्णाजी रणदिवे

यांसी

ऽ अखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो रघुनाथ बाजिराव प्रधान आसिर्वाद सु॥ तिसा सवैन मया व अलफ. राजश्री तुकोजी होलकर व मोरो बाबूराव याणी सरकारतर्फेकडून मसलत केली. उपरांत राजश्री सखाराम भगवंत याचे बुध्धीस लागोन मेलविले येश गमाविलें होतें. हाली सरकारचे मर्जीप्रो वर्तणूक करावयाची चाल धरिली आहे. त्यास याउपरी होलकर याची फौज हजूर येईल व राजश्री माहादजी सिंदे याचीहि येणार आहे. त्यास अगोधर ज्याची फौज येईल त्यासमागमे तुम्ही आपले सरंजामसुध्धा हजूर येऊन पोहचणे. जाणिजे; छ २८ जमादिलोवल. बहुत काये लिहीणे.

श्री सांबः
स पुत्रो विजयते राजा
शाहुनरपति हर्षनिधान
रघुनाथ बाजीराव
मुख्य प्रधान.

लेखना-
वधिः

¶*Raghunath Bajirao to Krishnaji Randive, asking him to join Holker and Scinde with his forces.*

No. 97] [*21-1-1779*

पुरवणी तीर्थस्वरूप राा दादा.

(इंग्रजा)चे घरास राज्य जाईल या अर्थी त्याजपासोन निघोन माहदजी शिंदे व होलकर याजकडे आलो, आणि निश्चये कीं आपण श्नानसंध्या करून राहूं. अतः-

---

१ याच अर्थाचें व याच मितीचें आपाजी मोरे याचे नांवाचें पत्र आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
पर राज्याचा लोभ धरणार नाहीं. आमचे खाजगी खर्चास तुम्ही बारा लक्षांचा मुलुख दिल्हा तो घेऊन झासींत राहूं. श्रीमंत सवाई माधरावयानीं आपले धणेपण करावे. आपला पुत्र सवाई बाजीराव यानी कारभार मुतालकी करोन असावे. मुलें थोर होय तोंपर्यंत पुरंधरावर उभयेतानी असावें. श्रीमंत सवाई माधवराव व सवाई बाजीराव हे आपले राज्याधिकारी होये तो पावेतो रो नानाफडणीस व सकारामबापू यानी कारभार कुलयेत्बार करून राज्य संभाळावें. आम्ही इतक्यावर फंदफितुरी करूं तर श्री सांबाची शफत आस व श्रीकुलदेवताची आण आस. या वितरिक्त कासींत मात्रागमनाचे पातक आसे. पुन्हा या राज्याचा लोभ धरणार नाहीं. येविसीचीं पत्रें नानास व सकरामबापूस पाठविलीं. येणेप्रमाणे दादासाहेबाचे पत्राचा मजकूर. उपरांतिक रा॥ माहदाजी सिंदे व तुकोजी होलकर यानीहि पत्रें या अन्वयाप्रमाणच लेहून आण प्रमाण करून नानास दिली आणि सभेंत गर्जोन बोलले कीं पुन्हा श्रीनानासाहेब कैलासवासी याचे राज्यास फंद-फितुर वाईट चिंतील त्यास कासींत मात्रागमनाचें पातक घडेल. ह्या राज्यासी सामील आसोन श्रीमंत सवाई माधवराव यासी अभिष्ट चिंतोन साहित्ये करीत असावे. याजप्रमाणे बोलल्यावर रा॥ नानाफडणीस यासी विनंती केली कीं आपण या राज्यांतील कुलकारभारी आहां तर माघे लहाणथोर कारभारी व स(र)दार आम्ही लोक याचा अन्याये जाहला आसल ते चित्तांत काही न आणावे. येथील लहाणा-पासून थोर येक कडेचा माहार देखील यकरूप असोन राज्याचा बंदोबस्त करावा. याजउपरी राजश्री दादासाहेबी तमाम राज्यांतील जे अधिकार आहेत त्यास पत्रें दिली कीं आपण या राज्याचा लोभ सोडून बारा लक्षा(चा) मुलुख घेऊन झासींत श्वानसंध्या करून राहतो. राजश्री सवाई माधवराव व सवाई बाजीराव याचे आज्ञेंत वर्तणूक करीत जाणे. ज्याप्रमाणें नानासोचें आज्ञेप्रमाणें वर्तत आला, त्याजप्रा॥ आताही वर्तावें म्हणून निज्या(म)अली व हैदरअली व रा॥ मुधोजी भोसले अवंतर(जे) आहेत त्यास पत्रें देऊन येविसी सिंदे होलकर व नानास पत्रें पाठविलीं आणि गौरव केला कीं या राज्यास अपाये बहुत चिंतीत होंते परंतु तुह्मीं नेकजाद मादबर सरदार साहे होऊन राज्य संभाळिले. असें म्हणोन हिंदुस्थानांत जावयासी माघ सुध दसमीस रात्रौ मुहुर्त कूच करून देहूचे मुकाम केले. तेथें एकदोन मुक्कामे करून मजल दरमजल निघोन जाणार. तेच दिवशीं सिंदे होलकर यानी हिंदुस्थानांत जाण्याविसी अगाडीची पिछाडी केली. द्वादसीस डेरे खाशाचे व नानाचे पुरंधरास जावयासी मुहुर्त बाहेर दिल्हे.—या दो चौ रोजांत नाना आपली फौज घेऊन पुरंधरास जाणार. समागमें सिंदे होलकर सडे मात्र येणार. तेथ गेलियावर सवाई माधवराव यासी किल्याखालीं उतरोन सिंदे होलकर

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

यासी रवानगी वस्त्रें देऊन त्यास हिंदुस्थानांत रवाणा करावें. तमाम मानपुरीशे सरदार यासी वस्त्रें द्यावीं. यंदा वरकड फौज निरोप दोन महिन घरास देऊन सडे सरदार ठेऊन घ्यावे.

¶*A graphic account of the abdication of Raghoba after his defeat at Talegaon is contained in this incomplete letter addressed to one Dada by his son, both of whom appear to be north-Indian residents, as they write* घासी *for* झासी, *etc.*

No. 98] [*4-7-1779*

पौ छ १६ जिल्हेज

तिसा सबैन. पौष.

श्री

राजश्री भिवराव स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. तुम्ही छ १५ जिल्हेजची पत्रें पाठविली ती पावलीं. कारल्या जवळ आले. लढाई जाहल्याचा मजकूर लिहिला तो कळला. त्यास कालचे लढाईत बाणदारांनी कामकाज चांगलें केले. वेसून राखिले. बरे केले. आज त्याणी कूच केले नकळे. लिहून पाठवावें. काल तोफ रवाना केली. पावलीच असेल. फौजहि रवाना करितों. तुम्ही मेहनत चांगली करतां म्हणोनच काम होते. वरचेवर वर्तमान लिहून पाठवीत जावें. रा॥ छ १६ जिल्हेज हे विनंती.

¶*Nana Fadnis to Bhivrao Panshe (wholly autograph) congratulating him on the success he attained in a fight near Karla. Nana is much pleased with the good work done by rocketmen.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

THE LEAGUE OF THE BARBHAIS

RAGHOBA'S ROUTE TO KASEGAON AND AFTER. (IN RED.) X KASEGAON.



CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh